स. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ७१०

...माला-पुष्प १ लें.

...करितां मुद्दाम लिहिलेलें.

# मुलांचा मार्गदर्शक

लेखक,

## गंगाधर रामचंद्र साने. बी. ए.

REFBK-0003569

...चापट अॅन्ड ब्रदर्स
...बुधवार पेठ, पुणें शहर.

किं. १० आणे. सन १९२८.

नोंद. ८८३७
लि
क्र.नि. ३२
नों. ५।५।३८
आ. ग.
पा.
आ. ग.
समर्थ

६०६

जीर्णोद्धार ग्रंथमाला पुष्प १ लें.

# मुलांचा मार्गदर्शक

REFBK-0003569

गंगाधर रामचंद्र साने बी. ए.
( महाराष्ट्र साहित्यसेवक ग्रंथमालेचे संपादक व प्रकाशक. )

३५६२

प्रकाशक,
ए. पी. बापट अँन्ड ब्रदर्स
कसेलर्स, बुधवार पेठ, पुणे शहर.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. )

किंमत १० आणे. सन १९२८

प्रकाशकः—

ए. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स,

बुकसेलर्स बुधवार पेठ, पुणे शहर.

मुद्रकः—

लक्ष्मण भाऊराव कोकाटे, ' हनुमान ' प्रेस,

२०० सदाशिव पेठ, पुणें.

# प्रस्तावना.

सन १९२० मध्यें माझा मुक्काम मुंबईस असतांना " भागवान् श्रीकृष्ण " पुस्तकाचें पुनर्मुद्रण व प्रकाशन आपल्या अंगावर घेणाऱ्या दादरच्या " यमुना वाङ्मयमंडळा " चे मालक रा. यशवंतराव तेंडुलकर यांनीं इंग्रजींत जशीं "For a man of forty " " Advice to young men" इत्यादि तऱ्हेचीं पुस्तकें आहेत तशा धर्तीवर तुम्ही पुस्तकें लिहाल कां ? असा मला सहज प्रश्न विचारला होता. अर्थात् अशीं पुस्तकें मजकडून लिहून घेऊन प्रकाशित करावीं व इंग्रजीच्या धर्तीवर आपल्याही वाङ्मयक्षेत्रांत एकप्रकारचें अभिनवत्व साधावें असें प्रकाशक या नात्यानें त्यांना साहजिकच वाटत होतें. मलाही ती त्यांची कल्पना आवडून मी तावडतोब त्याच रात्रीं अष्टदलात्मक अगर अष्टपुष्पात्मक अशा " जीवितोद्धार ग्रंथमाला " नामक मालेच्या आठही पुष्पांचा स्थूल प्रकरणात्मक आराखडा व प्रत्येक पुष्पाचें नामाभिधानसंस्करण तयार केलें व त्यापैकींच आज हें प्रथम पुष्प " मुलांचा मार्गदर्शक " या नांवाखालीं प्रसिद्ध होत आहे. पण " संसारांत कधीं कधीं दृष्टीस पडणारी दैवाची विचित्र लीला " इथेंही घडून आली; व ती अशी कीं, सदर ग्रंथमालेच्या विचाराचे सूचक रा. तेण्डुलकर होते तर त्याच मालेच्या प्रथम पुष्पाचे प्रकाशक पुण्याचे बालवाङ्मयोत्तेजनाचे एक प्रख्यात पुरस्कर्ते रा. **ए. पी. बापट** हे असून त्यांच्या उत्तेजनामुळेंच हा ग्रंथ माझ्या बालवाचकांचे हातीं देण्यास मी आज समर्थ होत आहे. याबद्दल रा. **ए. पी. बापट** यांचे आभार मानावेत तितके थोडेच होणार आहेत.

प्रस्तुत पुस्तकाचें नांव " मुलांचा मार्गदर्शक " आहे. अर्थात् मुलांच्यासाठींच तें मुख्यत्वेंकरून लिहिलें असलें तरी मोठ्यांनाही त्यांत वाचनीय व बोधप्रद भाग मुळींच सांपडणार नाहीं असें नाहीं. मुलांच्यासाठीं सोपें व मनोरंजक पण तितकेंच बोधप्रद वाङ्मय निर्माण करणें ही गोष्ट अर्थात् वाटते तितकी सोपी नाहीं व " आनंद " कर्ते रा० वासुदेव गोविंद आपटे, यांच्यासारखी माझी त्या कामीं विशेषशी योग्यताही पण नाहीं. तथापि या ग्रंथाची लायकी ठरविण्याचें काम तज्ञांचें असल्यामुळें त्यांना जर यांत कांहीं ग्राह्यांश वाटला तर मी स्वतःला धन्य समजेन. कारण, कविवर्य कालिदासाच्या शब्दांत सांगायचें तर—

" आपरितोषाद्विदुषां न साधुमन्ये प्रयोगविज्ञानम् ।
बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ॥ "—

असेंच मीही म्हणून ही प्रस्तावना पुरी करतों.

८४८ सदाशिव, पुणें.
ता. १—११—२८.

सर्वांचा नम्र—
ग. रा. साने.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | सुरवात | १ |
| २ | आई | २ |
| ३ | पिता | १९ |
| ४ | बहिणभाऊ | २४ |
| ५ | इतर आप्तेष्ट वगैरे | ३७ |
| ६ | गुरु | ५० |
| ७ | मित्र | ६३ |
| ८ | गांव, शहर व देश | ८७ |
| ९ | शहरची हवा | ९४ |
| १० | माझा मायदेश | १०२ |
| ११ | भावी आयुष्याची तयारी | १०८ |

सं. नि. ३२
नों. ५०/१०/५८
३५६१

# मुलांचा मार्गदर्शक.

## सुरवात.

### ऐकलेंत का ?

मुलांनो, मी आज तुम्हांला चार शब्द—ज्यांच्या योगानें तुमचें जन्माचें कल्याण होईल असे चार शब्द—सांगण्याचें ठरविलें आहे. ते पुनः पुन्हा वाचून आपल्या मनांत ठसवून घ्या व त्याप्रमाणें वागा म्हणजे तुमचें खरोखरच जन्माचें कल्याण होईल, 'शहाणा मुलगा' म्हणून तुमची सगळीकडे कीर्ति होईल आणि जो तो तुमची स्तुति आणि वाहवा करूं लागेल. तुम्ही माझ्या बोलण्याकडे लक्ष्य द्याल, तें चित्त देऊन ऐकाल तरच ह्या गोष्टी होतील. नाहीं तर एकादें दावें तोडून टणाटण उड्या मारणारें वांसरू जसें हिरवळ जमिनीवर चरत चरत भलत्याच शेतांत आणि कुरणांत जातें त्याप्रमाणें लहानपणीं तुम्हांला अत्यंत प्रिय जो खेळ त्या खेळाचे दंगलींत रमून जाऊन माझ्या बोलाकडे तुम्ही दुर्लक्ष कराल तर मग तें कसें होईल ? त्यानें तुम्ही आपलें नुकसान करून घ्याल ! पण त्यांत आमचें काय जातें ? एका कवीनें म्हटलें आहे—"**एथें कोणाचें काय बा गेलें ? ज्याचें त्यानेंच अनहित केलें!**" बोला, तसें तुम्हाला करावयाचें आहे ? तुम्हांला खेळायला हवेंच ! नाहीं कोण म्हणतो ? पण नुसतें खेळूनच कसें भागेल ? नुसतेंच जर तुम्ही खेळलांत तर सगळ्या जन्माचा तो एक 'खेळ'च होईल नाहीं कां ? यासाठीं असें करूं नका. इकडे या ! तुम्ही खेळून खेळून दमलेले

आहात ! तेव्हां मी काय म्हणतों तें ऐकून घ्यायला तुमची आतां तयारी असलीच पाहिजे ! चला तर मी आतां तुम्हाला खेळाखालोखाल प्रिय असणाऱ्या तुमच्या ' आई ' कडेच घेऊन जातों म्हणजे झालें !

—-×-—

## आई.

अहाहा ! आई ! ' आई ' हा दोनच अक्षरी शब्द ! पण त्यांत किती प्रेम, किती वात्सल्य, किती कारुण्य, किती मायां, किती दया आणि किती स्नेह भरून राहिला आहे ! त्याची नुसतीं कल्पना केली तरी, मुलांनो, तुमचें अंतःकरण भरून येतें कीं नाहीं मला सांगा बरें ? असा कोण मुलगा आहे कीं, 'आई' या दोनच अक्षरी नांवाचा उच्चार झाल्याबरोबर सात्विक रोमांचानें ज्याचें अंग थर्र्‌कन् थरारून जात नाहीं, ज्याचे डोळे पाण्यानें भरून येत नाहींत ? तुमचेच काय पण मरेपर्यंत प्रत्येक मनुष्याच्या तोंडून दुःखातिरेकाच्या वेळीं ' आई 'चेंच नांव निघतें ! मनुष्य एक वेळ परमेश्वराचें नांव विसरेल पण ' आई ' हीं दोन अक्षरें विसरणार नाहीं–विसरत नाहीं ! त्याच्या रोमरोमीं-त्याच्या रक्ताच्या थेबांथेबांतून, मुरल्याप्रमाणें दुःखाच्या वेळीं ' आई ' हा शब्द–हा एकच शब्द अगदीं सहजगत्या त्याच्या तोंडावाटे बाहेर पडत असतो ! असें कां बरें व्हावें ? याचें कारण आईचे उपकारच तसे आहेत ! तिच्या उपकाराला, तिच्या प्रेमाला, तिच्या जीवाभावाच्या खटपटीला सीमाच नाहीं ! आपल्या लहानग्या छकुल्याचीच काय पण कितीही मोठया झालेल्या आपल्या मुलाची सेवा सुश्रुषा करण्यांत तिला ' दमणें ' हा शब्दच ठाऊक नसतो. इतक्या निस्वार्थ प्रेमानें झटणाऱ्या मातेबद्दल कोणाला बरें गहिंवर दाटणार नाहीं ?– कोणाचें बरें हृदय भरून येणार नाहीं ? ते पहा; त्या दाटलेल्या गहिवराचे आणि भरून आलेल्या हृदयाचेच बोल ते पाहिलेत का एका ६ । ७ वर्षांच्या

मुलीच्या तोंडून खेळतां खेळतां एकीकडे अगदीं सहजगत्या गाण्याच्या रूपानें बाहेर पडत आहेत ते! अगदीं साध्या, गोड भाषेंतले ते बोल, बाळांनो, तुम्हाला समजण्यासारखेच आहेत! ऐका, ती बालिका काय म्हणत आहे तें!:—

---

## अंजनीगीत.

**“ नीज न ये तरी गीत म्हणावें, अथवा झोके देत बसावें,**
**कोण करी हें जीवें भावें? ती माझी आई ॥ १ ॥**
**रडवें माझें वदन बघोनी, भूक लागली हें जाणोनी,**
**कोण उगें करि मज पाजोनी? ती माझी आई ॥ २ ॥**
**हसतां मजला पाहुनि हसते, मुके मटामट किति तरि घेते,**
**परि अंतरि जी तृप्त न होते, ती माझी आई ॥ ३ ॥**
**येई दुखणें तेव्हां जपते, सुखवाया मज अतिशय झटते,**
**परोपरी करि उपचारांतें, ती माझी आई ॥ ४ ॥**
**चालत असतां पडलों पाहुनी, उचलाया मज येई धावुनी,**
**गोंजारी पोटाशीं धरुनी; ती माझी आई ॥ ५ ॥**
**स्मरण तुझ्या ममतेचें होई, तव उपकारां सीमा नाहीं,**
**कैसा होऊं मी उतराई, गे माझे आई? ॥ ६ ॥**

मुलांनो, वरील गाणें सावकाश आणि गळ्यावर म्हणा व त्यांतल्या प्रत्येक ओळीचा अर्थ लक्ष्यांत घ्या म्हणजे आईच्या खऱ्या प्रेमाचें चित्र तुमच्या डोळ्यापुढें उभें राहील व त्याकडे पाहतां पाहतां तुमचें हृदय आनंदानें, कृतज्ञतेनें, आणि प्रेमानें भरून येईल व त्याच गहिंवराचे अश्रू तुमच्याही डोळ्यांत क्षणभर तरी चमकल्यावांचून राहणार नाहींत!

अहाहा! ह्या सर्व जगांत आईच्या प्रेमाला खरोखर तुलनाच नाहीं! तुम्ही शहाणे असा, मूर्ख असा, सरळ असा, वाकडे असा, श्रीमंत असा, गरीब असा, कसेही असलांत आणि कोणच्याही स्थितींत असलांत तरी मातेचें प्रेम तुमच्यावर नेहेमीं अढळच असतें! परमेश्वराचें

प्रेम जसें सर्व भूतमात्रावर सारखें असतें, साधूंची दया जशी शत्रुमित्रावर सारखी असते, पृथ्वीची क्षमा जशी तिच्या पाठीवरील सर्व जीवमात्रांना सारखीच तोलून धरते, तेंच प्रेम, तीच दया आणि तीच क्षमा, मातेच्या ठिकाणीं सुद्धां पाहून, " **स्त्री ही प्रत्यक्ष परमेश्वराची मूर्ति आहे** " असें कवींनीं म्हणावें, व "**मातेची योग्यता स्वर्गापेक्षांही जास्त आहे** " असें राजा रामचंद्रांनीं सांगावें, हेंच उचित नव्हे काय ? हें किती साहजीक आहे बरें ? मातेचें प्रेम अवीट असतें. त्याला विटणें कसें तें ठाऊकच नाहीं ! चंद्राचें चांदणें, झाडाची सावली, झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याचें पाणी आणि वाऱ्याच्या लहरी, ह्या जीवमात्रांना सुखच देतात व ते देतांना हा चांगला, हा वाईट, हा चोर, हा सभ्य, हा पंडित, हा दगड, असा कोणचा तरी भेदभाव पाहतात काय ? मातेचें प्रेमही असेंच आहे ! तें अवीट आहे, कुपुत्रावर सुद्धा तें विटत नाहीं ! म्हणूनच मोरोपंत नांवाच्या कवींनीं सद्गदित होऊन खालील उद्गार काढले आहेत. ते म्हणतातः—

" **पिता जरि विटे विटो, न जननी कुपुत्रीं विटे ।**
**म्हणोनि म्हणती भले न ऋण जन्मदेचें फिटे ॥** "

खरोखरच हें मातेचें ऋण न फिटण्यासारखेंच आहे. परमेश्वराचें ऋण कधीं फिटेल काय ? मग मातेचें ऋण तरी कसें फिटेल बरें ? कारण मातेंत आणि परमेश्वरांत अंतरच काय ? माता म्हणजे परमेश्वराची चालती बोलती प्रतिमा आहे ! म्हणूनच " **मातृदेवो भव** " म्हणून ऋषींनीं मातेलाच प्रथम वंदन करण्यास सांगितलें आहे ! मातेचे हे उपकार फार थोर आहेत, त्यांना सीमा नाहीं, अंत नाहीं; ते अनंत आहेत, अपार आहेत, आणि इतकें असून, सर्वांत विशेष गोष्ट म्हणजे निःस्वार्थतेचे ते उपकार आहेत ! कोणच्याही स्वार्थी आशेचा तंतु त्यांत गोंवलेला नाहीं, म्हणूनच अशा उपकाराच्या कल्पनेनें गहिंवरलेल्या हृदयांनीं वरील ' **अंजनीगीता** ' चा कवी म्हणतो--

**" स्मरण तुझ्या ममतेचें होई, तव उपकारा सीमा नाहीं,**
**कैसा होऊं मी उतराई, गे माझे आई ? ॥ "**

पण अशा आईचे उपकार आपण कसे फेडतो बरें ? त्या मातेच्या प्रेमाचा मोबदला आपण तिला कोणच्या रूपानें देतों ? आपणासाठीं रात्रंदिवस झटणाऱ्या व निस्वार्थ प्रेमाची पाखर आपणावर घालून आपल्या कल्याणासाठीं नेहमीं तत्पर असणाऱ्या आपल्या आईचे आपण कसे बरे उतराई होतों ? अरेरे, याचा विचार मनांत आला म्हणजे खरोखर शरमेनें मान खालींच घालायचा प्रसंग येतो ! मुलांनो, पहा बरें, तुम्हीच या गोष्टीचा विचार करा व तुमची तुम्हालाच या कामीं लाज वाटते कीं नाहीं तें सांगा पाहूं ? अर्थात् ज्या कृत्याबद्दल आपली आपल्यालाच मागून लाज वाटते तें कृत्य निखालस चांगलें नव्हे हें उघड नाहीं काय ? पण असलें कृतघ्नपणाचें वाईट कृत्य आपण कशामुळें करितों बरें ? याचें कारण खेळ, आळस आणि हटवादीपणा या त्रिदोषांत आहे ! लहानपणीं एकदा खेळाचा छंद बालकाला लागला कीं तो त्यांत इतका दंग होतो कीं, त्यापुढें त्याला अभ्यास व आईबापांचा सदुपदेश मुळींच रुचत नाहीं. व " मी येत नाहीं जा ! " " मी करीत नाहीं जा ! " असल्या तऱ्हेचीं उत्तरें तो मुलगा आपल्या गरीब बिचाऱ्या आईला देत असतो व तिचें अंतःकरण दुखवितो ! खेळाच्या क्षुल्लक मोहाला बळी पडून **मातृदेवतेचा** अपमान याप्रमाणें त्याच्या हातून पदोपदीं घडावा काय ? लहानपणीं खेळ आणि तरुणपणीं बायको यापुढें बिचाऱ्या मातेची काय किंमत ? तिला कोण विचारतो ? परंतु मुलांनो, ही किती शरमेची गोष्ट आहे याचा तुम्हीच विचार करा. जिनें नऊ मास आपणांस पोटांत वागविलें, जन्मापासून आपल्या खस्ता खाल्या, आपलें खाणेपिणें, कपडेलत्ते, दुखणीबाणी, ह्यापायीं झटतां झटतां जिनें आपल्या जिवाकडेहि पाहिलें नाहीं, त्या आपल्या मातेला--त्या प्रेमळ आईला आपण याप्रमाणें उलट लाथा

मारण्यास तयार व्हावें याहून कृतघ्नपणाची परमावधि ती काय राहिली? आळस आणि हटवादीपणा हे तर उघड उघड दुर्गुण आहेत! **'आळस हा मनुष्याच्या शरीरांत राहणारा एक शत्रु आहे'** असें म्हटलें आहे. मग त्या शत्रूला उघडपणें सामील होऊन आपल्या 'स्नेहाळ माये' चा–प्रेमळ आईचा अपमान करणें, तिचें न ऐकणें, तिला टाकून –दुरुत्तरें–बोलणें, हें आपणास शोभतें काय? विचारा बरें तुम्ही आपल्या मनाला! म्हणजे 'नाहीं, नाहीं, नाहीं,' असा त्रिवार निषेधाचा उच्चार तुमच्या कानीं येऊन, "हें आपणास मुळींच शोभत नाहीं!" असेंच तुमचें मन तुम्हाला सांगेल अशी माझी खात्री आहे. आपली आई आपल्याच कल्याणाच्याच गोष्टी आपणांस सांगत असते. पण आपण आपल्या हटवादीपणानें तिला उगाच दुःख देतों हें चांगलें नव्हे. मुलांनों, **मराठी १ ल्या पुस्तकातल्या** 'वडिलांचा मान' हा धडा तुम्हास आठवतो काय? त्यामध्यें गणूची आई त्याला वेळेवर तोंड धुवायला सांगत असतां "बस बस, मीं नाही धूत जा!" असें उत्तर आमचे गणोबा तिला करतात व मग सावकाश तोंड धुतात! अन् वरती प्रौढीही पण मारायला त्यांची तयारीच–"मग, मी धुतलें नाहीं का तोंड?" पण त्यावर त्यांच्या बहिणीनें—ताईनें त्याला दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ती म्हणते—"हो, धुतलेंस खरें, पण तिच्या मनाला लागेल असें बोलूनच कीं नाहीं?" वास्तविक इथें अपराध गणूचाच होता. त्याला शाळेला उशीर होईल म्हणून त्याच्या आईनें त्याला तोंड धुण्यास घाई केली. पण तें न समजून 'आईनें घाईच कां करावी?' असेंच आमचें गणोबा धरून बसले व आईचा अपमान केला! मुलांनो, असे गणोबा घरोघर आहेतच! पण त्या सर्वांनीं यापासून बोध घ्यायला नको काय? त्या गणूलासुद्धां पुढें आपल्या बोलण्याचा पश्चात्ताप झाला—आपण आईला उगीच बोललों याबद्दल त्यास वाईट वाटलें, असेंच त्या धड्यांत दाखविलें असून प्रत्येक

मुलालाही आपल्या चुकीबद्दल असेंच वाटायला हवे. पण आधीं चूक करून मग पश्चात्ताप करीत बसण्यापेक्षां गणूच्या ताईचा खालील उपदेश प्रत्येक मुलानें लक्षांत ठेवल्यास बरें होणार नाहीं का ? ऐका तर मुलानो, ती काय म्हणते तें—

" गणू, वडील माणसें व गुरु यांची आपण मर्यादा राखिली पाहिजे. तीं सांगतील तें ऐकलें पाहिजे. वडील माणसांची मुलावर माया असते. तीं त्यांच्या कल्याणासाठीं नेहेमीं झटत असतात. त्यांचा मान ठेवणें हें मुलाचें काम आहे. "

अशा तऱ्हेचा मान **पुंडलिकानें** ठेवला ! ही मर्यादा पुंडलिकानें पाळली ! अहाहा ! त्या पुंडलिकाचें पवित्र चरित्र आठवलें, फार काय त्याचें नांव जरी नुसतें तोंडीं आलें, तरीसुद्धां मन आनंदानें भरून जाते, अंगावर ' आनंदाचे रोमांच ' उभे राहतात ! मुलांनो, त्या **पुंडलिकाची गोष्ट** मी तुम्हाला सांगू का ! ऐका तर लक्ष्य देऊन ! हा पुंडलीक प्रथम मोठा व्रात्य होता. तो आईबापांची सेवा मुळींच करीत नसे. तरुणपणीं त्याचें लग्न झाल्यावर मग तर काय ? बोलायलाच नको ! बायकोच्या नादानें तो इतका वेडावून गेला कीं, एखाद्या गारुड्याचें माकड जसें त्याच्या आज्ञेंत वागतें व त्याच्या हातांतील काठीच्या खुणेप्रमाणें नाच करितें, त्याप्रमाणें हा पुंडलीक आपल्या बायकोच्या छंदानें वागूं लागला ! ' **चित्त आराधी स्त्रियेचें । आणि तियेचेचि छंदे नाचे। माकड गारुडियाचें । तैसें होय ॥**" अशी त्याची स्थिति झाली ! जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, त्याला बायकोच दिसूं लागली ! बायकोवांचून त्याला क्षणभरसुद्धां चैन पडत नसे, कीं करमत नसे ! तो पक्का बाईलवेडा बनला ! इतका कीं त्यापायीं आपल्या आईबापांचा—आपल्या वृद्ध मातापित्यांचा सुद्धां अपमान करण्यास तो कमी करीनासा झाला ! ज्यांनीं जन्मापासून त्याला लहानाचा मोठा केला, त्यासाठीं नाना कष्ट भोगले

त्या आपल्या आईबापांना त्यांच्या म्हातारपणीं सर्व प्रकारें सुखांत ठेवून, त्यांची सेवाशुश्रुषा करण्याऐवजीं तारुण्याच्या भुलीमध्यें स्त्रीछंदाची दारु पिऊन बेहोष झालेला पुंडलीक त्याच आईबापांना वाटेल तसें वागवूं लागला ! जन्मदाते आईबाप त्याला परक्यासारखे वाटूं लागले व परक्या घरांतून आलेली परकी स्त्री त्याला आपलीशी वाटूं लागली ! हा कशाचा बरे प्रताप ? मुलांनो ! हा कलियुगाचा प्रताप ! तुकाराम महाराजांनीं ह्या कलियुगाचें वर्णन एके ठिकाणीं असेंच केलें आहे. ते म्हणतातः—

“ **पलंगि बैसवोनि राणी । माते हातीं आणवी पाणी ॥**
**स्त्रिये पाटावाची** [म्ह. रेशमाची] **चोळी । माता अखंड चिंध्या गाळी ॥**”

पुंडलिकाचें वर्तन थेट याचप्रमाणें चालू होतें ! आपल्या स्त्रीला सुग्रास भोजन तर आईबापांना कदान्न, स्त्रीला मृदु शय्या तर आईबापांना रकट्यांचें आंथरुण, राजाराणींचा रंगमहाल तर गरीब बापडया आईबापांना कुठली तरी घाणेरडी, अंधारी व गलिच्छ खोली झोपण्यास मिळत असे ! स्त्रियेच्या नाजुक पायाला जमीन खुपेल म्हणून मऊ रुजाम्याच्या पायघडया आपल्या जीवासकट तिच्या पायाखालीं अंथरणारा पुंडलीक आपल्या गलितगात्र झालेल्या आईबापांना प्रसंगीं काट्याकुट्यांतून आणि खरखीत दगडामातींतूनही अनवाणी खडायला लावीत असे ! अरेरे, ही अज्ञानाची, मूर्खपणाची आणि बाईलवेडेपणाची खरोखर हद्द झाली असें मुलांनो, तुह्माला सुद्धां नाहीं का वाटत ? आणि त्याचें असेंच आहे. लहानपणीं खेळ आणि तरुणपणीं पत्नी जीवाला असेंच वेड लावीत असतात ! ‘ त्यापायीं परमेश्वराची सुद्धां आठवण राहत नाहीं ’ मग त्याच परमेश्वराच्या साक्षात् चालत्या बोलत्या मूर्ति जे आईबाप ते एखाद्या सांधी-कोपऱ्यांत फेकून दिलेल्या मूर्तिप्रमाणें एकीकडे पडून राहावेत ह्यांत काय आश्चर्य ? आणि काय नवल ? पण अशा वेळींच जो डोकें ठिकाणावर

ठरील तो खरा व तोच मोठा! पुंडलिकाचें असें झालें काय? असे उतावीळ होऊं नका! तेंच मी तुम्हांस सांगत आहे! ऐका पुंडलिकाची पुढें गोष्ट. याप्रमाणें पुंडलीक वागत असतां एकदा त्या सर्वांना प्रवासाला जाण्याचा प्रसंग आला. प्रवासांत आपल्या नाजूक बायकोला श्रम होऊं नयेत, तिला काटेकुटे बोचूं नयेत व दगडमाती खुपूं नये ह्मणून त्यानें तिला आपल्या खांद्यावर उचलून घेतलें व त्या निर्दयानें आपल्या वृद्ध आईबापांना मात्र तसेच रखडत चालविलें! काटाकुटयांनीं पाय रक्तबंबाळ झाले आहेत, त्यावर फोड उठलेले आहेत, अंगांत त्राण उरलेला नाहीं असे त्याचे आईबाप मंद मंद पावलें टाकीत चालत, तें सुद्धां त्या निर्दयाला खपत नसे व तो त्यांना लवकर लवकर चालण्यास सांगे! अरेरे! पुंडलिका, हें पाप कुठें फेडशील! ही तुझी अज्ञानाची काळरात्र संपणार तरी केव्हां? पण तें पहा! झगझगीत तेजाचा दिव्य प्रकाश फाकावा त्याप्रमाणें गंगायमुना ज्याच्या पायीं लागून व दर्शन घेऊन नित्यनेमानें पवित्र होतात व आपल्या पुण्याची प्रभा फाकीत जातात त्या ऋषीच्या आश्रमाचे तेज व ती पहा त्या ऋषीची तेजःपुंज मूर्ति! केवळ मातृपितृभक्तींच्या जोरावर थोर अधिकारास पोचलेल्या त्या ऋषीच्या झणझणीत उपदेशानें पुंडलीक एखाद्या स्वप्नांतून खडबडून उठल्यासारखा सावध झाला! त्याचे डोळे उघडले! त्याला तीव्र पश्चात्ताप झाला! व मग मात्र त्यानें स्त्रीचा छंद अजिबात टाकून देऊन आईबापांची जी अमूल्य सेवा केली त्याचें कुठवर वर्णन करावें?

अहाहा! पुंडलिकानें केलेल्या आईबापांच्या उत्कट सेवेचें वर्णन कोण करूं शकणार? ते करतां करतां हजार जिभांचा शेष सुद्धां थकेल तेथें इतर कवींच्या लेखण्या बोथट होऊन जातील यांत काय नवल? कारण ती सेवाच तशी अप्रतीम व अलौकिक होती! घड्याळाचा लंबक ज्याप्रमाणें एका टोकाहून दुसऱ्या टोकास जातो त्याप्रमाणें, पूर्वी स्त्रीवांचून क्षणही न करमणाऱ्या पुंडलिकाची भूकतहान आतां माता-

पित्यांच्या सुश्रूषेंत पार हरपून जात असें ! फार काय पण झोपेचें सुद्धां त्याला कैक वेळा विस्मरण पडत असें ! शेवटीं त्याच्या संतुष्ट झालेल्या मातापित्यांनीं त्याला म्हणावे कीं, "बाळ, नीज आतां, पुरे. दमला असशील. जा जाऊन नीज जा." पुंडलिकानेंही त्यावर कष्टानें "हो" असें म्हणावें पण त्याच वेळीं, अशा पवित्र पायांच्या सेवेली आपण इतके दिवस कसें अंतरलों होतों व आपल्या आईबापांचा आपण कसा अपमान करीत होतों हा विचार मनांत आला कीं, त्याचे डोळे पाण्यानें टचकन् भरून येत, व त्यांतले एकदोन बिंदू साहजीकच आईबापांच्या पायावर पडत ! जणूं काय तो त्या अश्रूंच्या फुलांनीं त्यांची पूजाच करीत होता ! पण त्या अश्रूबरोबर त्याच्या प्रेमळ मातापित्यांनीं त्याला विचारावें, "बाळ ! असा रडतोस का ? तुला काय होतें ?" त्यावर पुंडलिकानें स्वतःच्या हृदयांत पेटलेली पश्चात्तापाची आग व त्या आगीच्या आचीनें तापलेले उष्ण अश्रुबिंदू अंतःकरणाच्या भांडयांतून कसे वर उसळत असत तें स्फुंदत स्फुंदत सांगावें. त्यावर त्याच्या आईबापांनीं म्हणावें, "चाललेंच आहे बाळ ! तारुण्याच्या भुलीमध्यें अशा चुका तरुणांच्या हातून होतच असतात." "पण मला मूर्खाला त्या समजूं नयेत काय ?" पश्चात्तापाच्या शोकानें दाटलेल्या कंठानें गद्गद स्वरांत पुंडलिकानें म्हणावें. "हीच तर माया ! असो. बाळ ! आम्ही तुला त्या सर्वांबद्दल क्षमा केली आहेना ? मग जा आतां जाऊन नीज जा." त्याच्या आईबापांनीं त्याच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवीत म्हणावें. "नका, नका ! आई, बाबा, तेवढें मात्र मला सांगूं नका !" आईबापांच्या पायावर डोकें ठेवीत गद्गद स्वरानें पुंडलीकानें म्हणावें, "बाबा, आई, आता ह्या पश्चात्तापाच्या अग्नींत जळणाऱ्या ह्या पाप्याला तुमच्या सेवेचाच काय तो एक शीतल आधार आहे. तुमच्या आजवरच्या केलेल्या अपमानाची फेड तुमच्या अखंड व आजन्म सेवेनें झाली तरच होईल, त्याला दुसरा मार्ग नाहीं हे त्या महात्म्याचे शब्द माझ्या हृदयावर कसे कोरून राहिले आहेत ! व तुमच्या

सं. नि. ३२



सेवेपासून तिळमात्र ढळायचें नाहीं असा मीं निश्चय केला आहे ! फार काय सांगूं बाबा, पण प्रत्यक्ष परमात्मा जरी माझ्यापुढें येऊन उभा राहिला व मला ह्या सेवेपासून परावृत्त करूं लागला तरी त्याचे सुद्धां मी ऐकणार नाहीं. आधीं तुमची सेवा, व मग त्याचें दर्शन. तेव्हां आई, बाबा, ह्या आपल्या लेकराला आपल्या सेवेचें सुख अखंड घेण्याची परवानगी असावी व बालकावर राग नसावा. " असें म्हणून खरोखरच पुंडलीक त्यांच्या पायावर डोकें ठेवीत असे. त्यावेळेस पुत्रप्रेमानें अधिकच गहींवरून त्याच्या प्रेमळ आइबापांनीं त्याला म्हणावें, " छे छे बाळ ! त्यांत राग कशाचा ? पण अशीं तूं जाग्रणें करूं लागलास तर आजारी नाहीं का पडायचास एकादे दिवशीं ? " त्यावर पुंडलिकानें हंसून म्हणावें, "आई, मला आजारी पडायला काय झालें आहे? बायकोची सेवा करतांना आजारी पडलों नाहीं अन् आतां पडेन होय ? तुमच्यासारख्या परमेश्वराच्या चालत्या बोलत्या प्रतिमांचें कृपाछत्र माझ्या मस्तकीं असल्यावर बाबा, मला काय होणार आहे ? अन् त्यांतून पडलोंच आजारी तरी तें तुमच्या सेवेंतच पडेन ना ? मग तें कारणीं नाहीं का लागणार ? त्यानें माझ्या देहाचा व आत्म्याचा उद्धारच होईल ! देवाच्या सेवेंत देह सुद्धा पडावा असें साधूसंतांचें सांगणें आहे. मग माझ्या क्षुद्र आजाराची ती काय कथा ? " अशा तऱ्हेच्या त्याच्या उत्तरानें बापडे आईबाप निरुत्तर होत ! ह्या त्याच्या उत्कट भक्तीपुढें ते तरी काय बोलणार ? "बरें बाळ ! तुला जर संतोष होत आहे तर आम्ही कशाला त्याच्या आड येऊं? तुला वाटेल तितकी सेवा कर बरें! पण आमचा जीव कळवळतो म्हणून सांगितले." एवढेंच ते म्हणत. त्यावर पुंडलीकही. " तुम्हीं कांहीं काळजी करूं नका हा मी आतां झोपतोंच ! " असें म्हणून तसाच तासन् तास सेवा करीत बसे !

अहाहा ! ह्या सेवेला जगांत तोड सापडेल काय ? अशा सेवेनें कोण बरें प्रसन्न होणार नाहीं ? पुंडलिकाचे आईबाप तर प्रसन्न झालेच पण

प्रत्यक्ष परमेश्वर सुद्धां प्रसन्न होऊन त्यास एकदां दर्शन देण्यास आला व पाहतो तों पुंडलीक आईबापांच्या सेवेंत अगदीं दंग झाला असून त्याचें इकडे लक्ष सुद्धां नाहीं ! शंख, चक्र, गदा, पद्म, हीं चार आयुधें चार हातांत चमकत आहेत, पिवळा पीतांबर कासेला कसलेला आहे, झगझगीत रत्नांचा किरीट मस्तकीं शोभत आहे, वैजयंति माळ गळयांत रुळत आहे, कौस्तुभमण्याची शोभा छातीवर पसरली आहे, व कोटी रवींच्या तेजाची प्रभा मुख मंडलावर फाकली आहे अशी ती प्रभूची घन-नीळ सावळी मूर्ति पुंडलिकाजवळ येऊन उभी राहिली असतांना सुद्धा पुंडलीक आपल्या आईबापांच्या सेवेच्या दिव्य समाधींत इतका गुंग झाला होता, कीं त्याचें तिकडे लक्षच जाईना ? अहाहा ? ह्या एकतान-तेचें कौतुक कितीं करावें बरें ? त्याचा एक शतांश जरी आम्हा अभागी जीवांना लाभला तरी आम्ही आपल्याला धन्य धन्य समजू ! असो. पण आतां ही पुंडलिकाची दिव्य समाधि उतरायची कशी आणि कधीं ? हा प्रभूपुढें प्रश्नच येऊन पडला ! अर्थात् त्या पुंडलिकाच्या सेवेच्या समाधीकडे पाहून प्रभूंच्या मनांत आनंदाच्या लाटा सारख्या उसळत होत्या, आनंदाचे रोमांच त्यांच्या शरीरावर उभे राहत होते हें खरें. पण त्याच आनंदभरांत त्या पुंडलिकाला एकदा डोळे भरून पहावा, त्याच्या शुभांगाला एकदा कडकडून आलिंगन द्यावें व त्याला प्रेमानें पोटाशीं धरावें, असें प्रभूला राहून राहून वाटत होतें त्याला कोण काय करणार ? किंबहुना, अशा आनंदाचा सोहळा लुटायला सापडावा म्हणून तर ते दोवर दोन चार हात येऊन त्या ठिकाणीं प्राप्त झाले होते ! अशा तऱ्हेच्या वत्सल रसाच्या लाटा निर्वि-कार भगवंतांच्या हृदयांत सुद्धा कशा उठत असतात हे त्यांनींच आप-ल्याला गीतेंत सांगितलें आहे. ते म्हणतातः—

**“ तो पहावा हे डोहळे। म्हणोनि अचक्षूसी मज डोळे।**
**हातीचेनि लीलाकमळें। पूजूं तयातें ॥ १ ॥**

दोंवरी दोनी । भुजा आलों घेऊनी ।
आलिंगावयालागुनी ।। तयाचें अंग ।। २ ।। "

अहाहा ! धन्य पुंडलीक ! धन्य भगवान् ! असो. ह्याशिवाय प्रभूच्या मनांत पुंडलिकाची कसोटी पहावी, तो आपल्या आईबापांच्या सेवेंत किती तत्पर आहे तें पहावें अशीही एक इच्छा होती ! अर्थात् तो त्या परीक्षेंत उतरणार ही देवांची खात्रीच होती. पण सर्व जगाला त्याचा दाखला मूर्तिमंत पटवून द्यावा असेंही त्यांना वाटत होतें. तेव्हां ह्या दुहेरी उद्देशानें भगवंतानीं पुंडलीकाला वीणेच्या आवाजासारख्या मंजुळ स्वरांत हाक मारली, " पुंडलीक. ! "-- पण पुंडलीक भानावर असेल तर त्याना ' ओ ' देणार ना ? म्हणून देवांनीं पुन्हा एकदा त्याला मोठयानें हाक मारली ' पुंडलिका ! ' त्याबरोबर पुंडलीक आपल्या दिव्य समाधींतून क्षणैक सावध झाला व त्यानें विचारले, "कोण ? कोण आहे ? कोणी मला हाक मारली ? " एकीकडे हातांनीं आईबापांची सेवा सुरूच होती. त्यानें मान सुद्धा वळविली नाहीं ! अहाहा ! ज्या प्रभूच्या नखाचें तरी दर्शन व्हावें म्हणून मोठमोठे योगी हाडाचीं काडें करितात त्याच प्रभूनें आज एका निस्सीम मातापित्याच्या भक्ताला पहाण्यासाठीं व त्याला आलिंगन देण्यासाठीं उतावीळ होऊन तेथें समक्ष आपण होऊन प्रगट व्हावें व त्याला हाका मारीत सुटावें काय ? हा देखावा चित्ताला किती गहिंवर आणणारा आहे बरें ? असो. भगवान् म्हणाले " पुंडलिका ! अरे मी अनंत कोटी ब्रह्मांडनायक प्रत्यक्ष भगवान् आज तुझ्या दर्शनासाठीं आलों आहे ! पुंडलिका ! ये, एकदां येऊन मला भेट रे ! " " कोण ? " पुंडलिक म्हणाला, " ब्रह्माडनायक भगवान् ? अहाहा ! आज मी धन्य झालों. देवा ! माझ्यासाठीं—केवळ माझ्यासाठीं तुम्ही इथवर आलांत ना ? मग खरोखरच मी धन्य आहे ! माझ्या भाग्याला आज खरोखर पारावार नाहीं ! देवा, हा माझा येथूनच नमस्कार घ्या ! " बसल्या जागेवरूनच मानही न वळवितां व एकीकडे

माता पित्यांची सेवा करीत करीत तो सद्गदीत होऊन म्हणाला. देव म्हणाले, " पण पुंडलिका ! मी तुझ्या दर्शनासाठीं आलों असतांना व तूंही त्यामुळें स्वतःला धन्य समजत असतांना तूं इकडे नुसता वळून सुद्धां पहात नाहींस हें काय ? माझ्यावर रागावलास होय ? " " छे छे ! देवा ! " पुंडलीक गहिंवरून म्हाणाला, " ही काय भलतीच कल्पना ! मी आपणावर रागावेन कसा ? तुमच्यावर ज्या क्षणीं मी रागावेन त्या क्षणींच हा देह जागच्या जागींच गळून पडूं दे ! देवा, मी रागावलों नाहीं बरें; पण देवा, मी जर तुमच्याकडे बघितलें तर—तर—त्या लावण्याच्या गाभ्याकडे बघतां बघतां माझी तंद्री नाहीं का लागणार ? आणि अशी तंद्री लागली म्हणजे माझ्या हातांतलें काम नाहीं का त्या भावसमाधींत बंद पडणार ? " " मग त्यांत काय मोठेंसें झालें ? " देव हंसून पुंडलिकाची परीक्षा पहात म्हणाले, " प्रत्यक्ष माझ्या दर्शनानें मातापित्याच्या सेवेंत थोडेसें अंतर पडल्यास काय हरकत आहे ? त्यानें काय तुला पाप लागणार आहे ? " " नका, देवा, नका, आपण मला असा आग्रह करूं नका " गंभीर निश्चयाचें तेज ज्याच्या मुखावर झळकत आहे असा पुंडलीक देवास म्हणाला, " पापपुण्याची गाठोडी मी केव्हांच खुंटीवर बांधून ठेवलीं आहेत. तीं मला मुळींच समजत नाहींत. मातापित्यांची अखंड सेवा ही एकच गोष्ट मी तूर्त जाणत असून त्यापुढें त्रैलोक्यांतील सर्व सुखेंसुद्धां मला तुच्छ आहेत. फार काय देवा, पण प्रत्यक्ष तुम्ही जरी मला या कामीं भुलवायला आलांत तरीसुद्धां चालू कर्मापासून परावृत्त व्हायचें नाहीं अशी माझी प्रतिज्ञा आहे ! आणि देवा ! ती तुमच्यासाठीं सुद्धां मोडण्यास मी तयार नाहीं ! प्रतिज्ञेचा मला गर्व किंवा अहंकार वाटतो म्हणून मी हें बोलतों असें समजूं नका ! पण वैकुंठनायका, ही मातापित्यांची सेवाच इतकी अमोल व अमृतमधुर आहे कीं तीपासून खरोखरच क्षणभरसुद्धां ढळूं नये असेंच वाटतें त्याला कोण काय करणार ? यासाठीं देवा, मला इत-

क्यांतच आपणाकडे बघतां येत नाहीं, आपणांस भेटतां येत नाहीं, याबद्दल मला क्षमा करा ! " अहाहा ! ह्या सडेतोड मातृपितृभक्तीला जगांत तोड सापडेल काय ? भगवंतांच्या हृदयांत पुंडलिकाचें उत्तर ऐकून किती आनंद झाला असेल, व त्याच्या प्रेमाचें भरतें त्यांच्या हृदयांत कसें अधिकच दाटलें असेल याची मुलांनो, तुम्हीच कल्पना करा. त्याच प्रेमाच्या वात्सल्यानें ते त्याला म्हणतात, " पण पुंडलिका ! तुझ्या दर्शनावांचून मी व्याकुळ होत आहेरे ! आणि तूं तर म्हणतोस कीं मातापित्याची सेवा पुरी झाल्याशिवाय तूं मला भेटणार नाहींस ! मग मी करूं तरी काय ? परत वैकुंठलोकास गेलों तरी मला कांहीं सुचणार नाहीं ! सांग, पुंडलिका ! मग तुझी सेवा पुरी होईपर्यंत मी उभा तरी कुठें राहूं ? " जवळच पडलेली वीट आवाजाच्या अंदाजानें देवाकडे फेकून पुंडलीक म्हणाला, " ह्या विटेवर उभे राहा ! देवा, माझी सेवा होईपर्यंत ह्या विटेवर आपण उभे रहा ! आपल्याला द्यायला मज गरिबाजवळ दुसरें आसन नाहीं ! यासाठीं प्रभो ! ह्या विटेवरच आपण उभे राहा ! आणि भगवन् ! ह्या रंकासाठीं आपणाला पडणाऱ्या त्रासाबद्दल ह्या आपल्या दीन दासाला क्षमा करा ! " असें म्हणून पुंडलिकानें क्षणैक हात जोडले, त्यावर मस्तक ठेवलें, प्रेमाचें अश्रु खळखळ गाळले, व तो पुन्हां आपल्या कार्यांत मग्न झाला ! भगवान् त्या विटेवर उभे राहिले ! पुंडलीकाची सेवा संपण्याची वाट पहात विठुराज त्या विटेवर उभे राहिले ! दिवसामागून दिवस आणि वर्षांमागून वर्षें लोटलीं ! फार काय मुलांनों ! तुह्माला सांगितलें तर आश्चर्य वाटेल, पण अठ्ठावीस युगें त्या गोष्टीला झालीं पण अद्याप पुंडलीकाची सेवा चालूंच आहे व त्याच्या भावाला भुललेला भगवान् त्या भेटीची वाट पहात चंद्रभागेच्या कांठीं विटेवर अजून उभा आहे ! खोटे वाटत असल्यास प्रत्यक्ष जाऊन पहा ! अहाहा ! ह्या पुंडलीकाच्या महिमानाचें वर्णन कुठवर करावें ? तें सांगतांना खरोखर वाचा पांगुळते, बुद्धि

कुंठित होते ! म्हणूनच विठ्ठलाच्या प्रसिद्ध आरतींत गोंविलेला हा महिमा तुमच्यापुढें ठेवून मी ही पुंडलिकाची गोष्ट संपविणार आहे ! तुम्ही घरीं देवाची आरती करतां ना ? मग विठ्ठलाची आरती आठवा आणि लागा पाहूं म्हणायला ? म्हणजे–

" युगें अठ्ठावीस विटेवरि उभा " ही पहिलीच ओळ तुमच्यापुढें येईल. हा विठ्ठल, हें परब्रह्म कोणासाठीं उभें होतें ? कोणाच्या भेटीसाठीं तें आलें होतें ? व तें कुठें उभें होतें ?—

**" पुंडलीका भेटी परब्रह्म आलें गा ।**
**चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ "**—

अहाहा ! ह्या ओळींत जो दिव्य इतिहास सांठविला आहे, त्याची जों जों आठवण करावी तों तों खरोखरच अंगावर सात्विकाचे रोमांच उभे राहतात !

मुलांनो, ही कथा मीं तुम्हाला इतकी सविस्तर कां बरें सांगितली ? त्याचें कारण मला तर ती सांगण्याची हौस आणि गोडी होतीच, पण तीपासून तुम्हालाही शिकण्यासारखीं किती तरी **बोधतत्त्वें** निघत आहेत तीं तुम्हाला नीट समजावून द्यावींत व तीं तुमच्या मनावर ठसून तुम्ही पुंडलिकाप्रमाणेंच आपल्या आईबापांची सेवा करावी—त्या सेवेंत अखंड मग्न व्हावें—हाच माझा त्यांत उद्देश आहे ! ऐका तर !—

( १ ) **पहिली गोष्ट** म्हणजे पश्चात्तापानें मनुष्याची शुद्धि होते व तो जर तसाच पुढें अधिकाधिक चांगला वागत राहिला तर त्याची उत्तरोत्तर उन्नतीच होत जाते. इथेंच पहाना. पुंडलिक प्रथम व्रात्य होता. पण पुढें त्याला पश्चात्ताप होऊन तो थोर अधिकाराचा झाला—आईबापांच्या सेवेच्या कामीं त्यांनीं अजरामर कीर्ति करून नांव कमावलें; तें इतकें कीं, अद्यापसुद्धां **"पुंडलीकवरदा हारिविठ्ठल"** म्हणून त्याच्या नांवाचा गजर हजारों वारकरी लोक करीत असतात. मग बोला, मुलांनो तुम्ही जर आपल्या आईबापांशीं कधीं वाईट वागलां असलां तर त्याबद्दल

पुंडलिकाप्रमाणें पश्चात्ताप करून त्यांची पुढें चांगली सेवा करणार ना ? त्यांचा शब्द पाळून त्यांचा मान राखणार ना ?

( २ ) **दुसरी गोष्ट** ह्मणजे सेवा किती तनमनधनानें, एकाग्र चित्त होऊन करावी, ह्याचा दाखला तुम्हाला इथें पाहायला मिळतो. पुंडलिकाजवळ देव येऊन उभा राहिला तरी त्याला त्याचा पत्ता नाहीं ! भूक, तहान व झोंप हींसुद्धां तो त्यापुढें विसरून गेला. मुलांनो ! इतक्या उच्च दर्जाची सेवा जरी तुमच्या हातून झाली नाहीं तरी तुमच्याकडून होईल तितकी जरी तुम्ही केली, व आपल्या आईबापांना सुख दिलेंत, व त्यांच्या आज्ञेंत वागलांत तरी सुद्धां पुष्कळ आहे !

( ३ ) **तिसरी गोष्ट** म्हणजे एकदां एक चांगलें काम पत्करलें, त्यासाठीं प्रतिज्ञा भोंगली, म्हणजे मनुष्यानें त्यापासून कसें ढळूं नये, त्यासाठीं सर्वस्वावर लाथ मारण्यास, त्रैलोक्यांतील सुखेंसुद्धां तुच्छ लेखण्यास कसें तयार व्हावें हें आपणांस पुंडलीकचरित्रापासून कळतें. त्यानें तर देवाच्या भुलावणीला सुद्धां भीक घातली नाहीं !

( ४ ) **चवथी गोष्ट** मातापित्यांची सेवा प्रत्यक्ष परमेश्वरालासुद्धां कशी खेचून आणते व तिच्या जोरावर त्या भक्ताच्या भक्तिनें भुललेला भगवान् कसा युगानुयुगें तिष्ठत राहतो, अर्थात् या दृष्टीनें एकपरीनें हीं मातापित्यांचीं चालतीं बोलतीं जागतीं दैवतें–ईश्वराच्या ह्या साकार प्रतिमा–प्रत्यक्ष देवाहूनही कशा योग्यतेनें अधिक आहेत हें सदर गोष्ट सिध्द करिते !

( ५ ) **पांचवी गोष्ट,** मातापित्यांच्या शुश्रुषेसारख्या दिव्य, उत्कट, पवित्र,मंगल ध्यासाच्या व त्याच्या परिपालनपूर्वक कार्याच्या जोरावर अजरामर कीर्ति प्राप्त करून घेऊन युगप्रवर्तक अथवा सांप्रदायप्रवर्तक कसें होता येतें, आपल्या मागून येणारे लोक त्याप्रमाणें आपली कशी कीर्ति गातात, हें इथें दिसून येतें. कारण त्यामध्यें जगावर उपकारच तसे होतात ! इथेंच पहा !—

" **पुंडलिकें केला गोवा । तो या भावा सांपडला ॥** "
इत्यादि प्रकारचे किती तरी भक्तिमार्गीय साधुसंताचे उद्गार आहेत कीं ज्यांत " भक्तिमार्गाचा पहिला वीर ! " म्हणून पुंडलिकाची प्रत्येकानें पाठ थोपटली आहे–त्याची वाहवा केली आहे ! असो.

\+ + +

याप्रमाणें पुष्कळच उत्तमोत्तम तत्त्वें पुंडलिकाच्या पावन चरित्रांत आपणांस पहावयास मिळतात. त्यांचा विचार करावा तितका थोडाच. पण मुलांनो, तुमच्यासाठीं त्यातलीं चारपांच रत्नें काढून तुमच्या हातीं दिलीं आहेत ! त्यांचा योग्य उपयोग करा बरें ! आतां आपण ऐतिहासिक पुरुषांच्याकडे वळूं !

तुम्हाला माहीतच असेल कीं, **शिवाजीमहाराज** आपल्या मातेचा फार मान ठेवीत असत. मोठेपणीं म्हणजे राज्य हाकावयास लागल्यावर सुद्धां ते आपल्या " आईसाहेबां "चा शब्द होतां होईतों खालीं पडूं देत नसत! खरोखर केवढी ही मातृभक्ति ! अशा मातृभक्त पुरुषावर समर्थांचें छत्र आणि परमेश्वराचीही कृपा व्हावी आणि जगन्माता भवानीनेंही त्यांना वारंवार ' अभय ' देऊन त्यांचा उत्कर्ष करावा व असा पुरुष लवकरच भाग्यास चढावा हें किती बरें साहजीक आहे ! यावरून आईची भक्ति आणि सेवा हीं कधींही फुकट जात नाहींत–ती कधींना कधीं तरी व कांहींना कांहीं तरी चांगलें फळ दिल्याशिवाय राहत नाहीं, असें आपणास दिसून येतें.

तसेंच **नेपोलियन बोनापार्ट** म्हणून जो फ्रान्स देशाचा प्रख्यात स्वातंत्र्यवीर होऊन गेला व ज्याचें नांव तुम्ही सुद्धां ऐकलें असेल, तो सुद्धां असेंच म्हणे कीं–" माझ्यांत ज्या कांहीं चांगल्या गोष्टी असतील त्या सर्व माझ्या मातेमुळें आहेत. ते उपकार तिचे आहेत ! " मग सांगा बरें आतां मुलांनो, कीं अशा आपल्या मातेचा मान आपण किती ठेवला पाहिजे तो ! पण आतां हें तत्त्व तुमच्या मनावर पक्कें ठसलें

असेल यासाठीं त्या कामीं आतां अधिक वेळ न घालवितां, चला मी तुम्हाला आतां तुमच्या पित्याकडे घेऊन जातों म्हणजे झालें !

## पिता.

आईच्या अलोट प्रेमसागरांत डुंबणाऱ्या बालकाचे सर्व बाजूंनीं कल्याण करण्यासाठीं मातेनंतर पित्याचीच योजना आहे व प्रेमाच्या बाबतींतही मातेच्या खालोखाल पित्याचाच अधिकार आहे ! म्हणूनच "**मातृदेवो भव**" यानंतर "**पितृदेवो भव**" म्हणून मातेनंतर पित्यालाच वंदन करण्याची आज्ञा उपनिषदांनीं केली आहे ! बालकावर होणाऱ्या उपकारांच्या दृष्टीनें पाहिल्यास खरोखर मातेइतकेच पित्याचेही उपकार या बालकावर होत असतात. जगांत जन्म घेणाऱ्या प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणीं कोमल भावाप्रमाणेंच कठोर भावही असावे लागतात. त्याशिवाय चांगल्या प्रकारें संसारयात्रा त्याच्याकडून होणें शक्य नाहीं ! या कोमलकठोर भावांकडे दृष्टि फेकल्यास कोमल भावांचें पोषण जर मातेकडून मुख्यत्वेंकरून होत असेल तर कठोर भाव त्या बालकाचे ठायीं बिंबविण्यास त्याचा पिताच मुख्य कारण होत असतो. नुसत्याच कोमल भावानें या कठोर जगतांत निभाव लागणें कठिण आहे. "**अरे हा धकाधकीचा मामला । कैसा सोसे अशक्ताला ?॥ सर्व बुद्धि शक्ताला । म्हणोनि सांगाव्या ॥ १॥**" ह्या श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या उपदेशांत दिसतो त्याहून फारच व्यापक अर्थ आहे–फार मोठा व फार खोल अर्थ भरला आहे. अर्थात् प्रस्तुत प्रकरणींही तो लागू असून या जगाच्या, संसाराच्या 'धकाधकीच्या मामल्यांत' केवळ कोमल भावानें येणाऱ्या 'अशक्ते'नें निभाव लागणार नाहीं, यासाठीं प्रत्येक पिता आपल्या पुत्राचे ठायीं केवळ कोमल भाव पाहून संतुष्ट न होता त्या 'अशक्त' मुलाला प्रथम 'सशक्त' व दणकट करून अथवा बनवून मग कोमलवृत्तीबरोबरच

कठोर वृत्तींचें पोषणही त्याचे ठायीं करीत असतो अथवा नीट होत आहेना हें पहात असतो. केवळ कोमल आणि मृदु अशा वस्तुनींच कार्यभाग होता तर परमेश्वरानें कठिण वस्तूच जगांत निर्माण केल्या नसत्या. पण जगांत पुष्पांचें जसें प्रयोजन आहे तसेंच वज्राचेंही आहे; साधूंच्या सुवासासाठीं पुष्पें तर दुष्टांच्या निर्दलनासाठीं वज्रच हवें. तिथें पुष्पांचा कितीही मारा केला तरी काय उपयोग होणार ? म्हणूनच अशा कोमल–कठोर वृत्तींचें गोड मिश्रणच ह्या जगांत मानवाची खरी तेजस्वी कर्तबगारी प्रगट करीत असतें. तुकोबासारखे सर्वब्रह्म झालेले शांतिचे सागर सुद्धां यासींठाच म्हणत असतात कीं—

**" मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसें ॥**
**भले तरी देऊं नेसूंची लंगोटी । नाठाळाचे पाठीं हाणूं सोटा ॥ "**

एकंदरींत काय, कीं केवळ कोमल भावानें जगांत निर्वाह लागत नाहीं. आणि म्हणूनच ' लोकोत्तर ' पुरुषांचें चित्तसुद्धां प्रसंगीं ' वज्रापेक्षांही कठोर' तर प्रसंगीं 'फुलापेक्षांही मऊ' होत असतें. ही जर लोकोत्तर पुरुषांची कथा तर सामान्य माणसांना तर काय, विचारायलाच नको. त्यांच्या ठिकाणीं दोन्ही प्रकारच्या वृत्तींचा वास अवश्य असलाच पाहिजे. जगांत जसें मृदु वस्तुबरोबरच कठिण वस्तूंचें कार्य आहे म्हणून त्या निर्माण झाल्या, त्याचप्रमाणें कोमल भावाबरोबरच कठिण भावांचेंही कार्य आहे म्हणूनच त्या वृत्ति परमेश्वरानें प्रत्येक मानवाचे अंतःकरणांत सूक्ष्म रूपानें ठेवलेल्या आहेत. त्या दोन्हींचीही वाढ योग्य प्रमाणांत होणें अवश्यक आहे. नुसतीच शीतलता किंवा नुसतीच उष्णता कामाची नाहीं. चंद्र शीतल खरा, पण तो केव्हां ? सूर्यप्रकाशानंतर ! पण तेंच चंद्रच सारखा प्रकाशत राहता तर–तर काय झालें असतें हें मुलांनो, तुम्हाला न सांगतांही समजण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें सूर्यप्रकाशाचीही गोष्ट आहे ! नुसता सूर्याचाच प्रकाश जर सदैव राहील तर किती हानी होईल याचा तुम्हीच विचार करा ! हीच गोष्ट दिवस–रात्र, उन्हाळा-

हिवाळा, प्रकाश-सावली, कठिण-मृदु, इत्यादि जगांतल्या सर्व दुकलींना लागू आहे. अर्थात् चंद्रप्रकाशांतील अमृतमधुर आनंद व जीवन जर मातेच्या प्रेमांत आपणांस प्रतिबिंबित झालेलें दिसत असले, तर रोगकारक कृमिकीटकांचा संहार करून तेजस्वी प्रकाशाचें व्यवहार-कार्य पित्याच्या शिक्षणांतच आपणांत दिसून येतें. रात्रीच्या शांत विश्रांतीचें सुख जर मातेच्या प्रेमाची शिकवण देत असली, तर दिवसाच्या प्रचंड घडामोडीचा व उद्योगाचा आनंद पित्याची वत्सलता आपणांस शिकवीत असते ! मातेला जर चंद्राची उपमा दिली तर पिता हा सूर्य आहे. माता रजनी तर पिता दिवस होय! मग सांगा बरें मुलांनो, यांतील कोणच्याही एकावरच संतुष्ट राहून चालेल काय ? त्यानें तुमचें जगांतलें जीवन सुखरूप होईल काय ? यासाठीं लक्षांत ठेवा कीं, तुमच्या आयुष्याचें चित्र घडविण्यांत जितका मातेचा अधिकार तितकाच पित्याचा, जितकें मातेचें कार्य तितकेंच पित्याचें आहे हें कधींही विसरूं नका.

अहाहा ! मुलांनो, तुमचे वडील तुमच्यासाठीं, तुमच्या कल्याणा-साठीं किती खटपट करीत असतात, याची तुम्हांला कल्पना तरी आहे काय ? ‘ मुलगा म्हणजे प्रत्यक्ष आपलीच ती दुसरी मूर्ति ’ असें वाटून आपणाप्रमाणेंच, किंबहुना, आपणाहून अधिक सुखांत आपल्या-मुलानें रहावें, आपण जें मिळविलें नाहीं तें आपल्या मुलानें मिळवावें, आप-ल्यापेक्षांही आपल्या मुलाची कीर्ति अधिक व्हावी व ‘बापसे बेटा सवाई’ ह्मणून ज्यानें त्यानें त्याची पाठ थोपटावी, अशीच प्रत्येक पित्याची इच्छा अस-ते. पण अशी इच्छाच केवळ धरून न राहतां त्याप्रमाणें प्रत्येक सुज्ञ पिता किती खटपट करीत असतो, घरीं दारीं त्यास कशी तीच काळजी असते याचा मुलांनो, तुह्मी कधींतरी विचार केला आहे काय ? तुमच्यासाठीं तुमचे आईबाप किती खटपट करतात याचें चित्र ‘मध्वमुनीश्वर’ नांवाच्या कवीनें श्रीकृष्णाच्या तोंडून, ‘ उद्धवा, शांतवन कर जा ’ ह्या आपल्या

प्रसिद्ध पदांत वदविलें आहे. श्रीकृष्ण उद्धवाला गोकुळांत जाण्यास सांगत आहेत व तिथले प्रेमळ देखावे स्मरून गहिंवरून बोलत आहेत असा हा वत्सलरसपूर्ण बहारीचा प्रसंग आहे. त्या प्रसंगीं भगवान् ह्मणतात, " उद्धवा, माझ्या आईबापांचे माझ्यावर किती प्रेम व मी मोठे व्हावे, शहाणे व्हावें, बळवान् व्हावे ह्मणून त्यांची किती खटपट ? " **जन्मलो तैंहुनी झटले । मजलागीं तिळतिळ तुटले । कटिखांदि वाहता घटले । आटले रक्त देहाचे !॥**" अहाहा ! ह्या चारच ओळींत 'मध्व मुनीश्वर' कवीनीं आईबापांच्या प्रेमळ प्रीतीचें किती सुंदर चित्र रेखाटलें आहे ! आपल्या जन्मापासून आपले आईबाप आपणासाठीं किती झटत असतात, आपल्या काळजीनें ते कसे तिळतिळ तुटत असतात याची मुलांनो, तुह्मांला कल्पना तरी आहे काय ? पण क्षणभर विचार करा ह्मणजे तुह्माला तें समजून येईल ! आणि अशा आईबापांना आपण उलट आपल्या हेकटपणाच्या कृतीनें कशा लाथा मारतो याची तुमची तुह्मासच लाज वाटेल. मग तुमचें खरें कर्तव्य काय बरे ? आईच्या बाबतींतलें तुमचें कर्तव्य मी तुह्माला सांगितलेंच आहे. तेंच पित्याच्याही बाबतींत लागू असून पित्याच्या इच्छेप्रमाणें अपार संपत्ति व अगाध कीर्ति मिळवून आपल्या पित्याला संतोषित करणें हेंच तुमचें कर्तव्य ठरत नाहीं काय ? किंबहुना, असें जो करील, पित्याच्या आज्ञेंत वागून, त्याचा मान राखून त्याच्या इच्छेप्रमाणें जो नांव कमवील व पित्याच्या वृद्धापकाळीं त्यास जो सुख देईल, तोच खरा पुत्र असेंच एका कवीनें आपणांस सांगितलें आहे. यासाठीं—

" **जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच ।** "

ही त्या कवीची ओळ, मुलांनो, तुमच्या हृदयावर नेहमीं कोरून ठेवा व तशी ती ठेवण्याच्या लायकीचीच आहे असें तुम्हाला सुद्धां नाहीं कां वाटत ?

अशा तऱ्हेनें पित्याच्या शब्दाप्रमाणें कोण वागला, त्याचा शब्द खरा करण्यासाठीं, त्याची इच्छा तडीस जावी म्हणून कोणच्या सुपुत्रांनीं आपल्या सुखावर सुद्धां लाथ मारली, त्याचीं एकदोन वेंचक उदाहरणें मी तुम्हांला आतां सांगणार आहे ! मुलांनो, राजा रामचंद्राची गोष्ट तुम्हाला माहीत आहे ना ? पहा बरें, पित्याचा शब्द खरा करण्यासाठीं, त्यानें कैकयीला दिलेलें वचन पुरें करण्यासाठीं, रामानें ऐन तारुण्याच्या भरांत, एकीकडे युवराजपदाचा समारंभ जारीनें चालू असतां, अगदीं शांतपणें, अंगावरचीं बहुमोल अशीं वस्त्रेंच नव्हे, तर प्रत्यक्ष राज्य सुद्धां त्या वस्त्राप्रमाणेंच दूर झुगारून दिलें व वल्कलें नेसून तो अरण्यांत गेला, व १४ वर्षांचा वनवास त्यानें आनंदानें स्वीकारला ! अहाहा ! किती हें रामाचें अलोट पितृप्रेम व केवढी त्याची उत्कट भक्ति ! आपल्या बापाचा शब्द खालीं पडूं नये म्हणून शांतपणें ऐन तारुण्याच्या भरांत वनवास स्वीकारण्यास तयार होणाऱ्या रामाच्या चित्राकडे, त्याच्या चरित्राकडे पाहिलें कीं, मन कसें त्याच्या विषयींच्या आदरानें व भक्तीनें भरून येतें ! नाहीं ?

दुसरें उदाहरण भीष्मांचें ! मुलांनो, तुम्हाला ह्या भीष्माचार्यांची गोष्ट माहीत असेलच ? शंतनुराजाची इच्छा मत्स्यगंधेशीं लग्न करण्याची आहे, पण आपण जर लग्न केलें तर आपल्या पित्याची इच्छा पुरी होणार नाहीं, त्याला मत्स्यगंधेशीं विवाह करतां येणार नाहीं, हें पाहून, “ मी आजन्म ब्रह्मचारी राहीन ! ” अशी त्यांनीं भयंकर प्रतिज्ञा केली व म्हणूनच त्यांना “ भीष्म ” ( म्हणजे भयंकर ) असें नांव मिळालें ! अहाहा ! ह्या कडकडीत प्रतिज्ञेकडे पाहिलें म्हणजे खरोखर बुद्धीला गरगर फिरल्यासारखें वाटतें ! पण बुद्धीचा भोंवरा असा गरगर फिरवावा तेव्हांच खरें नांव मिळतें ! गाद्यागिरद्यांवर लोळून नांव मिळत नसतें ! मुलांनो, भीष्मांनीं हा केवढा मोठा स्वार्थत्याग केला, पित्याच्या इच्छेसाठीं केवढ्या मोठ्या सुखावर

त्यांनीं लाथ मारली बरें ? ज्या सुखासाठीं सगळें जग, नव्हे सर्व त्रैलोक्य आज लाळ घोटीत आहे त्या सुखावरही लाथ मारणारे बहाद्दर वीर आपल्या ह्या हिंदुस्थानांत निघाले आहेत. आमचा भीष्म हा त्यांतलाच एक वीर होता ! व हा त्याचा पराक्रम पित्याच्या इच्छेसाठीं त्यानें केला होता ! आपल्या स्वताच्या लग्नाच्या इच्छेची बेडी त्यानें ताडकन् तोडली, व आपलें मन किती थोर आहे, पित्याच्या सुखासाठीं तें सर्वस्वावर सुद्धां लाथ मारण्यास कसें तयार आहे हें त्यानें सर्व जगाला दाखवून दिलें !–ह्या चित्राचा धडा त्यानें सर्वांच्या पुढें ठेवला ! मुलांनो, ह्या दिव्य स्वार्थत्यागानें त्याच्या पित्याला किती गहिंवरून आलें असेल बरें ? देवांनासुद्धां भीष्माचें कौतुक वाटून त्यांनीं आकाशांतून त्याचे-वर पुष्पवृष्टी केली व " धन्य ! धन्य ! " असे उद्गार काढले ! !

मुलांनो, वरील दोन उदाहरणांवरून काय बोध निघतो तो आतां मी येथें वेगळा सांगितलाच पाहिजे काय ? आंधळ्याला सुद्धां तो समजण्यासारखा आहे. मग मी त्यासाठीं उगीच कशाला जागा अडवूं ? यासाठीं तो बोध तुम्हीं घ्या, तरच तुमची जगांत कीर्ति होईल एवढेंच शेवटीं सांगून, चला मी आतां तुम्हांला तुमच्या बहीणभावंडाकडे घेऊन जातों ! कारण तीं पाहिलींत का, केव्हांची आपली वाट पहात बसलीं आहेत तीं ?

——×——

## बहीणभाऊ.

प्रत्यक्ष रक्ताचा संबंध असलेल्या नात्याच्या सांखळींतले हे शेवटचे दोनच दुवे आतां राहिले असून त्यांच्याबद्दलच मी आतां तुमच्याशीं बोलणार आहे. मुलांनो, हे दुवे शेवटचे असले तरी " Last but not the least " ह्या इंग्रजी म्हणीप्रमाणें ते कमी महत्त्वाचे मात्र नाहींत हो ?

मुलांनो, तुमच्यांपैकीं बहुतेकांना बहिणभाऊ असतीलच. कांहीं वडील असतील, कांहीं लहान असतील; त्या सर्वांशीं तुम्ही प्रेमानें वागा व तुमच्याहून वडील असतील त्यांच्याशीं आदरानें वागून त्यांचा योग्य तो मान ठेवा, हेंच माझें तुम्हांस पुनः पुन्हा सांगणें आहे. आतां आपण बहिण व भाऊ यांच्यासंबंधीं वेगवेगळा विचार करूं या.

प्रथम बहिणीची गोष्ट घेऊं. आपल्या बहिणींवर आपण नुसतें प्रेम करूनच भागणार नाहीं, तर त्यांच्याविषयीं आपणांस योग्य तो अभिमान वाटला पाहिजे व जरूर तेव्हां त्यांच्या संरक्षणासाठीं आपण धांवून गेलें पाहिजे. अशा तऱ्हेच्या अलोट भगिनीप्रेमाचें व भगिनी-विषयींच्या अभिमानाचें मी तुम्हांस एक उदाहरण सांगणार आहे, तें मुलांनो, तुम्ही नीट लक्ष्य लावून ऐका म्हणजे आपलें भगिनीप्रेम किती उत्कट असावें, "माझी बहीण" हा अभिमान आपल्या ठिकाणीं कसा सदैव जागृत राहिला पाहिजे हें तुम्हांस समजून येईल !

तें उदाहरण म्हणजे प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णाचें होय ! श्रीकृष्णांनीं द्रौपदीला आपली पाठची बहीण मानलें होतें हें तुम्हांस ठाऊकच असेल. द्रौपदी ही श्रीकृष्णाची सख्खी बहीणसुद्धां नव्हती बरें. पण असें असतांही जिला एकदां पाठची बहीण म्हणून मानलें त्या द्रौपदीविषयीं भगवंतांनीं इतकें अलोट प्रेम व्यक्त केलें कीं, तसें प्रत्यक्ष सख्या बहिणीच्या बाबतींतही त्यांनीं क्वचितच प्रगट केलें असेल! अहाहा! श्रीकृष्णाचें, त्या द्वारकाधीश भगवंताचे द्रौपदीवर किती अलोट प्रेम होतें म्हणून सांगावें ? त्या प्रेमाला व त्या अभिमानाला जगांत दुसरी तोड सांपडेल काय ? द्रौपदीचा भावही भगवंताचे ठिकाणीं तसाच अलौकिक होता. व त्या भावाला भुललेल्या भगवंतांनीं तिचा कसा जागोजाग पाठपुरावा केला त्याची उदात्त कथा महाभारतांत व्यासांनीं फारच उत्कृष्ट रीतीनें सांगितली आहे ! द्रौपदीवर सर्वांत दुर्धर आणि कठिण प्रसंग तिच्या वस्त्र-

हरणाच्या वेळीं आलेला होता. प्रत्यक्ष द्रौपदीचे पांच पतीही त्यावेळीं दुसऱ्याचे दास झाल्यामुळें उपयोगी पडूं शकले नाहींत ! अशा कठिण प्रसंगीं तिच्या सत्वरक्षणास कोण बरे धावून आले असेल ? अहाहा ! तिचा मानलेला भाऊ भगवान् श्रीकृष्णच त्यावेळीं धावून आला व त्यांनीं तिची लज्जा रक्षण केली ! त्या दुष्ट दुर्योधनाच्या सभेंतील चांडाळांना आपल्या दिव्य तेजाची जरब देऊन त्यांनीं गप्प बसविलें व द्रौपदीचें नखही उघडें पडूं दिलें नाहीं ! ह्या अलोट भगिनीप्रेमाकडे पाहिले म्हणजे मनाला किती गहिंवर येतो व " धन्य भगवान् ! धन्य द्रौपदी !" असे उद्गार अगदीं नकळतआपल्या मुखावाटें बाहेर पडतात ! नाहीं बरें ?

आतां आपण आपल्या भावांशीं कसें वागावें ह्याकडे वळूं. यासंबंधी सुरवातीलाच सामान्यपणें इतकें नक्की सांगतां येईल कीं, जें बहिणींच्या बाबतींत लागू तेंच भावांच्याही बाबतींत लागूं आहे. आपणाला आपल्या भावांचा आपल्या बहिणीइतकाच अभिमान असला पाहिजे व त्यांच्याइतकेंच प्रेमही पण आपणांस वाटलें पाहिजे, किंबहुना, कांकणभर जास्तच वाटायला हवें. कारण आज नाहीं उद्या आपली बहीण परक्याची भार्या होणार असून साहजीकच तिच्या अभिमानाची व प्रेमाची माणसें तिला दुसरीं मिळणें शक्य असतें—अर्थात् त्यामुळें निकटपणाचें नातें सहजच थोडेसें दुरावतें व त्यामुळें पूर्वींच्या प्रेमाच्या उत्कटतेंत व अभिमानांत कांहींसें शैथिल्य सहजच प्राप्त होतें. पण भावांची गोष्ट फार निराळी आहे. जन्मापासून मरेपर्यंत ते एकमेकांचे भाऊच राहतात ! ते इतर कोणाचेही कोणी होत नाहींत, व झाले तरी बंधुप्रेमाचा व अभिमानाचा पाश ढिला करण्याइतकें तें नातें नक्की बळकट नसतें. याही उप्पर कोणी तसें करूं गेल्यास त्यांत त्यांचाच आत्मघात आहे हें त्यांनीं पूर्ण लक्षांत ठेवावें.

याप्रमाणें आजन्म टिकणाऱ्या ह्या नात्याचा दृढ पाश इतका बळकट

असावा, त्यातील प्रेमाची उत्कटता व अभिमानाची आतुरता इतकी दिव्य, पवित्र, मंगल असावी कीं, त्या तेजस्वी अभिमानाकडे व त्या सात्विक प्रेमाकडे पाहून प्रत्येक मानवानें मानच डोलवावी, त्याचें हृदय आनंदानें भरून यावें, त्याच्या नेत्रांतून अश्रूंचा पूर वहावा, व गहिंवरलेल्या कंठानें, "अहाहा ! धन्य ! धन्य !" असे धन्योद्गार त्याचे मुखांतून बाहेर पडावेत ! ते तसे पडले, तरच ती खरी बंधुप्रीति व बंधुप्रेम ! व तरच त्या कामीं आपण आपलें कर्तव्य केलें असें होणार आहे. अशा तऱ्हेच्या अलोट बंधुप्रेमाचे पुतळे आपणांस " **रामायण** " व " **महाभारत** " ह्या आर्यांच्या दिव्य ग्रंथांतून कितीतरी पहावयास सांपडतात ! किंबहुना, अशाप्रकारचे निरनिराळे धडे जगाला शिकवावेत म्हणूनच रामचंद्राच्या पावन चरित्राची पवित्र कथा व पांडवांच्या मंगल जीवनाचें रम्य कथन अनुक्रमें वाल्मीकि व व्यास ह्या अधिकारी महर्षींनीं केलेलें आहे हें मुलांनो, तुम्ही कधींही विसरूं नका, व इतर सटर फटर पुस्तकें वाचण्यापेक्षां ते दोनच ग्रंथ पुनःपुन्हा वाचून त्यांचें मनन करीत जा म्हणजे तुमचें जन्माचें कल्याण झाल्याशिवाय राहणार नाहीं ! कारण तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टी तर त्यांत आहेतच व त्या सांगता सांगताच वर मीं सांगितलेले निरनिराळ्या प्रकारचे धडे व्यासवाल्मिकींनीं तुमच्या मनावर आपल्या गोड वाणीनें ठसविलें आहेत ! त्यांतल्या बंधुप्रेमाचे धडे आतां आपणांस पहावयाचे आहेत; आपल्या अलोट बंधुप्रेमानें ज्यानीं आपलें नांव अजरामर करून ठेवलें त्या कथा मी आतां तुम्हांला थोडक्यांत सांगणार आहे !

प्रथम " **रामायणच** " घ्या ! त्यामध्यें राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न ह्या दशरथ राजाच्या चार पुत्रांत केवढा दांडगा बंधुभाव आपणांस दिसून येतो बरें ? अहाहा ! त्या उच्च व सात्विक बंधुप्रेमाची नुसती आठवण झाली तरी:सादर आनंदानें ऊर भरून येतो व डोळ्यांत सात्विक भावाचे अश्रू चमकत असतांनाच "धन्य ! धन्य !" असे उद्गार आपल्या

मुखावाटें बाहेर पडतात ! पहा बरें, वास्तविक राम, लक्ष्मण, व भरत व शत्रुघ्न हे सख्खे भाऊ सुद्धां नव्हते; ते सावत्र भाऊ होते. पण त्या सर्वांत राम हा सर्व गुणांनीं श्रेष्ठ असल्यामुळें केवळ गुणांवर प्रेम करायचें, प्राणापेक्षां सुद्धां जास्त ममत्व त्यासंबंधीं धरायचें, ह्याच एका उदात्त हेतूनें प्रेरित होऊन, व ते गुण प्रभू रायरायाचे ठायीं एकत्र वास करतात असें पाहून, त्या सुस्वभावी व प्रेमळ रामावर सर्व भावांचें निरतिशय प्रेम होतें. त्यांतल्या त्यांत लक्ष्मण व भरत यांनीं जें अलोट प्रेम दाखविलें त्या त्यांच्या उत्कट प्रेमाचें किती बरें कौतुक करावें ? जितकें करावें तितकें थोडेंच असेंच कोणाही रसिक वाचकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं !

प्रथम **भरताचीच** गोष्ट आपण घेऊं ! वास्तविक अयोध्येचें राज्य त्याच्या पायाशीं लोळत आलेलें होतें. आतां तें त्याच्या आईनें दुष्टपणानें त्याच्यासाठीं मिळविलें होतें ही गोष्ट खरी. पण दुसऱ्याच्या दुष्टपणानेंच नव्हे तर स्वतःही दुष्टपणा करून क्षुद्र संपत्तीचीं हाडकें चघळणारीं कुत्रीं आपल्या हल्लींच्या मानवी समाजांत किती तरी दिसतात ! मग प्रत्यक्ष राज्यलक्ष्मीसाठीं तर हे क्षुद्र कीटक दुसऱ्याची नरडी फोडण्यास सुद्धां कमी करायचे नाहींत हें उघड आहे. पण मुलांनो, आपला भरत ह्या जातीचा क्षुद्र कीटक नव्हता. तो अत्यंत उमद्या मनाचा तरुण होता, अन्यायाची, दुष्टपणाची आणि कपटाची, त्याला अत्यंत चीड होती व त्याच्या रामरायावर त्याचें अलोट प्रेम होतें ! अर्थात् मातेनें मिळविलेली ही अन्यायाची राज्यलक्ष्मी त्याला क्षणभरही न मानवतां जटावल्कलें लेऊन त्यानें रामापाठोपाठ वनांत धांव घ्यावी हें किती साहजीक आहे बरें ? कारण रामावरील त्याचें प्रेम व भक्तिच तशी अलौकिक होती ! रामावांचून क्षणभरही त्यास करमत नसे; राम क्षणैक दृष्टिआड झाल्यास कावऱ्या बावऱ्या नजरेनें तो इकडे तिकडे पाहात असे ! सदा रामाचें ध्यान व रामाचेंच गुणगान तो करीत असे,

व त्यांतच त्याला परमानंद वाटत असे ! रामरायाचा छंद त्याच्या चित्ताला इतका लागलेला होता कीं, त्याची जिव्हा रामाचेंच नांव घेत होती, मनाचा लय रामाचे ठायींच झाला होता, फार काय, प्रत्यक्ष रामाप्रमाणेंच राजवस्त्रांचा त्याग करून त्यांना स्पर्शही न करता, तो तसाच वल्कलें नेसून रामापाठोपाठ वनांत गेला, व भागीरथीच्या पलीकडील तीरावर प्रभू रामराय दिसल्यावर, त्या मनोहर मूर्तीचें दर्शन झाल्यावर, एखाद्या मुलाची चुकलेली आई त्याला भेटल्यावर ज्याप्रमाणें तो आनंदानें स्फुंदत "आई" म्हणून तिला मिठी मारतो, त्याप्रमाणें भरतानें तत्काळ रामरायाच्या चरणीं लोळण घेतली व रामावरील अलोट प्रेमानें तो ओक्साबोक्शी रडूं लागला ! रामानें त्याला लगेच उचलून आपल्या मांडीवर घेतलें, त्याचे डोळे पुसले, व प्रेमानें त्याचें मुख कुरवाळून त्याचें शांतवन केलें. "वेडा, नको रे, असा रडूं नकोस !" प्रभू सद्गदीत होऊन म्हणाले ! "रामा, मला टाकून तुम्ही इकडे आलांत ना ? रामा, तुमच्यावांचून मला क्षणभरही करमत नाहीं हो ! चला, परत अयोध्येला चला, व तिथें आनंदानें राज्य करा !" भरत शोकानें दाटलेल्या कंठानें म्हणाला. "नको, बाळा ! मला असा आग्रह करूं नकोस ! तुझ्यासारख्या अत्यंत प्रेमळ भावाचा शब्द मोडण्याचें माझ्या जीवावर येईल. पण बाळा भरता ! आपल्या पित्याचा शब्द आपण खरा करायला नको का ? यासाठीं मला असा पेचांत पाडूं नकोस, व मला मोकळ्या मनानें चौदा वर्षें वनांत जायला संमति दे!" रामचंद्र म्हणाले. "हाय ! चौदावर्षें !" भरत शोकाविव्हल होऊन म्हणाला, "रामा ! तोंवर माझें कसें हो होईल ? रामा, तुमच्या दर्शनावांचून व्याकुळ झालेल्या ह्या तुमच्या धाकट्या भावाचा जीव तोंवर जगेल तरी कांहो ? तो तडफडून तडफडून केव्हांच निघून नाहीं का जाणार ?" "कर्तव्याच्या बैठकीवर बसवून त्याला प्रभूच्या गोड नांवाचें अमृत रोज पाजीत जा म्हणजे भरता, मी येईपर्यंत तुला देहधारण सुलभ

होईल ! " रामानें त्याचें शांतवन केलें. " पण रामा, तुमच्या सांवळ्या मूर्तीच्या दर्शनाच्या आनंदाला आम्हांस मुकावें लागणारच ना ? रामा ' दुधाची तहान कधीं ताकावर ' भागली आहे काय ? यासाठीं प्रभो, केवळ निरुपाय म्हणून आम्ही परत जात असलो तरी देवा ! तुमच्या वाटेकडे आमचे डोळे सारखे लागून राहिलेले असणार हें केव्हांही विसरूं नका, व १४ वर्षें झाल्याबरोबर ह्या भरतासाठीं धांवून या बरें ? कारण, त्यानंतर तुमचें दर्शन झालें नाहीं तर हा देह तत्काळ भूमीवर गळून पडेल व त्या पिंजऱ्यांत तडफड करणारा जीव त्यांतून मोकळा झाल्यावर पक्ष्याप्रमाणें भरारी मारीत रामा, तुमच्या शोधासाठींच भटकत राहील ! यासाठीं, वनवासाच्या उन्हाळ्याच्या अखेरीस आपल्या घननीळ देहाचें दर्शन ह्या तहानेलेल्या चातकाला लवकर होऊंद्या ह्मणजे मोराप्रमाणें मी आनंदानें तुमच्यापुढें नाचेन व तुमची स्तुतिस्तोत्रें गाईन ! " गहिंवरून भरत ह्मणाला. शेवटीं ' केवळ रामाची आज्ञा ' ह्मणूनच तो परत गेला व रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून, सिंहासनाला स्पर्शही न करितां, रामाच्या नावानें, केवळ कर्तव्य ह्मणून त्यानें राज्याचा गाडा १४ वर्षें हांकला व तोही अयोध्येंत न राहता नंदिग्रामीं एखांद्या तापस्याप्रमाणें पर्णकुटिकेंत राहून! ह्या अलोट बंधुप्रेमाला दुसरी तोड सांपडेल काय ?

दुसरें उदाहरण **लक्ष्मणाचें** घ्या ! लक्ष्मणाचें रामप्रभूवरचें प्रेम किती आत्मनिरपेक्ष व उदात्त होतें याची मुलांनो, तुह्मांला कल्पना तरी आहे काय ? रामाबरोबर आनंदानें चौदावर्षें वनवास आपण होऊन, आपखुशीनें, तशी कैकयीची अट नसतांना सुद्धां, स्वीकारण्यास तयार होणाऱ्या महात्म्या लक्ष्मणाची धन्य--त्रिवार धन्य होय असें कोण ह्मणणार नाहीं ? मुलांनो, आपण आपल्या भावाशीं खुद्द आपल्या चिमुकल्या संसारांत सुद्धां किती क्षुद्र स्वार्थबुद्धीनें वागतो याचा विचार करा ह्मणजे लक्ष्मणाच्या थोरवीचें, त्याच्या अलोट स्वार्थत्यागाचें, व

त्याच्या निस्सीम बंधुप्रेमाचें महत्त्व तुह्मांला कळून येईल ! स्वार्थत्याग तरी उगाच कां होत असतो ? जेथें प्रेम नाहीं तेथें स्वार्थत्याग नाहीं, किंबहुना, प्रेमाच्या पोटींच स्वार्थत्यागाचा जन्म असतो हें मुलांनो, तुम्ही कधींही विसरूं नका ! आपल्या प्रेमाची कसोटी आपल्या स्वार्थत्यागानें होत असते; आपल्या देशावर आपलें अलोट प्रेम आहे म्हणणारा इसम जर नखशिखांत विलायती वस्त्रानें विनटलेला दिसला, तर त्याला तुह्मी ढोंगी म्हणणार नाहीं काय ? असल्या कोरड्या प्रेमाचे हंडे घरोघर भरलेच आहेत ! पण आमच्या लक्ष्मणाचें प्रेम असें कोरडें नव्हतें ! त्याची बंधुप्रीति अत्यंत उदात्त स्वरूपाची होती ! व तिची खरी कसोटी वनांत गेल्यावर लवकरच लागण्याचा एकदा प्रसंग आला ! व त्या प्रसंगाला आमचा धीरोदात्त नायक पूर्ण उतरला, हें सांगण्यास आह्माला फार आनंद वाटतो ! असा कोणता तो प्रसंग ? ऐका, तोच मी तुम्हाला सांगत आहेः—

रामचंद्र पंचवटीमध्यें पर्णकुटिका बांधून आपल्या प्रेमळ भार्येसह व एकनिष्ठ बंधूसह राहात होते. त्यावेळीं रावणाशीं आगाऊ ठरल्याप्रमाणें मारीच राक्षसानें सुवर्णमृगाचें रूप घेऊन तो रामाच्या पर्णकुटीजवळ कोवळ्या गवतावर चरूं लागला. तो सुंदर हरीण पाहून सीतेनें तो आपल्यासाठीं मागितला. सीतेचे प्रेमळ पति धनुर्धर राम धनुष्यबाण पाठीस लावून त्यामागें निघाले. पण तो लबाड हरीण त्यास तसा थोडाच सांपडतो ? ठरलेल्या संकेताप्रमाणें त्यानें रामास घुलवीत घुलवीत बरेंच दूर नेलें व मग तें पळूं लागलें. हरीण आपल्या हातीं अद्याप येत नाहीं म्हणून रामचंद्रांनाही चीड आलीच होती, व त्याच रागाच्या सपाट्यांत त्यांनीं ताबडतोब धनुष्याला बाण लावून त्यावर शरसंधान केलें ! मग काय विचारतां ? रामाचाच बाण तो ! तो काय फुकट जाणार आहे ? त्यानें आपलें कार्य बरोबर बजावलें व तो हरीणरूपी राक्षस धाडकन् जमिनीवर कोसळला ! पण मरतां मरतांसुद्धां

" हा सीते ! हा लक्ष्मणा ! " अशा तऱ्हेची करुणा येणारी हांक देण्यास त्यानें कमी केलें नाहीं. कारण ठरलेल्या संकेतांतील हेंच तर मुख्य कार्य होतें व आमच्या धीरोदात्त लक्ष्मणाची परीक्षेची वेळही पण इथेंच होती ! सीतेच्या संरक्षणाला लक्ष्मणास ठेवून रामचंद्र त्या मायावी मृगामागें गेले, पण त्यानें आयत्या वेळीं असा डाव साधलेला पाहून खुद्द रामचंद्रांच्या मनांतही धस्स् झालें ? पण इकडे उटजांत काय स्थिति झाली हें आपणास पाहिलें पाहिजे. कारण तेंच मुख्य महत्त्वाचें आहे. ती वाणी–मायामृगाची ती केविलवाणी हांक–ऐकून इकडे सीतेच्या पोटांतही धस्स् झालें व ती लक्ष्मणाला ' तिकडच्या ' मदतीला जाण्याविषयीं विनवूं लागली. लक्ष्मणाला तें मायामृगाचें कपट उघड उघड दिसत होतें. किंबहुना, आपण गेल्यास आपल्या पश्चात् सीतेवर कोसळणाऱ्या संकटाची अंधुक छायाही पण त्या महात्म्याला दिसत होती हें उघड आहे. म्हणून त्यानें नाना परीनें सीतेची समजूत केली कीं, " रामचंद्राच्या नखालाही धक्का लावण्याचें सामर्थ्य सर्व त्रैलोक्यांत कुणाला नाहीं. तेथें ह्या क्षुद्र राक्षसाची काय कथा ? ही त्याची मृत्यूच्या वेळची कपटपूर्ण आरोळी आहे ! तेव्हां सीतामाई, आपण अगदीं निर्धास्त असा ! त्या राक्षसाला मारून रामप्रभू आतां येतील ! " पण ह्या कळकळीच्या बोलाचा तिथें काय उपयोग होता ? सीतेनें ताबडतोब अत्यंत अविचारानें त्याच्यावर पापी नजरेचा आरोप केला ! किती ही चीड आणणारी गोष्ट होती ? दुसरा एखादा तरुणरक्ताच्या तडफीचा युवक ह्या वेळीं नक्की अपमानाच्या तीव्र भावनेनें तो उटज सोडून ताबडतोब आपल्या घरीं चालता झाला असता! पण खऱ्याखऱ्या प्रेमाला मान–अपमान, सुख–दुःख, हीं द्वंद्वें ठाऊकच नसतात, तीं त्याला कांहींच बाधा करूं शकत नाहींत; त्या द्वंद्वांना गिळून टाकून खरा प्रेमी जीव ह्या जगांत कार्य करीत असतो ! तें प्रेम खरें खरें उदात्त स्वरूपाचें असावें, हीन नसावें, एवढीच त्यांत काळजी घेतली

म्हणजे झालें ! लक्ष्मणाचें रामावरील बंधुप्रेम अशाच उदात्त स्वरूपाचें होतें ! त्यामुळें त्यांनीं हा अत्यंत चीड आणणारा अपमानाचा प्रसंगही गिळून टाकला, केवळ रामावरील प्रेमासाठीं त्याकडे त्यानीं दुर्लक्ष केलें, व तो महात्मा ताबडतोब रामाच्या शोधार्थ निघाला ! कारण त्यानंतर तेथें राहणें शक्यच नव्हतें ! पण धन्य त्या लक्ष्मणाची कीं, अशाही चीड येणाऱ्या स्थितींत तो आपल्या कर्तव्याला विसरला नाहीं ! व जातां जातां त्यानें सीतेच्या संरक्षणार्थ उटजाबाहेर एक मर्यादेची रेषा आखून दिलीच ! केवळ रामप्रेमासाठीं अशा अलौकिक स्वार्थत्यागाला व वाटेल ते अपमान सोसण्याला तयार होणाऱ्या लक्ष्मणाची किती बरें धन्य म्हटली पाहिजे ? मग मुलांनो, त्याच्या चरित्रापासून अशा उदात्त बंधुप्रेमाचा धडा तुम्ही घेणार नाहीं काय ? असो.

आतां शेवटचें उदाहरण मी तुम्हाला **पांडवांच्या** बंधुप्रीतीचें सांगणार आहे ! धर्मराज, भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव असे पांच पांडव कुंतीचे व माद्रीचे पुत्र होते. पहिले तीन कुंतीचे व शेवटचे दोन माद्रीचे. वास्तविक माद्रीचीं मुलें—नकुल व सहदेव—हीं बाकीच्या तिघांचीं सख्खी भावंडेंसुद्धां नव्हती. पण जी गोष्ट रामरायाच्या चरित्रांत आपणांस दिसली, तीच येथेंही पहावयास सांपडणार आहे. माद्रीमातेच्या मुलांचें प्रेम आपल्या इतर भावांवर अगदीं सख्या भावाप्रमाणेंच होतें. कारण मातेचें शिक्षणच त्यांना तसें होतें. पण बिचाऱ्या बाळांना—त्या नकुलसहदेवांना—आपल्या मातेचा वियोग फारच लवकर झाला ! कारण पंडुराजा ज्यावेळीं मरण पावला त्यावेळीं साध्वी माद्री त्याच्याबरोबर सती गेल्याची गोष्ट मुलांनो, मी तुम्हाला माझ्या " भारतीय संग्रामां" त सांगितलीच आहे. पण याप्रमाणें मातेला मुकलेल्या त्या बालकांवर कुंतीमातेचें व धर्मभीमादि पांडवांचें प्रेम अलोट होतें. विशेषतः धर्मराजांचें प्रेम सर्वांवरच सारखें असून त्या

कोमल व अल्पवयी बालकांवर तर विशेषच होतें. कारण त्यांचें हृदयच तसें दयाशील होतें. " तुझ्या भावांपैकीं कोणच्या भावास मी उठवूं ?" असा यक्षानें प्रश्न केला असतां, " माद्रीसुतच प्रथम उठूं दे " अशी धर्मानें केलेली मागणी ह्याच त्याच्या हृदयाची प्रेमळता आणि वत्सलता प्रगट करीत आहेत. " मातेसि नमुनि वद कीं, आहे आरोग्य साधु सहदेवा " ह्या श्रीकृष्णाबरोबर कुंतीस पाठविलेल्या निरोपांतही धर्मराजाचें वत्सल हृदयच प्रगट झालें आहे ! आणि धर्मराजांचें आपल्या इतर बंधुवर किती दिव्य प्रेम होते, ह्याची अखेरची परीक्षा स्वतःसाठीं मिळणाऱ्या स्वर्गावर लाथ मारून त्यांच्या बरोबर नरकवासाला सुद्धां तयार होणाऱ्या धर्मराजाच्या उदार हृदयांत झाली आहे. भीम आणि अर्जुन ह्यांचेंही नकुल सहदेवांवर किती प्रेम होतें हें भारतीययुद्ध-प्रसंगीं आपणांस दिसून आलेंच आहे. धर्मराजांचें भीमार्जुनांवरही तशाच तऱ्हेचें दिव्य प्रेम होतें. पण त्याची उच्च कसोटी एकदां वर सांगितलेली असल्यामुळें त्यासंबंधीं पुन्हां वेगळें लिहिण्याचें कारण नाहीं.

अशा तऱ्हेच्या राजा धर्मावर त्याच्या इतर बंधूंचेंहि तसेंच दिव्य, उत्कट, व अलौकिक प्रेम असावें ह्यांत आश्चर्य काय ? जगांत कोण-च्याही बाबतींत खरी परीक्षा कनक आणि कामिनी अथवा कांचन आणि कांता यांच्या बाबतींतच होत असते. मनुष्याच्या ठिकाणीं अस-णाऱ्या सर्व पाशवी आणि आसुरी वृत्तिंचा उदय ह्याच परीक्षेच्या वेळीं होत असतो. त्याच्या ठिकाणीं दिव्य वृत्तींचा वास किती आहे तेंहि पण ह्याच वेळीं दिसून येतें. अशा तऱ्हेचा बिनतोड प्रसंग सर्व पांड-वांवरही एकदा गुदरला होता—श्रीहरीनें आणला होता. तो प्रसंग इतका खडतर, दुःखदायक, अपमानकारक व चीड आणणारा होता कीं खुद्द पांडवांचीं हाडेंहि त्यांत खिळखिळीं झालीं; मग इतर सामान्य

मानवांची काय कथा ? कोणचा तो प्रसंग ? भीमाचें भयंकर रक्त सळसळून कढकढूं लागलें, अर्जुनाच्या जिवाचाही संताप झाला असा कोणचा तो प्रसंग ? पहा मुलांनो, भारताची चिमुकली प्रत उघडून पहा म्हणजे तुह्माला दिसून येईल कीं, धर्माच्या भयंकर द्यूतामुळें सर्व राज्य जाऊन सती द्रौपदी दुष्ट दुर्योधनाची दासी–बटीक झाली तोच हा प्रसंग होय ! ह्या धर्माच्या एकाच भयंकर चुकीचा परिणाम धर्मासकट सर्व पांडवांना व द्रौपदीला कसा भोगावा लागला त्याची करुण कथा पुन्हा सांगण्याची जरूर आहे काय ? त्याचें करुण चित्र अद्यापही वातावरणांत तरंगत आहे ! आपल्या कल्पनेचे डोळे उघडा व पहा, ह्मणजे मुलांनो, तुम्हाला सुद्धां तें सहज दिसेल. किंबहुना, भावनाप्रधान चिमुकल्या जीवांनो, तुमच्या उज्ज्वल कल्पनेलाच तें खरें खरें दिसणार आहे ! पहा, द्रौपदीवस्त्रहरणाचा तो हृदयाचे पाणी-पाणी करणारा प्रसंग पहा, जयद्रथानें केलेली द्रौपदीची विटंबना पहा, कीचकानें मांडलेल्या द्रौपदीच्या हालांवरून व छळावरून दृष्टि फिरवा, किंबहुना, राजा विराटाच्या दरबारांत सर्व पांडवांची किती शोचनीय स्थिति झाली होती त्याचें चित्र आपल्या डोळ्यापुढें रेखाटा, ह्मणजे या करुण कथेची तुह्मांस खरी खरी कल्पना येईल !

पण अशाहि स्थितींत धर्मेतर पांडवांनीं काय केलें ? इतर माणसें असतीं, पांडवांच्या जागीं सामान्य लोक असते, तर वर म्हटल्याप्रमाणें त्यांच्या ठिकाणचीं पाशवी आणि आसुरी वृत्ति जागृत होऊन त्यांनीं नक्की एकमेकांचीं टाळकीं सडकलीं असतीं, व आपल्या अलोट बंधु-प्रीतीचें त्यांनीं तें एक ‘ प्रदर्शन ’ च भरविलें असतें ! मग हजारों लोक येताहेत आणि त्या यादवींतल्या मुडद्यांकडे पाहून जात आहेत, असाच देखावा आपल्या दृष्टीस पडला असता ! ह्या ठिकाणीं असेंच झालें काय ? हेंच नाटक पांडवांनीं जगाला दाखविलें काय ? तसें असतें तर व्यासांना महाभारत लिहिण्याचेंच मग कारण नव्हतें. कारण

असलें ' महाभारत ' घरोघर चालूंच आहे ! पण व्यासांना महाभारतांत एक उदात्त धडा सर्व जगाच्या निदर्शनास आणायचा होता, व लाखांत किंवा कोटींत कां होईना पण असा एक तरी दिव्य हिरा चमकत *असतो, व त्यापासून इतर जनांनीं बोध घ्यावा,* हेंच त्यांना पांडवांच्या प्रत्यक्ष झालेल्या गोष्टीवरून दाखवून द्यावयाचें होतें ! जें चित्र महर्षि वाल्मिकींनीं रामायणांत रेखाटलें, तेंच इथेंहि आपणांस काढावयास सांपडणार म्हणून व्यासांना अपरिमित आनंद झाला व ते पुढें लिहूं लागले ! मनुष्यस्वभावाच्या छटा त्यांनीं फारच बहारीनें रेखाटल्या आहेत व त्यांतच उच्च नीतीचे आदर्शपाठ त्यांनीं जगापुढें मांडले आहेत, ते सांगतात, धर्मराजाचें वरील कृत्य पाहून भीमार्जुनांच्या, विशेषतः भीमाच्या अंगाची नुसती लाही लाही झाली व तो धर्माचे हात-ज्या हातानें तें दुष्ट दान दिलें तो हात-सुद्धां जाळून टाकण्यास तयार झाला होता. पण अर्जुनानें त्यास आवरून धरलें व भीमाच्या तापलेल्या रक्तावरही शेवटीं विवेकाच्या शीतल जळाचा योग्य तो परिणाम होऊन तो गप्प बसला. भीमाचें सात्विक संतापानें सळसळणारें रक्त याप्रमाणें कितीदां तरी दुष्टांच्या नाशासाठीं उसळलेलें आहे. पण केवळ धर्माच्या साठीं-त्याची आज्ञा म्हणून त्यास गप्प बसावें लागलें. जी गोष्ट भीमाची तीच इतर पांडवांची. पण ह्या सर्वांनीं धर्माखातर-त्याच्या विषयीं असणाऱ्या अलोट आदरयुक्त प्रेमानें इतके सर्व हालही सोसले व जगाला उदात्त धडा घालून दिला ! त्याचें उत्तम फळही श्रीहरीनें त्यांना शेवटीं दिलेलें आहे व त्यांच्या आदर्श वर्तनाचें अनुकरण तुम्ही कराल तर मुलांनो, तुम्हालाही तसेंच गोड फळ तो श्रीहरी दिल्यावांचून राहणार नाहीं एवढें सांगून, मी आतां तुम्हाला तुमच्या इतर आप्तेष्टांकडे घेऊन जातों ! कारण, तीं पहा, ती मंडळी आपली केव्हांची वाट पहात आहेत ?

---

## इतर आप्तेष्ट वगैरे.

ऐनजिनसी नात्याच्या ओघांतून काढून, मुलांनो, मी तुम्हांला आतां त्याच्या तीरांवर थोडेसें उभे करणार आहे. आई, बाप, बहीण व भाऊ ह्या अत्यंत जिव्हाळ्याच्या नात्यांचा विचार झाल्यावर आतां आपणास आपल्या घराच्या चार भिंतींच्या आधारांत असणाऱ्या अथवा प्रसंगोपात येणाऱ्या अगर जमणाऱ्या इतर मंडळींचाही थोडा-बहुत विचार अवश्य केला पाहिजे. त्याशिवाय आपणांला त्यांतून बाहेर पडतां यावयाचें नाहीं, व यासाठींच मी तुम्हाला त्यांसंबंधीं चार शब्द सांगण्याचें ह्या प्रकरणांत योजिलें आहे. तर ऐका आतां लक्ष्य देऊनः--

एकाच उदराशीं संबंध असणाऱ्या ' आई, बाप बहीण व भाऊ ' ह्या चार नात्यांचा विचार मागे झालाच आहे. त्यानंतरची त्यांतल्या-त्यांत आपल्या जवळची नातीं म्हणजे आपल्या बापाचा व आईचा भाऊ, ज्यांना आपण ' काका ' व ' मामा ' असें अनुक्रमें म्हणतों, तीं होत. राज्यलोभाच्या पायीं प्रत्यक्ष आपल्या पुतण्याचा--भावाच्या मुलाचा--खून करणाऱ्या राघोबादादाप्रमाणें कांहीं ' काकां'ची करणी ह्या कलियुगाच्या काळांत काळीकुट्ट पहावयास सांपडते ही गोष्ट खरी. पण मुलांनो, सर्वच काकांचें वर्तन तसें असतें असें नाहीं. त्यांतही आपल्या पुतण्यासाठीं कळकळीनें कार्य करणारे, त्याच्या कल्याणासाठीं झटणारे असे चुलते सांपडतातच. यासाठीं त्यांचा योग्य तो मान आपण ठेवला पाहिजे. तीच गोष्ट आपल्या मामांची आहे. ' कंसमामा ' सारखा दुष्ट मामा एखादा निघाला तरी, आपल्या आईशीं बंधुप्रेमानें जखडलेला तिचा भाऊ तिच्या मुलाबाळांच्या--म्हणजेच खुद्द आपल्या कल्याणासाठीं अहर्निश खटपट करणारा व कळकळीनें झटणारा आपणांस पुष्कळदां पहावयास सांपडतो. शकुनिमामा व दुर्योधन ह्यांचेंच उदाहरण घ्या ! आपल्या गांधारी भागिनीच्या ज्येष्ठ मुलाचे हातीं पांडवांची सर्व

संपत्ति व राज्य पडण्यासाठीं त्या मामानें किती खटपट केली बरें ? रात्रंदिवस त्याला त्यावांचून चैनच पडत नसे व शेवटीं त्यानें आपल्या भाचाला कपटानें कां होईना, पण विजयश्री मिळवून दिलेली आहे. आत्तां हा सर्वच दुष्टांच्या दुष्टपणाचा मामला होता हा भाग वेगळा. पण ती गोष्ट क्षणभर बाजूस ठेवली व केवळ नात्याच्या कळकळीच्या दृष्टीनें त्यांकडे पाहिलें तर, वरीलप्रमाणें हृदयस्पर्शी चित्रच आपणांस दृष्टीस पडणार आहे ! व त्यावरून बोध इतकाच घ्यायचा कीं, आपल्या काकाप्रमाणेंच, किंबहुना, कांकणभर जास्तच कळकळीनें आपला मामा आपणासाठीं झिजत असतो व यासाठीं अशा मामाचा मानही आपण ठेवलाच पाहिजे, विशेषतः आपल्या आईबापांच्या पश्चात्, आपण पोरकीं पडल्यावर, आपल्याविषयीं प्रेमानें कळकळ बाळगणारीं अशीं हीं दोनच मुख्य नातीं आहेत हें न विसरतां आपण केव्हांही त्यांचा मान राखला पाहिजे.

या ठिकाणीं जातां जातां असा प्रश्न उद्भवतो कीं, राघो भराऱ्या-सारखा एखादा ‘ काका ’ निघाला किंवा शकुनीसारख्या मामानें कप-टाच्या जोरावर द्रव्य मिळवून दिले तर काय करायचें ? तर त्याचें उत्तर सोपें आहे. व तें हेंच कीं, आपल्या जीवावर अथवा संपत्तिवर उठणाऱ्या ‘ काकां ’चा योग्य तो प्रतिकार आपण करावा व अन्यायी मार्गानें मामानीं मिळवून दिलेलें द्रव्य दूर भिरकावून द्यावें, किंबहुना, त्याकामीं आपली संमति आपण मुळींच देऊं नये. काकांचा प्रतिकार करण्यास आपण मोठे नसलों तर ? तर काय, मुलांनो, ‘ नारायणरावा ’-प्रमाणें आज कित्येक अर्भकांची स्थिती जगांत होतच आहे, त्याला कोण काय करणार ! नशीब म्हणून स्वस्थ बसणें अशा ठिकाणीं भाग आहे. मात्र याचा सात्विक सूड केव्हांही घेतला जाणें शक्य असल्यास तो अवश्य घेतला जावा यापेक्षां मी तरी अधिक काय सांगणार ?

पण ह्या अपवादभूत नरपिशाचांना सोडून आपण पुन्हां आपल्या प्रेमळ व गोड नात्याच्या आप्तेष्टांकडे वळूं या !

आपली आजा आजी फार दिवस पाहण्याचें स्वर्गीय भाग्य फारच थोड्या मुलांच्या वांट्यास येतें. पण जिथें तें येत असेल तिथल्या त्या नात्याचा जिव्हाळा काय वर्णावा ? आपल्या नातवंडापतवंडासाठीं आपल्या वृद्धापकाळीं सुद्धां कळकळीनें खस्ता खाणारे वृद्ध आजाआजी पाहिले म्हणजे कोणाचा बरें ऊर सात्विक गहिंवरानें भरून येत नाहीं ? कोणाच्या बरें नेत्रांत प्रेमाश्रूंचा पूर थाटत नाहीं ? अहाहा ! धो, धो, धो, करीत अधोगामी वाहणाऱ्या ह्या प्रेमप्रवाहाकडे पाहिलें म्हणजे जगन्नियंत्याच्या अगाध करणीचें मोठें कौतुक वाटतें ! मुलांनो, चार दिवसांनीं इहलोक सोडून जाणाऱ्या तुमच्या वृद्ध आजाआजींचें तुमच्यावरील हें निरतिशय प्रेम तुम्हांस त्यांच्या-विषयीं कृतज्ञ करीत नाहीं काय ? नसेल तर तो तुमचा मूर्खपणा आहे एवढेंच मी तुम्हाला सांगतों व त्यांतच काय तें समजा, यापेक्षां अधिक काय सांगू ?

यानंतरचीं जरा दुरावलेलीं नातीं म्हणजे आत्या, मावशी, चुलत-भाऊ, आतेभाऊ, मामेभाऊ, व ‘ चुली ’ टाकून होणारीं इतर नातीं होत. मुलांनो, या ठिकाणीं मी कांहीं तुम्हाला तुमचीं नातीं समजावून-फोडून-सांगायला बसलों नाहीं आहे. तें काम तुमच्या मराठी पहिलीच्या पुस्तकानें केव्हांच केलें आहे. त्यांतला सातवा धडा-“ आपले आप्तेष्ट ” काढून पहा म्हणजे समजेल. मला इथें जें सांगावयाचें आहे तें हें कीं, ह्या सर्वांशीं आपण कसें वागावें ? ह्या बाबतींत नात्याच्या जिव्हाळ्याची-लगतदूरच्याची मीमांसा मीं वर केलीच आहे. इथें एकच व अबाधित असा ठोकळ नियम सांगावयाचा ह्मणजे, आपल्यापेक्षां वडील असून आपल्या कल्याणासाठीं झटत असतील त्यांविषयीं आदर दाखवावा व आपणापेक्षां लहान असणाऱ्या आपल्या इतर बंधु-भगिनी-

दिकांवर आपण योग्य ती मायाममता व प्रेम ठेऊन यांच्या हितासाठीं झटत असावें ! कारण मुलांनो, विविध नात्याच्या नातलगांनीं भरलेल्या घरांत आपणांस कित्येकदां असाही चमत्कार पहावयास सांपडतो कीं, अगदीं दूरची जरी एखादी नातेवाईक स्त्री असली तरी नात्याचा जिव्हाळा तिच्या अंतर्यामीं इतका बळकट असतो कीं, प्रत्यक्ष नात्याचीं माणसें काय तळमळ दाखवितील इतकी तिची तळमळ असते ! असो. आतां ह्या नातलगांना एथेंच सोडून आपल्या घरीं येणाऱ्या पाहुण्यारावळ्यांकडे आतां आपण वळूं या !

घरीं येणाऱ्या पाहुण्याशीं आपण कसें वागावें याचा विचार आतां आपणांस करावयाचा आहे. कित्येक मुलें इतकी भित्री, व लाजाळू असतात कीं, पाहुणा किंवा अपरिचित मनुष्य पाहिला, कीं ती पटकन् पळून जातात. अगर वडिलांच्या सांगण्यावरून मोठ्या कष्टानें तीं पाहुण्यांच्या समोर बसलींच तर कधीं तोंडसुद्धां उघडीत नाहींत. एरवीं, घरांत मारे आपल्या विविध कलांच्या लीलांनीं व गुणांनीं कौतुकाच्या व हास्याच्या लाटा उसळविणारें तें बालक पाहुण्यापुढें अगदीं थंड पडतें ! पाहुण्याच्या शब्दस्पर्शाबरोबर एखाद्या लाजाळूच्या झाडासारखी त्या मुलाच्या गुणांचीं व कलांची पानें आतल्या आंत संकोच पावतात. प्रत्यक्ष वडिलांनीं सांगितलें तरी सुद्धां त्यांची लाज कमी होत नाहीं. मुलांनो, अशा तऱ्हेनें वागणें चांगलें का ? अशा वागण्यानें तुमच्या वडिलांस किती वाईट वाटतें याची तुम्हांस कल्पना तरी आहे काय ? तुमच्या वडिलांच्या मनांत तुमच्या विविध गुणांचें प्रदर्शन नेहेमी व्हावें, तुम्हास लोकांनीं नेहेमीं ‘ वाहवा ’ म्हणत असावें, ही इच्छा किती तीव्रतेनें वावरत असते हें मी तुम्हाला ‘ पिता ’ ह्या प्रकारणीं मागें सांगितलेंच आहे. मग असें असतां आपण आपल्या पित्याची व आपल्या घरीं आलेल्या त्याच्या ओळखीच्या पाहुण्याची अशी निराशा करावी काय ? अशा तऱ्हेनें जर आपण निराशा केली तर मग ते आपले गुण व त्या आपल्या कला यांचा आपल्या

घराच्या बाहेर जगांत काय बरें उपयोग आहे ? घर ह्मणजे जग नव्हे, हें विसरून कसें चालेल ? यासाठीं मुलांनो, त्या अफाट जगांतले पाहुण्याच्या रूपानें येणारे प्रतिनिधि तुमचा जगाला कितपत उपयोग होईल हें पहाण्यासाठींच जणूं काय तुमच्या घरीं आले आहेत असें समजून, आपल्या पित्याची आज्ञा झाल्याबरोबर पाहुण्यांना तुम्ही आपल्या अंगच्या विविध गुणांनीं आपल्या भावी मोठेपणाची बीजरूपानें खात्री पटवुन देणें हें तुमचें कर्तव्य नव्हे काय ? " लोकांचिये एक शिरीं सजावें " ह्या फुलांच्या बाण्याप्रमाणें घराच्या बागेतल्या मुलाफुलांनीं वागलें पाहिजे तरच त्यांच्या बागवानांनीं--ह्मणजे वडिलांनीं--त्यांची इतकी जोपासना केल्याचें सार्थक होय असें मुलांनों, तुह्मांला सुद्धां नाहींका आतां वाटत? यामध्यें तुमच्या अंगचा नैसर्गिक लाजाळुपणा नाहींसा करून तुह्माला धीट बनवावें व, " वनींच कीं एक सुकोनी जावें " ह्याप्रमाणें लाजेच्या वनांत तुमच्या गुणांची फुलें सुकून न जातां तीं "जनीं जनार्दन" अशा जगरूप जगन्नियंत्याच्या चरणांवर वहावी, हाच त्यांत हेतू असतो; व यासाठींच तुमच्या वडिलानी त्यांची मेहनत मशागत केलेली असते. यासाठीं तुह्मांस तुमच्या वडिलांनीं शिकविलेली व तुम्हास येत असलेली गाणीं, भाषणें, श्लोक, अभिनयात्मक कामें, तसेंच तुम्ही तयार केलेल्या जिनसा व काढलेली चित्रें यांचा धीटपणानें पाहुण्याना परिचय करून द्या ! तुमचा तो अलौकिक सभाधीटपणा पाहून कळकळीच्या पाहुण्याना किती कौतुक वाटतें व ते किती खूष होतात म्हणून सांगू ? पण तेंच लाजाळूप्रमाणें पळून जाणाऱ्या मुलाचें कोण बरें कौतुक करील ? पाहुणे आपल्या ओळखींचे व परिचयाचे नसतात म्हणुन अगदी प्रथम क्षणभर लाज वाटणें हें साहजीक आहे. पण त्यांची इच्छा व वडिलांचें सांगणें विशेष दिसल्यास मग आपण दोघांसही संतुष्ट करावयास नको काय ? कारण धार्मिक भावनेप्रमाणें पाहिलें तरी सुद्धां, ' पाहुणा '

म्हणजे एकप्रकारचा तो 'अतिथि'च होय; व "अतिथींचा सत्कार" आपण किती करावा, त्यांचे योग्य आदरातिथ्य आपण कसें करावें याबद्दल आपल्या शास्त्रांत किती तरी वर्णन आहे. किंबहुना, "**अतिथि-देवो भव**" अशी जी म्हण अथवा वचन आपल्या पुण्यपाद पूर्वज ऋषिनीं आपणांस सांगून ठेवलें आहे; त्यांत सुद्धां अत्यंत खोल अर्थ आहे ! 'अतिथि' च्या रूपानें प्रत्यक्ष देवच आपली सर्व प्रकारची परीक्षा पाहण्यास येत असतो, हें जसें वडिल मंडळींनीं तसेंच मुलांनींही पण विसरता कामा नये. व त्या अतिथीला आपल्या योग्य "आतिथ्य सत्कारा" नें आपण इतकें खुष केलें पाहिजे कीं, त्यानें आपणास आशीर्वाद देत व आपलें धन्यवाद गातच गेलें पाहिजे ! आणि असें झालें तरच आपण आपल्या 'अतिथिसत्कारा' च्या गृहस्थधर्माला जागलों हें वडिलांप्रमाणेंच मुलांनींहीं लक्षांत ठेविलें पाहिजे. अतिथीच्या साठीं प्रत्यक्ष प्राण उतरून ठेवण्याची वेळ आली तरी मागें हटता कामा नये, ही आपल्या धर्माची उदात्त शिकवण, व त्याचवेळीं "पाहुण्याच्या हातून साप मारविण्याची" आपल्या समाजांतील कित्येक लोकांची कृति पाहिली, म्हणजे आपण 'खरे आर्य'च काय? असा क्षण-भर संशय वाटतो ! असो. मुलांनो, हिंदुधर्मांतलें आतिथ्यसत्काराचे वर सांगितलेले प्रसंगीं प्रत्यक्ष प्राणार्पणाचें उदात्त तत्व तुमच्या सारख्या एका बालकानेंच सिद्ध करून दाखविलें आहे ! त्याची गोष्ट मी तुम्हांला सांगू का ? ऐका तर मग नीट लक्ष्य देऊन !:–

श्रीशंकराजवळ एकदा नारदमुनि जाऊन सांगू लागले कीं, "भगवन्, मी आपले पुष्कळ भक्त पाहिले, पण कांतिनगरांतील श्रियाळ नांवाच्या राजाची बरोबरी इतर कोणाकडूनही होणें शक्य नाहीं. महादेवा, त्याच्या भार्येचें नांव चांगुणा असून त्यांना एक पांच वर्षांचा प्रियकर बालक आहे. त्याचें नांव चिलया. ही तिघेही, देवा, तुमची फार भक्त आहेत. राजा श्रियाळानें, प्रभो, तुमच्या भक्तिसाठीं, आज दहा

हजार वर्षे अन्नसत्र घातलें असून 'इच्छाभोजना'चें दान तो दररोज अतिथि–अभ्यागताला, पै–पाहुण्याला, देत असतो! अहाहा! विश्वंभरा, विश्वनाथा, महादेवा, त्या श्रियाळ राजाचे, त्याच्या भार्येचे, तसेंच त्याच्या बाळाचे गुण किती म्हणून मी तुम्हाला सांगू?" असें म्हणून नारद ब्रह्मवीणेच्या मधुर सुरांत हरिभजन करीत गात गात तेथून निघून गेले. 'कळीच्या नारदा'चें काम जागोजागचा अशुद्धगुणांचा केरकचरा जाळून टाकण्यासाठी अथवा सत्वशुद्धीनें सत्वाची झळाळी जगाला दाखवण्यासाठी अग्नि प्रदीप्त होण्यास–अग्निची भट्टी पेटण्यास जागजागीं ठिणग्या टाकीत जाणें हें असें, हें मुलांनो, तुम्हाला ठाऊकच आहे! त्याप्रमाणें कैलासाला वरील प्रकारची ठिणगी टाकून नारद निघून गेल्यावर, श्रीयाळकुटुंबाच्या सत्वपरीक्षेच्या इच्छेचा अग्नि त्या विश्वनाथाच्या विशाळ हृदयांत धडाकून पेटला व त्यांत त्या कुटुंबाचें सत्वसुवर्ण घालून ते कसाला लावण्याच्या निश्चयानें देवाधिदेवाची स्वारी भूलोकावर कांतिनगरांत श्रियाळराजाच्या राजवाड्यापुढें ओंगळवाण्या भिकाऱ्याचें रूप घेऊन, तांबडेलाल डोळे करून उभी राहिली! व अन्नसत्राच्या अंगणांत जाऊन पहिल्या सपाट्याला राजाला त्यांनीं खूप शिव्या हासडल्या व अद्वातद्वा बोलूं लागला. कारण "धीर, गंभीर, सात्विक, क्षमाशील" असेंहि त्याचें वर्णन नारदांनीं महादेवाला प्रथमच सांगितलें होतें. तेव्हां त्या पंचवदनानें पहिल्याप्रथम पारख ह्याच गुणाची करायची ठरवून वरीलप्रमाणें शिव्या देण्यास व कठीण शब्द बोलण्यास सुरवात केली. पण दावाग्नीप्रमाणें कोपलेल्या त्या अतिथीवर मुळींच न रागावतां, श्रीयाळचांगुणांनीं धांवत येऊन त्याचे पायच धरले व उलट त्यास घरांत आणून त्याचें योग्य रीतीनें पूजन करून तीं नवराबायको हात जोडून उभीं राहिलीं व "महाराज, स्वामिन्, सांगा, आपणांस कसलें भोजन हवें?" असें त्यांनीं उलट नम्रपणें त्यांस विचारलें! अहाहा! किती उदात्त वागणूक ही! "**तृण नाहीं तेथें**

**पडला दावाग्नि । जाय तो विझोनि आपोआप !** ॥ ” असें तुकाराम-महाराजांनीं म्हटलें आहे तीच गत येथेंही झाली. पहिल्या तडाक्याला पाहिलेल्या परीक्षेच्या चुणुकेंत श्रियाळचांगुणा उतरलेलीं पाहून त्या भक्तवत्सल विश्वनाथाला किती आनंद झाला असेल बरें ? पण आज त्यांनीं त्या राजकुटुंबाची पुरी पुरी परीक्षाच पाहण्याचें ठरविलें असल्या मुळें, वरील आतिथ्यसत्कारानें कांहींशा शांत झालेल्या शंकरांनीं आपलें उग्र स्वरूप न पालटतां त्याच घोगऱ्या आवाजांत हातवारे करीत सांगितलें कीं, “मला नरमांसभक्षणाची इच्छा आहे. पण तें बाजारांत पकडलेल्या चोराहेरांचें अथवा एखाद्या विकत घेतलेल्या गुलामाचें मुर्दाड व मेलेलें मांस मला नको असून राजा, तुझ्यासारख्या पवित्र व जातिवंत माणसाचें तें पाहिजे ! ” ह्या अतिथीच्या भाषणाबरोबर तीं दोघेंही प्राणदानास तयार झालीं. त्यावर अतिथि म्हणाला, “ तुम्ही पवित्र आहांत हें खरें, पण तुमच्या मागें हें अन्नछत्र कोण चालवील ? यासाठीं आतां असें करा, तुमचा **चिलया** म्हणून बाळ आहेना ? त्याचेंच मांस मला खावयाला द्या. त्याचें तें कोवळें आणि लुसलुशीत मांस खाण्यास मला मोठें गोड लागेल ! ” असें म्हणून आनंदानें खाकरून तो त्या कल्पनेनें मिटक्या पण मारूं लागला! केवढा तो भयंकर प्रसंग ! फांसावर चढविणाऱ्या मांगाला काळीज नसलें तरी त्या फांसावर चढणाऱ्या हतभागी जीवाला तें असतेंच! कितीही सात्विक वृत्तीचा सज्जन साधू घ्या,त्याच्या ठिकाणीं अगदीं थोडा का होईना, पण मायामोहाचा पाश असतोच ! व तो प्रसंगीं डोळ्यांत अश्रु उभे करण्यास चुकत नाहीं ! चांगुणेनें चिलयास प्रेमळ हांक मारली व ती ह्मणाली, “ बाळा, ऐकलेंस का ? अतिथी तुझ्या मांसाचें दान मागत आहे. मग देणार ना बाळ तूं त्याला मांसभोजन ? ” त्यावर त्या चिमुकल्या चिलयानें जें उत्तर दिलें आहे तें किती उदात्त आहे ! अहाहा! तो ह्मणतोः-

“**बाळ बोले स्नेहेंकरून । हा देह म्यां केला शिवार्पण । अतीत होतां**

**तृप्त पूर्ण । उमारमण संतोषेल ! ॥ १ ॥** " त्यानंतर त्या चिलयाच्या मांसभोजनाची तयारी खुद्द चांगुणेनें स्वहस्तानें कशी केली, त्याची हृदयास रडविणारी कथा मी यापुढें अधिक सांगत नाहीं. श्रीधर कवींनीं " **शिवलीलामृता"च्या १४ व्या अध्यायांत** ती सविस्तर सांगितलीच आहे व ती भोळ्या भाविकांना आजतागायत सात्विकाच्या गंहिंवरानें रडवीत आहे. हें सात्विक भक्तींचें रडूं मुलांनो, तुम्ही ती कथा वाचल्यास तुह्मालाही आल्यावांचून राहणार नाहीं. स्थलसंकोचास्तव येथें त्याचा अधिक विस्तार न करतां इतकेंच सांगतों कीं, मन घट्ट करून सदर भोजनाची तयारी केल्यावर त्यांनीं अतिथीला पानावर बसविलें, त्याच्या आग्रहाखातर राजा श्रियाळ व राणी चांगुणाही भोजनास बसली, पण " निपुत्रिकाचें अन्न घेऊं नये " म्हणून शेवटीं सुद्धा शंकर उठून चालूं लागले ! सत्वपरीक्षेच्या ह्या शेवटच्या फटकाऱ्यानें राजाराणींचा जीव व्याकुळ झाला ! व सत्वाच्या शेवटच्या पायरीपर्यंत टिकूनही अतिथी संतुष्ट होत नाहीं, त्यांनें मागितलें तें त्यास देऊनही हा हटवादी अतिथी शेवटीं सत्व घेऊन जातोच असें पाहून मात्र तीं ढळढळा रडूं लागली ! " हर हर ! प्रभो, जगन्निवास, विश्वंभरा, आपण कुठें हो अहांत ? या दीन दांपत्याचा करुण विलाप व त्याची करुणाजनक स्थिति तुम्हाला दिसत नाहीं काय ? " याप्रमाणें श्रीयाळचांगुणेन विलाप आरंभला. विशेषतः चांगुणेचा—त्या प्रेमळ माउलीचा अतिथीच्या आज्ञेवरून आतापर्यंत आवरून धरलेला उमाळा आतां उसळून वर आला, व चिलयाचे नाना गुण आठवून, आपला निर्वंश झाला ह्मणून, ती साध्वी ढळढळा रडूं लागली ! " **एक बाळ तो दिधला भोजनासी । आतां महाराजा सत्व किती पहासी? । ऐसें बोलतां चांगुणेसी । अद्भुत गंहिंवर दाटला ! ॥ १ ॥**" असें श्रीधरांनींही त्याचें हृदयास रडविणारें वर्णन केलें आहे. पण या चांगुणेच्या विलापाबरोबर, किंबहुना तिच्या हुंदक्याहुंदक्याला, इकडे कृत्रिम काठिण्य

धारण केलेल्या सदाशिवाच्या लोण्याहूनही मऊ अशा हृदयाचें पाणी-पाणी झालें व तें अश्रुरूपानें त्या अतिथीच्या डोळ्यावाटे वाहूंही पण लागलें ! गांवांत ही बातमी कळून लोकही लाडक्या राजपुत्रासाठीं शोक करीत तेथें जमा झाले. त्यांच्या देखत " धन्य धन्य ! " असे उद्गार काढून शेवटीं अतिथी म्हणाला, " चांगुणे, तुझी काय इच्छा आहे ? " " महाराज " चांगुणा ह्मणाली, " एवढा निपुत्रिकपणाचा कलंक काढून टाका. " " ठीक आहे; हांका मार तुझ्या पुत्राला ! " अशी अतिथीची आज्ञा ऐकूत ती साक्षात् ईश्वराचीच आज्ञा समजून अगदीं खऱ्या भरंवशाच्या भक्तिभावानें तिनें आपल्या बाळकाला हांक मारली-" बाळा चिलया ! येरे ये ! हे पहा अतिथि तुझ्यावांचून खोळंबून राहिले अहेत ! बाळ, तूं कोठेरे गेलास ? ये, लवकर ये व ह्या तुझ्या लाडक्या आईला एकदा कडकडून मिठी मार पाहूं ! आला ! आला ग बाई माझा बाळ ! " असें म्हणून ती दशदिशांकडे टकमक पाहूं लागली, तोंच बालसूर्याप्रमाणें देदीप्यमान कांतीचा तो गोजिर-वाणा चिमणा चिलया धांवतच आला ! आपल्यासाठीं प्राणांची आहुती देण्यासही मागें पुढें न पाहणाऱ्या त्या बालकाला-त्या चिमण्या राजसाला पाहून श्रीशंकराच्या-त्या उमावराच्या-हृदयांत किती प्रेम दाटून आलें असेल याची मुलांनो, तुम्हीच कल्पना करा ! महेशाचे डोळे पाण्यांनीं भरून आले, सात्विकाचे रोमांच त्याच्या सर्वांगावर उभे राहिले, व त्या बालकाला केव्हां एकदा मांडीवर घेऊन त्याला हृदयाशीं धरीन असें त्या श्रीशंकरांना होऊन त्यांनीं तावडतोब अतिथीचा वेष फेकून दिला व, " **चिलया शिवें हृदयीं धरिला । निज अंकावरी बैसविला । श्रीयाळचांगुणा ते वेळा । पायांवरी लोळती ॥१॥** " अशा तऱ्हेचें वहारीचें वर्णन श्रीधरांनींही पण केलें आहे. अहाहा ! काय हें भाग्य ? ही भाग्याची परिसीमा होय ! सहाजीकच श्रियाळचांगुणांनाच नव्हे, तर शेवटीं खुद्द चिलयालाही स्वतःच्या दिव्य विमानांतून कैलासाला

नेऊन त्यांना अढळ पदावर प्रभूनीं स्थापिलें हें काय वेगळें सांगायला पाहिजे ? असो.

मुलांनो, पाहिलात ना हा स्वार्थत्याग केवढा होता तो ? आणि तो एका ५।७ वर्षांच्या चिमकुल्या बाळानें केला होता ही केवढी अद्भुत गोष्ट आहे बरें ? मग यापासून तुम्ही कांहींच बोध घेणार नाहीं काय ? छे, छे, असें होणें शक्यच नाहीं. कारण चिलयाची गोष्टच इतकी चटका लावणारी आहे कीं, ती ऐकल्यावर त्याचे थोडेसे तरी गुण आपल्या अंगीं आणण्याचा यत्न केल्यावांचून एकही मुलगा राहणार नाहीं व राहतही नाहीं अशी माझी खात्री आहे. आणि माझें तरी दुसरें काय सांगणें आहे ? हेंच ! मग पाहुण्यांशीं कसें वागावें हें आतां कळलेना तुम्हाला ? आता सरतेशेवटीं घरांतल्या नोकराचाकराकडे एक शेवटचा दृष्टिक्षेप टाकून आपण घराबाहेर पडूं या !

मुलांनो, आपल्या घरांत नवे जुने असे कितीतरी नोकर असतील; आचारी, पाणके, वाढपे, शागीर्द, देवडीवाले, कारकून, इत्यादि नाना प्रकारचे नोकर आपल्या घरांत वावरत असतील; व त्यांतील कित्येकांचे केस तुमच्याच घराण्याच्या सेवेंत काळ्याचे पांढरेही पण झाले असतील. या सर्व नोकराचाकरांना मान-अपमान, सुख-दुःख, थंडी-वारा, तुमच्याप्रमाणेंच आहे, तुमच्याप्रमाणेंच तीं माणसें आहेत, व त्यांच्याही कच्चाबच्चांचा संसार त्यांच्या पाठीमागें आहे, पण इतकें असूनही तुम्हा ‘ छोट्या सरकारावर ’ अथवा ‘ बाबा लोका- ’वर त्यांचें निरतिशय प्रेम असतें हें लक्षांत ठेवून, त्या सर्वांना ‘ बुटाच्या लाथा ’ न दाखवितां, अथवा त्यांच्याशीं हिडिस-फिडिस न करतां तुमच्या दर्जाला शोभेल अशाच अधिकारी पण प्रेमळपणानें त्यांच्याशीं वागा, व विशेषतः त्यांतील वृद्धांचा मान विशेष राखा, एवढेंच माझें तुमच्यासारख्या चिमुकल्या जीवांना त्याकामीं सांगणें आहे. तुमच्यापैकीं कित्येकांना अशा

रीतीनें उगाच हिडिस--फिडिस करण्याची, त्यांच्या मुलांशीं भांडण्याची, अथवा, वयाकडेही न पाहतां त्यांतील वृद्धांना प्रसंगीं लत्ताप्रहार करण्याची मोठी वाईट आणि दुष्ट खोड असते. गरीब बिचारे नोकर पोटासाठीं लाचार होऊन, व तुमच्या वडिलांच्या थोर अधिकाराकडे पाहून, झालेला अपमान कित्येकदा हंसण्यावारी नेऊन गिळून टाकतात हा त्यांचा थोरपणा–मनाचा मोठेपणा झाला. पण यांत तुमची क्षुद्र बुद्धीच दृष्टीस पडली ना? त्यांची नसती थट्टा करून त्यांना फिदिफिदि हंसण्यांत सौख्य वाटत असेल तर तें तामस सौख्य होय. पण हुशावर स्वामिनिष्ठ सेवक अशा थट्टेच्या वेळींसुद्धां न रागावतां आपल्या बालधन्याला कसें चतुराईचें उत्तर देतो, त्याची एक **गमतीची गोष्ट** तुम्हला सांगून मी हे सेवकाच्या बाबतींतले चार शब्द संपविणार आहे. मुलांनो, ऐकायची आहे का तुम्हांला ती गोष्ट? ऐका तर मग!:––

तुम्हाला कदाचित् ठाऊकच असेल कीं, **सवाईमाधवराव पेशवे** यांच्या बालपणींचें सर्व शिक्षण मराठ्यांच्या राज्याचे आधारस्तंभ **नाना फडणीस** यांच्या खुद्द देखरेखीखालीं होत असून कित्येकदा ते स्वतः सुद्धां श्रीमंतांना शिक्षण देऊन त्यांच्या करमणुकीसाठीं त्यांच्याशीं लाठी, बोथाटी, वगैरे खेळ खेळत असत! श्रीमंतांचे बालवय असें व नानांचें प्रेम श्रीमंतांवर पोटच्या पोराप्रमाणें खरोखरच निरतिशय असें! पेशवाईच्या कल्याणासाठीं अहर्निश झटणाऱ्या नानांच्या डोळ्यांत सवाईमाधवरावाच्या बाललीला पाहून कित्येकदां तरी आनंदाचे अश्रु चमकलेले आहेत–भक्तिप्रेमाचा गहिंवर त्यांना दाटलेला आहे! असो. याप्रमाणें शिक्षण चालूं असतां एक दिवस श्रीमंत लाठी--बोथाटीचा खेळ खेळत होते. जवळच नानांची ती सडपातळ पण तेजस्वी नेत्रांची मूर्ति श्रीमंतांचें कौतुक पहात उभी होती! खेळ ऐन रंगांत आला होता! इतक्यांत चुकून म्हणा अथवा मुद्दाम म्हणा, श्रीमंतांच्या हातांतील काठीच्या हातफेकीनें

नानांची पगडी पडली व तिनें जमिनीला लोटांगण घातलें ! श्रीमंतांना अनिवार हसूं लोटलें व नानांचा दर्जा व किंमत लक्षांत न घेतां त्यांना हंसून श्रीमंत म्हणाले, " नाना ! तुमची पगडी पडली ! " हे शब्द अपमानाचे तर खरेच; पण अहर्निश स्वामींचें कल्याणच चिंतणाऱ्या त्या इमानी सेवकाला त्याचा राग येणें अथवा क्षणैक आला तरी त्यांनीं तो बाहेर दाखविणें शक्यच नव्हतें. त्यांनीं चटकन् समयसूचकतेनें उत्तर दिलें, "**माझी पगडी पडली तरी हरकत नाहीं; पण श्रीमंतांनीं आपली पगडी संभाळावी म्हणजे झालें !** " अहाहा ! ह्या उक्तींत किती खोल अर्थ भरला आहे ! सहज विनोदांत सुद्धां व खुद्द स्वतांच्या अपमानकारक थट्टेच्या वेळीं सुद्धां न रागावतां श्रीमंतांचें सदैव कल्याणच हृदयाशीं धरणारे नाना त्यांना किती बहुमोल उपदेश करीत असत, याची यावरून चांगलीच कल्पना होते ! मुलांनो, तुमचेही चतुर पण वृद्ध सेवक तुम्हांला अशीं उत्तरें क्वचित् देत असतील ! पण त्याचा अर्थ तुम्हांला काय कळणार ? यासाठीं वरील गोष्टीपासून बोध घ्यायचा तो इतकाच कीं, खऱ्या अभिप्रेमाच्या पायीं मानापमानाला न जुमानण्याचा थोरपणा आपल्या इमानी नोकरांनीं दाखविला, तरी त्याचा भलताच फायदा घेऊन, आपण आपल्या क्षुद्र बुद्धीचें व हलक्या मनोवृत्तीचें प्रदर्शन कधींही करूं नये; तर आपला व सेवकाचा दर्जा ओळखून त्याच्याशीं योग्य त्या रीतीनेंच वागावें ! मुलांनो, एवढा धडा तुम्ही घेतलात म्हणजे माझें कार्य झालें ! व तो आतां तुम्ही निःसंशय घ्याल, अशी माझी खात्री असल्यामुळें त्यासंबंधीं जास्त कांहीं न लिहितां, चला आतां मी तुम्हांला घराबाहेर घेऊन जातों ! कारण ते पहा, आपल्या भेटीसाठीं दोन जीव केव्हांचे तिष्ठत आहेत !

---

## गुरु.

मुलांनो, मी तुम्हांला तुमच्या घराबाहेर काढलें, तुमच्या प्रेमळ मातापित्यांच्या व स्नेहाळ बंधुभगिनींच्या संगतींतून बाहेरच्या मोकळ्या मैदानांत आणलें, याबद्दल तुम्हाला राग आला असेल नाहीं ? पण त्याला मी तरी काय करणार ? तुमचे पुढील सर्व आयुष्याचा विचार मनांत येऊन, तुमच्या कल्याणाची खरी कळकळ बाळगणारे खुद्द तुमचे वडीलच, तुमच्या ५ । ६ व्या वर्षीं तुमचा हात धरून तुम्हांला घराबाहेर काढतात कीं नाहीं, तें तुम्ही पहातांच आहां ! बिगारींत बसलेल्या बालकांकडे पहा, म्हणजे मी काय म्हणतों त्याची कल्पना तुम्हास बरोबर येईल. मग मी तरी दुसरें काय करीत आहे ! तुमच्या वडिलांच्या बरोबर अथवा त्यांच्याप्रमाणेंच तुमच्यासह शाळेंत येऊन, तेथें बसलेल्या एका पूज्य व वंदनीय व्यक्तीविषयीं मी तुम्हांला आज चार शब्द सांगणार आहे इतकेंच !

पण घराच्या बाहेर पडण्याचाच आधीं प्रसंग कां यावा ? घराबाहेर पडण्याचें आधीं कारणच काय ? नाहीं पडलें तर काय होईल ? जन्मभर घरांतच राहिलें तर नाहीं का चालणार ?—नाहीं का राहतां येणार ? पित्यांनीं तरी आम्हाला घराबाहेर कां काढावें ? आमच्या घरीं आम्हांला काय कमी सौख्य आहे, म्हणून आम्ही घराबाहेर पडावें ? इत्यादि शंका तुमच्या चिमुकल्या डोक्यांत घोंगावत असतील नाहीं ? यासाठीं त्यांना प्रथम हाकून दिल्या पाहिजेत. ऐका तर मुलांनो, तुमच्या शंकांचें उत्तर !:—

तुम्हांला तुमच्या घरीं सौख्य कमी आहे असें कुणींच म्हटलें नाहीं, व त्यासाठीं तुम्हांला कुणीच घराबाहेर काढीत नाहीं. तुम्हांला सुग्रास अन्न वाटेल तेव्हां व वाटेल तितकें खाण्यास मिळतें, उत्तमोत्तम कपडे घालण्यास मिळतात, दुधातुपाची रेलचेल असते व आईबापांच्या व

 3548

बहीणभावंडांच्या प्रेमाच्या सरोवरांत तुम्हां बालकांचा जीव बाल्यावस्थेंत आनंदानें पोहत-डुंबत-डुलत-खुलत असतो व तें पाहून आमच्या-सारख्या वयस्थाच्या नेत्रांतसुद्धां आनंदाश्रु चमकतात, तर प्रत्यक्ष तुमच्या आईबापांना व बहीणभावंडांना किती बरें आनंद होत असेल ? तेव्हां अशा तऱ्हेच्या सुखाच्या सरोवरांत बाल्यावस्थेंतला जीव निःसंशय अत्यंत सुखांत डुंबत असतो यांत तिळमात्र शंका नाहीं !

पण प्रश्न आहे तो हाच कीं, हें सौख्य किती दिवस टिकणारें आहे? आयुष्याचीं वर्षें जों जों एक एक लोटत जातात, तों तों कालची स्थिति आज नाहीं व आजची उद्या नाहीं, असेंच आपणांस दिसतें ना ? मुलांनो, तुम्हीं नेहमीं मुलेंच राहाणार आहांत काय ? शक्य नाहीं. हळुहळु तुम्ही तरुण व्हाल व वृद्धही व्हाल, ही गोष्ट खरी ना ? तुम्ही मोठे झालांत ह्मणजे संसाराचें ओझें तुमच्यावर येऊन पडेल; पण तुम्हाला जर संसार कसा करावा, पैसे कसे मिळवावे, शहाणपणानें व हुशारीनें कसें वागावें, हेंच ठाऊक नसेल तर तुमचा संसार कसा होणार ? या जगांत नाना प्रकारचे लोक कसे आहेत, व धकाधकीचा मामला कसा चालू आहे हें प्रत्यक्ष अनुभवल्यावांचून तुम्हाला काय कळणार ? आणि त्यांतच जर तुम्हाला पुढचा सर्व जन्म काढावयाचा आहे, तर त्याचा अनुभव लहानपणापासूनच तुम्हांस थोडथोडा मिळवून देऊन त्या कामीं तुम्हांस तयार करावयास नको काय ? तुमच्या बहिणी थोड्या मोठ्या झाल्या, कीं लग्नें होऊन भुरकन् उडून आपल्या पतिगृहीं जातील; तुमचे आईबाप म्हातारपणामुळें थकून शेवटीं मृत्युमुखांत पडतील, व तुमचे मोठे झालेले बंधुबांधव लहानपणचा प्रेमळपणा विसरून तुमच्याशीं भांडायतंडायला तयार होतील--मग तुमचे तुम्ही जगांत एकटेंच आहांत, एकट्यानेंच आपला मार्ग शोधून नव्या जिव्हाळ्याच्या नात्याची शोधाशोध केली पाहिजे, असाच तुम्हांला अनुभव येईल. वयाच्या वाढीबरोबर जसे कपडे बदलावे लागतात तशींच नातींही

बदलावीं लागतात ! हा कालमहिमा आहे ! त्याला उपाय नाहीं ! लहानपणचे कपडे मोठेपणीं घालण्याचा यत्न केल्यास ते फाटूं लागतात ; लहानपणचीं नातींही अशींच मोठेपणीं फाटत असतात! यासाठीं आपल्या तरुणपणीं व वृद्धपणीं आपली अत्यंत काळजी घेईल अशी एकच एक व्यक्ति–अर्थात् बायको–तुम्हांस केली पाहिजे. पण तुम्हीं जर शहाणे झाला नाहींत–पैसे मिळविण्याची अक्कल जर तुमच्या ठिकाणीं नसेल, दाढीमिशा आल्या तरी जर तुमचा 'श्रीगणेशा'च चालूं असेल, तर तुमच्यासारख्या मुर्दाडाला कोण आपली मुलगी बायको करून देईल? मग अशा रुक्ष जीवनांतून तुम्हांला एकटेंच मरेपर्यंत भटकत राहावें लागणार ! मग त्या हालाला काय विचारतां ? यासाठीं आपलें भावी आयुष्य सुखानें जावयास हवें असेल, तर दोन गोष्टींची आपणांस फार जरूर लागणार आहे; व त्या गोष्टी म्हणजे एक बायको व दुसरें द्रव्य याच होत, हें मुलांनो, तुम्हीं कधींही विसरूं नका! कारण, लक्षांत ठेवा, कीं आईचा प्रेमळपणा भरून काढण्यास व सर्व प्रकारें गृहसुख देण्यास जशी भार्येची जरूर आहे, त्याचप्रमाणें तिच्यासह हाकावयाच्या संसाराच्या गाड्याला द्रव्याचें वंगण फार लागत असतें. **'प्रपंचीं सुवर्ण' असें म्हटलेंच आहे.** मुलांनो, हवा, पाणी, उजेड, माती व आकाश अथवा पोकळी याशिवाय या जगांत प्रत्येक वस्तूला किंमत आहे व प्रसंगीं वरील पांच वस्तूंनाही किंमत पडते हें लक्षांत ठेवून, पैशावांचून प्रपंचाचें पानही कसें हालत नाहीं हें नीट ध्यानीं आणा, व मग मला सांगा कीं, हा पैसा ज्या अकलेच्या, हुशारीच्या व शहाणपणाच्या बळावर कमवावयाचा ती अक्कल, ती हुशारी व तें शहाणपण आपणांस लहानपणापासूनच मिळवावयास नको काय? तहान लागल्यावर विहीर खणून कसें चालेल? अक्कल, हुशारी, म्हटल्याबरोबर तीं आकाशांतून थोडीच खालीं पडणार आहेत ? रोमशहरच कशाला, तुमचें घरच पहा. तें काय एका दिवसांत बांधून झालें ? शिवाय,

ह्या गोष्टी पुढें करूं म्हणूनही फारसें भागत नाहीं. कारण चतुराईच्या कमाईला कारण असणाऱ्या विद्यार्जनाचा तरी एक विवक्षित म्हणजे ठराविक काळ असतो, व तो काळ म्हणजे लहानपण हाच होय! ह्या वयांत बुद्धीची अवस्था एकाद्या लवचीक वेलीसारखी, अथवा एकाद्या मातीच्या गोळ्यासारखी, अथवा एखाद्या पांढऱ्या शुभ्र कागदासारखी असते, असें शिक्षणशास्त्रज्ञ आपणांस सांगतात; व तें खरेंही आहे! कारण मुलांनो,—

" **बालपणीं बालांची कोमल तरुतुल्य बुद्धि वाकेल।**
**घेईल ज्या गुणाला, तो गुण मति वेष्टुनीहि फांकेल!॥ १ ॥**"

ही प्रसिद्ध कविता तुम्हांस ठाऊकच असेल. तींत तरी हेंच तत्व—हीच गोष्ट सांगितली आहे. आणि खरोखरीच तशी वस्तुस्थिति आहे कीं नाहीं हें मुलांनो, क्षणभर विचार केल्यास तुम्हांस सुद्धां समजून येईल! यासाठीं आपल्या बुद्धीचें कोमल रोपटें व्यवस्थित तऱ्हेनें वाढून, त्याचा प्रचंड वृक्ष होऊन, त्याचीं गोड फळें आपणांस चाखावयास मिळावयाचीं असल्यास, त्या बुद्धीच्या अंकुराची व्यवस्थित वाढ करणारा, व तिला काट्यांकुट्यांपासून जपून नीट वळण लावणारा बागवान तिला मिळणें अवश्य आहे. बुद्धीच्या ओल्या चिखलाचीं पाहिजेत तशीं खणखणीत मडकीं घडावयास हवीं असल्यास, तिला चक्रावर घालून पाहिजे तो आकार देणारा, व नंतर भट्टींत भाजून काढून तीं कच्चीं मडकीं पक्कीं करणारा, एखादा कुंभार त्यावेळीं मिळणें अवश्य आहे. तसेंच बुद्धीच्य शुभ्र पटावर—कोऱ्या कागदावर—भावी आयुष्यास उपयोगीं पडणारें सुंदर व उठावदार चित्र रेखाटलें जावें अशी इच्छा असल्यास, तशा तऱ्हेचा कुशल चितारीही पण याच वेळीं प्राप्त होणें अवश्य आहे असें मुलांनो, तुम्हाला सुद्धा नाहीं का आतां वाटत? असे अधीर होऊं नका! तो बागवान, तो कुलाल व तो कुशल चितारी खुद्द तुमचे गुरुच असून, ते पहा तुमच्या समोर शांतपणें एका आसनावर बसले

आहेत ! सातव्या आठव्या वर्षी मुंज झाल्यावर सोडमुंज करावयाच्या आधीं हात जोडून गुरूच्या घरीं जाऊन त्यांना साष्टांग नमस्कार घालून बारा वर्षपर्यंत अध्ययन म्हणजे अभ्यास करायचा असतो तो यासाठींच! मग मुला, घाल पाहूं गुरूला नमस्कार ! घाल, अगदीं अनन्य भावानें नमस्कार घाल, व पहा तुझ्या गुरूंच्या हृदयांत वत्सलरसाच्या म्हणजे तुझ्याविषयीं पुत्रप्रेमाच्या लाटा त्यामुळें कशा उसळूं लागल्या आहेत त्या ! तुझ्या नमस्काराच्या नम्र वृत्तीनें तुझे गुरु प्रसन्न झाल्यामुळें ती पाहिलीस का प्रसन्न हास्याची रेषाही पण त्यांच्या मुखावर दिसत आहे ! अहाहा ! केवढा हा नमस्काराचा प्रभाव ! खरोखरच नमस्काराची योग्यता फार मोठी आहे ! दिसायला नमस्कार साधा दिसतो, पण अनन्य भावाचा व लीन वृत्तीचा नमस्कार फार सामर्थ्यसंपन्न आहे ! त्याची कळ दाबल्याबरोबर सर्व ब्रह्मांडभांडाराचीं द्वारें खडाखड खुलीं होतात, वाटेल त्या ज्ञानाची पैदास होते, फार काय पण प्रत्यक्ष परमेश्वराची प्राप्ती सुद्धां या अनन्य नमस्कारानेंच होते ! वाटेल तेवढा अपराधी असो, त्यानें गुरूपुढें, वडिलांपुढें, देवापुढें, साष्टांग नमस्कार घालून दे, म्हणजे क्रोधवन्हीच्या ज्वाळा शांत होऊन त्या ठिकाणीं कृपा उचंबळलेलीच आपणांस दिसून येईल ! फुटलेल्या मोत्यांप्रमाणें तुटलेलीं मनेंही पुन्हा एकत्र सांधतां येत नाहींत असें म्हणतात; पण त्या तुटलेल्या अंतःकरणांना सुद्धा राहाटावरील सुताप्रमाणें बिनतोड सांधणारा दुवा हा नमस्कारच होय ! याप्रमाणें या नमस्काराचे गुण कोठवर सांगू ? रामदासस्वामींनीं ते एके ठिकाणीं संकलित केले आहेत. ते फारच वाचनीय आहेत, यासाठीं मुलांनो, ते मी तुमच्यासाठीं खालीं देत आहे. ते म्हणतात:—

“ नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमिती ।
नमस्कारें मोडलीं जडतीं । समाधानें ! ॥ १ ॥
नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे ।
नमस्कारें गुरुदेव वोळे । साधकावरी ॥ २ ॥

विशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर ।
आणि मुख्य परमेश्वर । कृपा करी ! ॥ ३ ॥
साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूसी लागली ।
सुगम पंथें नेऊन घाली । जेथील तेथें ! ॥ ४ ॥
याकारणें नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें वोळती वरिष्ठ ।
एथें सांगितली स्पष्ट । सहावी भक्ती ॥ ५ ॥ "

आणि अशा तऱ्हेच्या विनम्र वृत्तीचा अंगिकार करणारांविषयींच गुरूच्याही मनाला खरें प्रेम व कौतुक वाटतें व गुरु त्याचीच प्रशंसा लोकांत करतात, व त्याच्या कल्याणासाठीं झटतात; इतकेंच नव्हे, तर गुरुच्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या शिष्यालाच ते आपलें खरें खरें ज्ञानभांडाराचें हृदयसर्वस्व देत असतात ! मुलांनो, या नम्र वृत्तीचे फायदे मी तुम्हाला किती सांगू ? फार काय, सर्व ज्ञानाचें व सर्व गुणांचें मूळ या नम्र वृत्तींत आहे ! उत्तम प्रकारची विद्या, चांगल्या तऱ्हेचा नांवलौकिक, चांगल्या गुणांचें व उत्तम संवयींचें बीजारोपण, या नम्र वृत्तीनें साधलेल्या गुरुकृपेंतच आहे ! मुलांनो, " चार पुस्तकें शिकलों म्हणजे झालें, मग त्यासाठीं गुरुशीं नम्र वृत्ति काय करावयाची आहे ? चार रुपड्या फेकल्या कीं, कोणीही मास्तर झकत आपणास शिकवतोच आहे, मगमास्तरांची एवढी मिजास ती काय ? " इत्यादि तऱ्हेचे वाईटसाईट विचार तुम्ही आपल्या मनांत येऊं देऊं नका बरें. मुलांनो, जगांत सगळींच कामें पैशानें होत नाहींत ! त्या कामाचा देखावा फार तर पैशानें आणतां येईल; पण अंतरींची तळमळ व प्रेम व त्यामुळें होणाऱ्या गोष्टी केवळ पैशानें होतील काय ? " **मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया !** ॥" ही तुकारामाची ओळ तुम्हास ठाऊकच असेल ! गुजराथी समाजांत कोणी मेला म्हणजे अशा मोलानें रडूं घालायची चाल आहे. पण तें रडूं कसचें ? तो केवळ पैशाचा फार्स ! अशा तऱ्हेचा फार्स तुम्हाला आपल्या आयुष्याचा करून घ्यावयाचा आहे

काय ? नसल्यास लक्षांत ठेवा कीं, या जगांत जे जे म्हणून सद्गुण आहेत, ते पैशानें पैदा होत नसतात. संतपणाप्रमाणेंच सच्छील, सदाचार, सद्वृत्ति, सत्संवयी, सद्विचार, या गोष्टी बाजारहाटांत मिळत नाहींत अथवा धनानेंहि पैदा होत नाहींत ! "**नये मोल देतां धनाचिये राशी**" हें तुकोबांचें वचन इथेंही लागूं पडतें ! मुलांनो, मनुष्याला देवानें केवळ बुद्धीच दिली नाहीं, तर त्याजबरोबर अंतःकरण, मन, हृदय, शरीर, आत्मा याही गोष्टी दिल्या आहेत ! या सर्वांची लहानपणीं जोपासना व वाढ योग्य रीतीनें होण्याचें, त्याला चांगलें वळण लावण्याचें ठिकाण प्रथम घर, व नंतर शाळा होय ! अर्थात् शाळा म्हणजे इमारतीच्या चार भिंती नसून तींत वावरणारे तुमचे सवंगडी व तुम्हास शिक्षण देणारे तुमचे गुरु हीच खरी शाळा होय ! तुमच्या सवंगड्यांबद्दल मग मी बोलणारच आहे. पण तुमच्या गुरुबद्दल मला आधीं सांगूं द्या ! कारण या प्रकरणाचा विषय तुमचे " गुरु " हा आहे हें तुम्हास ठाऊकच आहे. पण खुद्द तुमच्या गुरूंचें वर्णन करण्यापूर्वी, त्यांच्याकडे जाणारे जे तुम्ही, त्या तुमचें वर्तन त्यांच्याशीं कसें असावें, तुम्ही त्याच्याशीं कसें वागावें, हें मला प्रथम तुम्हाला सांगावयाचें आहे, व त्यासाठींच मी हे शब्द लिहीत आहे. कारण आपण ज्यांच्याकडे जाणार, त्यांच्यांशीं कसें वागावें हेंच जर आपणांस कळलें नाहीं, तर आपल्या हातून चुका होण्याचा व त्यामुळें आपलें काम व्हावें तसें न होण्याचा संभव आहे. पण आपलें काम जर उत्तम रीतीनें व्हावयाला पाहिजे असेल, तर आपण जातों तेथील वागण्याचे नियम आपण आधीं समजावून घेतले पाहिजेत, हें ओघानेंच आलें. ऐका तर मग मी काय सांगतों तें:—

मुलांनो, मी वर तुह्माला सांगितलेंच कीं तुम्हाला नुसतें डोकेंच देवानें दिलें नसून, त्याच्याबरोबर शरीर व अंतःकरणही दिलेलें आहे ! व या तिन्हींचीही योग्य प्रमाणांत वाढ झाली तरच तुम्हीं खरे खरे सुशिक्षित झालांत असें होणार आहे, हें मुलांनो तुम्हीं कधींही विसरूं नका! अर्थात् यापैकीं कोणच्याही

एका अंगाची वाढ झाली, तर असें एकांगीण वाढ करणारें तुम्हाला मिळालेलें शिक्षण अपुरेंच नव्हे, तर प्रसंगीं घातकही ठरतें; व तो घात केवळ व्यक्तीचा अथवा व्यक्तीपुरता नसून, ती व्यक्ति ज्या धर्मांत जगते, ज्या समाजांत वाढते, ज्या राष्ट्रांत राहते, त्या धर्माच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या अहितालाही त्या व्यक्तीच्या एकांगी शिक्षणाचे घातुक चाळे कारणीभूत होत असतात ! स्वधर्माचा स्वाभिमान, समाजाची सुधारणा व स्वराष्ट्राचा उद्धार, याचेच विचार सदैव मनांत घोळून कृतींत उतरतील व त्याचीच तळमळ चित्ताला लागेल असें उच्च, उदात्त आणि सर्वांगीण जें शिक्षण तेंच खरें शिक्षण होय ! पण अशा तऱ्हेनें व्यक्तीचीच नव्हे, तर त्याच्या धर्माची, समाजाची व राष्ट्राची उन्नति करणारें छातीठोक शिक्षण मुलांना मिळण्याऐवजीं, धर्मसंरक्षणाच्या वेळीं शेपूट घालून पळविणारें, स्वसमाजसुधारणेच्या वेळीं कोणातरी व्यक्तीच्या आड दडविणारें, उघड उघड निर्लज्जपणें पंचविषयांच्या पकडींत सांपडून स्वदेशाभिमानाला जाळून त्यावर अंगार ठेवण्यास प्रवृत्त करणारें, केवळ स्वार्थैक दृष्टीनें गुलामांचे कारखाने माजविणारें व सत्यासत्य, न्यायान्याय, धर्माधर्म ह्यांस पारखें होऊन ' गरीबांचा काळ ' होण्यास शिकविणारें शिक्षणच आज आपणांस मिळत आहे, असें मुलांनो, तुम्हाला सुद्धां नाहीं कां वाटत ? कारण असें पहा कीं, तसें नसतें तर आज आपल्या समाजांत, राष्ट्रांत व धर्मांत ज्या गोष्टींचा धुमाकूळ माजला असून धुडगूस चालला आहे, त्या गोष्टींची विल्हेवाट केव्हांच लागायला पाहिजे होती, व तशी ती लागलीही असती ! पण तशी ती लागली नाहीं, याचें कारण वरील सर्वांगीण शिक्षणाचा अभाव हेंच होय ! तशा प्रकारचें सर्वांगीण शिक्षण गुरूनीं दिलें नाहीं म्हणण्यापेक्षां, शिष्यांनीं तें मिळविलें नाहीं, तें मिळविण्याचें कामीं शिष्याची जी विनम्र वृत्तीची तळमळ दिसायला हवी ती आजवर फारच थोड्या शिष्यांचे ठायीं दिसून आली, व तेच शिष्य पुढें सुकीर्तीनें सजून समाजांत चमकून गेले, हें सर्वांनीं लक्षांत ठेवलें

पाहिजे! पण इतर सुशिक्षितांची स्थिति किती नादान आहे याचें आतां वेगळें वर्णन कशास पाहिजे ? मुलांनो, तुमच्या तीक्ष्ण दृष्टीला तें केव्हांच दिसून आलें असेल. मग सांगा, त्याच शेणकिड्यांत वळवळ करीत पडून राहण्याची तुमची इच्छा आहे काय ? शक्य नाहीं ! नाहींना ? ह्या देखाव्यानें तुमच्या मनांस अगदीं खरा खरा वमनवत् वीट आणि उबग उत्पन्न झाला ना ? चला तर मग तुमच्या गुरूपुढें! मुलांनो, गुरूपुढें जाण्याच्या आधीं स्वतःची तयारी किती असावी लागते पाहिलीत ना ? पण इतकी तयारी होणें तुम्हांला अशक्य वाटत असल्यास, मी तुम्हांला सर्व ज्ञानभांडाराची किल्ली, व सर्वांगीण उन्नतीच्या शिक्षणाचा पाया, जो नम्रपणा त्याची **गुरुकिल्ली** वर सांगितलीच आहे. तेवढी जरी तुम्हीं हृदयाशीं धरलीत तरी तुमचें कार्य होणार आहे ! किंबहुना, परमार्थाप्रमाणेंच ह्या शिक्षणाच्या मार्गांतही त्याच किल्लीचा उपयोग होतो, हें तुम्हीं सदैव लक्षांत ठेवा ! कारण परमेश्वरप्राप्तीपेक्षां मोठें असें जगांत काय आहे ? पण तो सुद्धां केवळ ह्या विनम्र वृत्तीच्या जोरावर प्राप्त होऊं शकतो, हें मीं मागें सांगितलेंच आहे. तुकोबा म्हणतातः—

**" जरी व्हावा तुज देव । तरी हा सुलभ उपाव ॥ १ ॥**
**करीं मस्तक ठेंगणा । लागे संतांच्या चरणा ॥ २ ॥"**

भगवान् श्रीकृष्णही आपल्या आवडत्या गीतेंत आपल्या लाडक्या भक्ताला हाच उपदेश करीत आहेत कीं, बाबा अर्जुनाः—

**" तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । "**

म्हणजे " गुरूपुढें साष्टांग नमस्कार घालून, त्यांची सेवा करून, (मग) त्यांना प्रश्न विचारून जिज्ञासापूर्वक हें सर्व ज्ञान तूं प्राप्त करून घे बरें ! " परमार्थांतल्या लक्षावधि सामान्य जीवांना ज्याप्रमाणें " दोन हस्तक व तिसरा मस्तक " हा अत्यंत " सुलभ उपाव " तुकोबांनीं सांगितला त्याप्रमाणें विद्यामंदिरांत पाऊल टाकणाऱ्या लक्षावधि सामान्य विद्यार्थ्यांनाही आम्ही हेंच सांगतों कीं बाळांनो, ह्या ठिकाणाहून, ह्या

गुरुगृहांतून, ह्या विद्यामंदिरांतून तुम्हांला असामान्य ‘ वीर ’ म्हणून बाहेर पडायचें असेल, आपल्या तळपत्या तेजानें शत्रूचे डोळे दिपवून स्वदेश, स्वधर्म व स्वराष्ट्र यांचा उद्धार करणारे, अपार बुद्धिमत्तेचे, अलोट मनोधैर्याचे, आणि कणखर मनगटाचे महामेरु ह्मणून मिरवायचें असेल व मनगट, मेंदू आणि मन ह्या ‘ म ’कारत्रयीला मान्यतेच्या मंडपावर मनमुराद चढवायची असेल तर मुला, तुला एकच खूणगांठ सांगतों ती लक्षांत ठेव, व ती खूणगांठ ह्मणजे आपल्या गुरूच्या उपदेशाप्रमाणें सदैव वागून “ **त्यांची आज्ञा सदैव मानावी** ” हीच होय ! ह्मणजेच नम्रपणाचा ठसा तुझ्या हृदयांत पडूं दे ! तो पडला ह्मणजे प्रत्यक्ष परमेश्वराचीं पाउलेंच तिथें उमटलीं ह्यांत शंका नाहीं ! गुरूची सेवा, व गुरुगृहींचें काम क्वचित् काळीं करण्याचा प्रसंग आला तरी डगमगूं नकोस किंवा संकोच मानूं नकोस. अरे, रामकृष्णासारख्यांनीं सुद्धा जीं कामें केलीं तीं करायला तुझ्यासारख्यानें कां बरें लाजावें ? तेंच आह्मांस समजत नाहीं. किंबहुना:—

“**गुरुचे घरीं झाडितो सारवीतो। मला तो गमे भूतळींचा रवी तो॥**”

असें समर्थ रामदासस्वामी म्हणतात त्यांत पुष्कळ तथ्यांश आहे हें विसरूं नकोस. म्हणूनच गुरूला नुसता प्रणिपात करूनच न थांबतां ‘ सेवा ’धर्म सुद्धां गाजवायला भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलें आहे ! पण हा ‘ सेवाधर्म ’ असा आहे कीं, सर्व सेवाधर्माचें मूळ ह्यानेंच तुटून जातें ! असो, पण इतक्याही पल्ल्यापर्यंत आजकालचे गुरु सहसा जाणार नाहींत व आम्हीही मुलांनो, तुम्हाला तेथपर्यंत नेत नाहीं ! पण खऱ्या खऱ्या नम्रत्वाच्या पोटीं प्रसंगीं वरील सर्व गोष्टी येत असतात हें विसरून चालणार नाहीं. असो. अशा तऱ्हेची विनम्र वृत्ति सदैव धारण करून गुरूपुढें चला ! ते पहा तुमचे गुरु एका आसनावर शांतपणें बसले आहेत ! पावित्र्य, उच्च विचार, आणि स्वदेश–स्वधर्म–स्वसमाजोन्नतीची तळमळ ह्यांची प्रभा त्यांच्या आसमंतात् फांकलेली आहे, ती मुलांनो,

तुमच्या सूक्ष्म दृष्टीला दिसली का ? पहा नीट पहा, म्हणजे ती दिसल्या-शिवाय राहणार नाहीं ! अहाहा ! अशा गुरुपुढें साष्टांग दंडवत घालून विनम्र वृत्तीनें त्यांच्या चरणांजवळ बसावें असें कोणास बरें वाटणार नाहीं? आणि असें ज्यास वाटेल तोच सच्छिष्य होय ! किंबहुना, जी भक्ताची भगवंताविषयीं, जी पत्नीची पतीविषयीं एकनिष्ठा व तत्परता दिसून येते तोच तत्परतेचा थाट इथेंही उडाला पाहिजे व सच्छिष्याचे घरीं तो तसा दृष्टीस पडतोही. ज्ञानोबांनीं पारमार्थिक गुरूच्या सेवेची शिष्याच्या मनांत अपरंपार हाव असावी म्हणून त्याचें जें बहारीचें वर्णन आपल्या जगमान्य ज्ञानेश्वरी ग्रंथांत केलें आहे तें थोडयाबहुत प्रमाणांत इथेंही लागूं आहे हें विसरून चालणार नाहीं. किंबहुना, " **देवाच्या इच्छेनें वर्तावें । देव करील ते मानावें । मग सहजचि भावें । कृपाळू देव !"**
वर्तावें । देव करील तें मानावें । मग सहजचि भावें । कृपाळू देव ! ॥"
ही जशी भक्ताची वाणी तशीच, तींत थोडा फेरफार करून खुद्द **गुरु-देवा**बद्दलही—

" **गुरूच्या इच्छेनें वर्तावें । गुरु करील ते मानावें । मग सहजचि भावें । कृपाळू गुरु ॥** " अशी वाणी खऱ्या सच्छिष्याचें तोंडूनही निघायला पाहिजे व ती निघतेही ! ' गुर्वाज्ञा ' प्रमाण मानून प्रसंगीं प्राणावर बेतली तरी न डगमगणाऱ्या पूर्वीच्या राम, कृष्ण, कच, इत्यादि शिष्यांचीं चरित्रें वाचा, म्हणजे अशा शिष्यांनींच ह्या दिव्य सेवेच्या जोरावर खरें खरें ' **विद्यासाधन** ' केलेलें आहे असें तुम्हांस दिसून येईल ! मुलांनो, अशा तऱ्हेची चिकाटीची योग्यता तुमच्यापैकीं कितीजणांच्या जवळ आहे बरें ? तुमच्यांपैकीं बहुतेक मुलें पाहिलीं, तर वरील चिकाटीची योग्यता तर राहोच, पण गुरुविषयीं खरी सादर नम्र वृत्ति व सर्वांगीण ज्ञानाची व उन्नतीची तळमळ त्यांत फारच थोडयांच्या अंगीं दृष्टीस पडते ! इतकेंच नव्हे, तर अशा तळमळीनें कुणी यत्न करूं गेल्यास त्या बापडया गुरूला शेवटीं निराशेच्या हताशपणांतच बुडून जावें लागतें—हताश होऊन निराशेचा ' एकच प्याला ' तोंडीं लावावा लागतो ! तुम्हाला तुमची स्वतःची अक्कल नाहीं, गुरु सांगतील तेंही

मानायचें नाहीं; प्रारंभीं सांगितलेल्या क्षुद्र भावनांच्या माशा जणो तुमच्या सडक्या मनोभूमीकेवर सदैव घोंगावत असल्यासारखें तुमचें वर्तन; हें सर्व पाहिलें म्हणजे तुमचें पुढें होणार तरी काय? अशी प्रत्येक कळकळीच्या मनुष्याला तळमळ वाटते; व शेवटीं नाना यत्न करूनही यश न आल्यास " जाऊं द्या. ज्याचें नशीब त्याच्याबरोबर " असें म्हणून हताशपणाचे उद्गार काढावे लागतात! मुलांनो, ह्या गोष्टी तुम्ही कधीं समजणार? भावी पिढीचे आधारस्तंभ, भावी समजाचे घटक आणि भावी राष्ट्राचे नागरिक आतां तुम्हीच होणार असून आम्ही आज नाहीं उद्या या जगांतून जाणार! त्या समाजाकडे, त्या राष्ट्राकडे आणि त्या पिढीकडे पाहूनच तुमच्यासाठीं आमचा जीव इतका तळमळतो! मग तुम्ही आपल्या बेपर्वाईच्या वर्तनाची छानछबेली सोडून खऱ्या विनम्र वृत्तीनें वर सांगितलेल्या तळमळीनें केव्हां वागणार? लागा, अगदीं ह्या घटकेपासून, आपल्या आईबापांची व आपल्या देवाधर्मांची शपथ घेऊन, त्याप्रमाणें निश्चयानें वागायला लागा आणि पहा कसा हां हां म्हणतां तुमच्या जीवनचरित्रांत फरक पडतो तो!

अहाहा! इतक्या तऱ्हेनें सर्वस्वार्पण करणाऱ्या व इतकी अलोट ज्ञान-पिपासा बाळगणाऱ्या त्या सच्छिष्याची "**ज्ञानांवाचूनि तळमळ। जाणार नाहीं ॥**" अशी तळमळीची तहान, गुरु तत्काल पुरविल्यावांचून कधींही राहणार नाहींत व राहतही नाहींत! "**आपणासारिखे करिती तात्काळ। नाहीं काळवेळ तयालागीं ॥**" ही पारमार्थिक गुरूविषयींची उक्ति येथेंही थोडीबहूत लागू पडते ह्यांत शंका नाहीं. पण असें व्हायला, "**धरावें तें पाय आधीं त्याचे** " हें विसरून चालणार नाहीं! असो.

सद्गुरूचे अथवा गुरूचे सुद्धा अशा सत्शिष्याविषयीं किती प्रेम असतें म्हणून सांगावें? तें इतकें असतें कीं प्रत्यक्ष पुत्रावरही प्रसंगीं इतकें प्रेम नसेल! आणि तें साहजीकच आहे. कारण ज्ञानाचा जन्म देणारा 'बाप' गुरूच असल्यामुळें त्याचेंही हृदय शिष्याविषयीं पुत्रवात्सल्यानें

प्रपूरित असावें—पुरेपूर भरलेलें असावें हें ठीकच आहे! किंबहुना, तें प्रेम इतकें निःस्वार्थ असतें कीं बापाप्रमाणेंच गुरूला आपला ‘ बेटा ’ ‘ सवाई ’ निघावा—आपल्यापेक्षां ‘ सवाई शूर’ सर्व बाबतींत तो व्हावा, किंबहुना, बभ्रुवाहनानें अर्जुनाचा, अथवा कुशलवांनीं रामाचा केला तसा आपल्या शिष्यांनीं आपला पराभव करावा—“ **शिष्यादिच्छेत् पराजयं** ” अशी सात्विक प्रेमानें गहिंवरलेली इच्छाही त्या सद्गुरूच्या ( म्हणजे चांगल्या शिक्षकाच्या ) हृदयांत भरून राहिलेली असते! अहाहा! फार काय सांगावें, पण प्रत्यक्ष प्राणावर बेतली तरी आपल्या शिष्याला वांचवून त्याचें कोटकल्याण करण्यास सहृदय गुरु चुकत नाहींत याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे शुक्राचार्यांचें होय! मद्यपानाच्या घातुक व्यसनानें जरी त्यांना पछाडलेलें होतें तरी शुक्राचार्यांचें हृदय म्हणजे खरोखर उदात्त विचारांचा, दिव्य भावनांचा व सहृदय सद्‌गुणांचा एक सागरच होतें ह्यांत शंका नाहीं! त्यांच्या दारूबाजीच्या घातक व्यसनाचा फायदा घेऊन, खुद्द कचाची रक्षा गुरूच्या मद्यपात्रांतून गुरुच्या घशाखालीं उतरेल अशी व्यवस्था दुष्ट राक्षसांनीं केली असतां, देवगुरु बृहस्पतीच्या त्या पुत्राविषयीं तितक्याच पुत्रवात्सल्यानें हृदय भरलेल्या शुक्राचार्यांनीं, त्या दुष्ट दैत्यांची आधीं सणसणीत हजेरी घेतली! पण तेवढें करूनच न राहतां, शुक्राचार्य आपल्या लाडक्या देवयानीच्या व प्रिय शिष्य कचाच्या कल्याणासाठीं प्रत्यक्ष स्वात्मार्पणाला सुद्धा कसे तयार झाले, व त्यांतून शेवटीं देवयानीची इच्छा पुरविण्यासाठीं कशा युक्तीनें पार पडले, ती कथा मोठी हृदयस्पर्शी आहे, व मोरोपंतांनीं ती आपल्या ‘ **कचोपाख्यानांत** ’ फारच बहारीनें रेखाटली आहे! मुलांनो, तुमच्यासाठीं त्यांतील तो हृदयस्पर्शी प्रसंग थोडक्यांत खालीं देतों. ऐका, पंत म्हणतातः—

**“ शुक्र म्हणे वत्से कच कुक्षि विदारुनि निघेल बाहेर।**
**हा तरलाचि परि तुझे या कुव्यसनीं बुडेल माहेर ॥ १ ॥**

सुरयानी त्यासि म्हणे, वदतां हें अशुभ काय हो तात ।
व्हावे दोघेहि मला, चिंता-मणि हेचि पाय होतात ॥ २ ॥
भीड सुतेची भारी, विद्या संजीविनी कचा शिकवी ।
गुरुलाहि वांचवाया योग्य करी सज्जना कचासि कवी ॥ ३ ॥
गुरुकुक्षि विदारुनि कच बाहेर निघे, परंतु बहु तो भी ।
उठवुनि गुरु संकोचें नमुनि रडे, कुलजकीर्तिचा लोभी ॥४॥'

अहाहा ! मुलांनो, किती हा हृदयस्पर्शी प्रसंग आहे ! आपल्या गुरूला प्राणांतिक वेदनांच्या अपमानाच्या मर्मांतिक वेदना देऊन पुन्हा जणों ' आपण त्या गांवचेच नव्हेत ' अशा बेपर्वाईनें हंसत खिदळत गुरूचा पावलोपावलीं अपमान करणारे तुम्ही कुठें, व गुरूच्या पायावर लोळण घेऊन स्फुंदस्फुदून रडणारा, ' कुळजकीर्तिचा लोभी ' असा तो शिष्यवर कच कुठें ! मुलांनो, यापासून तुम्ही कांहींच का बोध घेणार नाहीं ? असें होणें शक्य नाहीं ! कारण कचाची कथाच इतकी हृदयस्पर्शी आहे कीं, ती ज्याच्या ज्याच्या कर्णीं जाईल, त्याच्या त्याच्या मनावर आपल्या सत्प्रवृत्तीचा तीव्र आघात अर्थात् सत्परिणाम केल्या-वांचून ती खास राहणार नाहीं ! व तसाच परिणाम तुमच्याहि मनावर निस्संशय झालेला आहे, अशी मला खात्री असल्यामुळें ह्यापुढें त्या-संबंधानें अधिक कांहीं न सांगतां, पश्चात्तापानें पावन झालेल्या तुम्हा सच्छिष्यांना आतां मी तुमच्या सवंगड्यांकडे उर्फ मित्रांकडे घेऊन जातो. चला तर !

## मित्र.

जगांत जी वस्तु अमूल्य, ती दुर्मिळ व गुप्त असायची हा नियम ठरलेला आहे. ' मित्र ' ही चीजही अशीच आहे. खऱ्या मित्राचें मोल कशानेंच होणें शक्य नाहीं. किंबहुना, उभ्या जन्मांत ज्या जीवाला एकही जिवाभावाचा मित्र मिळाला नाहीं तो जीव दुर्दैवी होय, अशा तऱ्हेचें उद्गार प्रसिद्ध लेखकांनीं काढलेले आहेत, त्याचें तरी कारण

हेंच, कीं मित्राची योग्यता कांहीं निराळीच आहे. '**वाईकर भटजी**'नीं ह्यासंबंधीं काढलेले उद्‌गार मोठे वाचनीय आणि मननीय आहेत. ते म्हणतातः— " मित्र म्हणजे स्वतःचाच एक अंश अशी समजूत सर्वत्र आढळते. या प्रपंचांत मित्र असा कांहीं एक पदार्थ आहे, म्हणून तर कित्येक वेळा समाधान वाटतें. सुखदुःखाच्या चार गोष्टी सांगून व ऐकून, खचलेली उमेद सावरून धरणारा मित्राखेरीज अन्य कोण मिळणार आहे ? आपल्या अंगीं काय चार दोन सद्‌गुण असतील, त्यांचा परिमल फांकविण्याचें काम मित्राशिवाय दुसऱ्या कोणाच्या हातून घडणार ? चुकूनवाकून एखादी गैर गोष्ट घडली तर तिजवर पांघरूण घालणें एक मित्रच करूं जाणें; आणि संकटकाळ अथवा अडचणींचा प्रसंग ओढवला तर त्यावेळीं हिंमत देणारा, आणि कूर्मदृष्टि राखून आपला खांदा देण्यास पुढें सरसावणारा, एका मित्राशिवाय कोणी मिळावयाचा नाहीं. अशा अनेक कारणांमुळें मी सदा मित्रासाठीं हपापलेला असे. सुखाचा उपभोग, दुःखाचें निवारण, सद्‌गुणांचें अभिनंदन, दुर्गुणांचा निषेध, संकटकाळाचा खंबीर आसरा, लौकिकसंपादनाचा आधार, हिताची जोड, पुण्याकडे प्रवृत्ति वळविणारी, फार काय सांगावें, प्रपंचांतील दगदग व त्रास न भासूं देणारी साक्षात् देवता म्हणजे काय ती एक मैत्री, असा अनुभव नसणारे दुर्दैवी या जगांत फारच थोडे असतील. शारीरिक व्यंग किंवा पंचेंद्रियांपैकीं एखाद्या इंद्रियाची वाण एखादे वेळ पत्करेल, पण प्रापंचिक वाण म्हणजे अर्थात् मित्राचा अभाव खरोखर अगदीं दुःसह होय, हें कोणीही तेव्हांच कबूल करील." अहाहा ! मुलांनो, मित्राच्या महतीचें वर्णन करणारे किती हे सुंदर उद्गार आहेत ! आणि खरोखरच–" **मित्रं प्रीतिरसायनं नयनयोरानंदनं चेतसः** " म्हणजे प्रेमाचें वसतिस्थान आणि चित्ताचा आनंद एक सन्मित्रच होय असें म्हणतात तें अक्षरशः खरें आहे. खऱ्या मित्राची योग्यताच कांहीं न्यारी आहे. किंबहुना, तशी योग्यता असेल तोच खरा

मित्र होय हें मुलांनो, तुम्ही कधींही विसरूं नका ! यासाठीं खऱ्या मित्राची वर सांगितलेलीं व मी पुढें सांगत आहे तीं लक्षणें व पारख लक्ष्यांत ठेवून त्या कसोटीवर घासून जो त्या कसास उतरेल त्यालाच तुम्ही आपला खरा खरा जिवाभावाचा मित्र समजा ! कारण ' मित्र ' ह्या नावांनीं सजलेले ' होळीचे होळकर ' तुमच्या आवतींभोवतीं पुष्कळच नाचत असतील ! पण ते सगळेच मित्र नसतात ! परीक्षेची वेळ आली कीं, काचेप्रमाणें कुटकन् मोडून जाणारी बहुतेकांची मैत्री असून वाटेल त्या आघाताखालीं न पिचता टिकून राहणारा मैत्रीचा ' हिरा ' एखादाच असतो, व तोच खऱ्या मित्रपदास पात्र होतो ! यासाठीं आपण आतां ' सन्मित्रलक्षणा'कडे वळूं या !

' सन्मित्रा'च्या सर्व ' लक्षणां'त अत्यंत महत्वाचें लक्षण म्हणजे जो कोणच्याही परिस्थितींत आपला मित्रच राहातो, आपल्या कल्याणासाठीं झटतो, व प्रसंगीं प्राणाकडेही पहात नाहीं, तोच खरा मित्र होय ! मुलांनो, जगाच्या बाजाराकडे तुम्ही दृष्टि फेका, म्हणजे मनुष्याच्या चालत्या काळांत त्याच्या भोंवतीं मित्र म्हणून मिरवणारी मंडळी जितकी असते तितकी त्याच्या पडत्या काळीं नसते, किंबहुना, त्यावेळीं एखादाच जाग्यावर टिकतो, व तोच खरा मित्र असतो, असेंच तुम्हांस दिसून येईल ! ' असतील शितें तर जमतील भुतें ' किंवा ' **शितें तंवर तीं भुतें भोंवतीं, हाच जगाला न्याय खरा** ' असाच देखावा बहुतेक सर्वत्र पहावयास सांपडतो. पण तीं शितें संपलीं, द्रव्याची ऊब दूर झाली व पूर्वींची चमन चालेनाशी झाली कीं, त्या शितांसाठीं हपापून आवतीं भोंवतीं नाचणारी भुतांची भुतावळ पार पळून जाते, प्रत्यक्ष सगे–सोयरे व आप्तेष्ट सुद्धां अशा गरीब जीवाला सोडतात, मग केवळ 'मिष्टान्न' साठींच जमणाऱ्या ' इतरेजनां'ची गोष्ट काय सांगावी ? दैन्य, दारिद्र्य, दुःख कोसळलें, मोठी आफत येऊन आदळली, शत्रूशीं सामना देण्याचा प्रसंग आला, दुर्भिक्ष प्राप्त झालें, व अंतकाळचा समय आला, म्हणजे मित्रमंडळ

कसें दूर दूर पळत असतें तें पाहा, म्हणजे मुलांनो, मी काय म्हणतों त्याची प्रचीती तुम्हांला येईल. ‘ **सुखाचे सांगाती सर्वही मिळती । दुःख होतां जाती निघोनियां ॥** ’ ही संतवाणीच खरी असल्याचें तुम्हांस दिसून येईल. ‘ ताज्या घोड्यावरच्या गोमाशां ’ प्रमाणें ‘ होळीचे होळकर ’ पुष्कळ असतात; पण त्यांची खरी कसोटी दुःखाच्या वेळींच होत असते; किंबहुना, ‘ **संपत्तींत मित्र कळत नाहीं, व विपत्तींत शत्रु लपत नाहीं** ’ अशा अर्थाचें जें वचन आहे तेंही हेंच सांगतें कीं, मित्राची खरी पारख आपत्तींतच होते. तेव्हां कोणत्याही प्रसंगीं जो टिकेल तोच खरा आपला सखा ही गोष्ट विसरून चालणार नाहीं ! म्हणूनच मुलांनो, एका संस्कृत कवीनें जें म्हटलें आहे कीं:—

“ **उत्सवे व्यसने चैव दुर्भिक्षे शत्रुविग्रहे ।**
**राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बांधवः ॥** ”

त्याचा तरी अर्थ हाच आहे !

तसेंच लहानपणची मैत्री मोठेपणीं टिकत नाहीं. लहानपणीं अगदीं गळ्यांत गळा घालून मैत्रीच्या आणाभाका करणारा जीव जर मोठ्या अधिकारास चढला, संपत्तीच्या राशीवर बसला, तर तो आपल्या पूर्वींच्या गरीब मित्रास मोजीत नाहीं, असाही देखावा पुष्कळ वेळा पहावयास सांपडतो ! किंबहुना, ‘ कोण मनुष्य कसा आहे याची पारख करावयाची असल्यास त्याच्या हातीं अधिकार देऊन पहा ’ असें जें वचन आहे, तें तरी हेंच सांगतें कीं, अशा उच्च अवस्थेंत डोकें फिरून जाणारीं मंडळीच जास्त असतात. पण तीं अर्थात् मित्रपदाला नालायक असतात ! गरीब **द्रोणाचार्य** ब्राह्मणाचा **द्रुपदराजानें** भर दरबारांत कसा अपमान केला, त्याची गोष्ट मुलांनो, तुम्ही महाभारतांत वाचलीच असेल. ती ह्याचीच दर्शक आहे. पण तेंच **कृष्णसख्याचें** चित्र पहा ! द्रोणाचार्यांपेक्षां शतपटीनें गरीब अशा **सुदाम** मित्राला तो कृष्णसखा यत्किंचित् तरी विसरला काय ? सुदामदेव ज्यावेळीं द्वारकेस गेले

त्यावेळीं त्या ‘ द्वारकेच्या राण्या’नीं त्याच्याविषयीं मित्रप्रेमाचा केवढा उमाळा दाखविला व निर्गुण ब्रह्मसनातन अशा कृष्णप्रभूनें त्यासाठीं कसे खळखळ अश्रु ढाळले, व शेवटीं अपर द्वारका अशी सोन्याची सुदामनगरी त्यास कशी श्रीकृष्णांनीं अर्पण केली, त्याची सात्विक भावानें उतरलेली कथा मुलांनो, मी तुम्हाला माझ्या “ **भगवान् श्रीकृष्ण** ” ह्या पुस्तकांत सांगितलीच आहे. तुमच्यापैकीं कोणी जर ती अद्याप वाचली नसेल तर ती जरूर वाचा, म्हणजे ‘ **मित्रप्रेमाचा मूर्तिमंत आदर्श भगवान् श्रीकृष्ण होतो** ’ असें मी कां म्हणतों तें तुमच्या नीट ध्यानीं येईल ! अहाहा ! श्रीकृष्णाच्या त्या मित्रप्रेमाची आठवण झाली कीं, त्याचें सर्व बालचरित डोळ्यापुढें उभें राहून आपल्या सवंगड्यांसाठीं श्रीकृष्णाचा जीव कसा क्षणाक्षणाला तळमळत असे, त्यांच्या संगतीच्या संगीतांत तो कसा झुलत असे--डोलत असे, व त्यांच्या विरहानें तो कसा हुरहुरत असे, त्याची गोड आठवण चित्ताला वेडावूं लागते, व त्या मधुर संगीताचे सूर पुन्हा छेडावे, त्या गोड बांसरीचे बोल पुन्हा बोलावे, असा अनिवार मोह मनाला होऊं लागतो ! पण मुलांनो, हा सर्व आनंद मी एकदा माझ्या प्रिय पुस्तकांत–“**भगवान् श्रीकृष्ण** ”– ह्या ग्रंथांत लुटला असल्यामुळें, श्रीकृष्णाच्या मित्रप्रेमाचा बालपणींचा आदर्श त्यांत पहा म्हणून त्याकडे केवळ अंगुलिनिर्देश करण्यावांचून मला येथें अधिक काहींही करतां येणें शक्य नाहीं ! यासाठीं मुलांनो, तुम्ही जरूर एकदां तें पुस्तक पहा, असें मी केवळ तुमच्या प्रेमाखातर तुम्हास सांगत आहे ! तसें तुम्ही तें पाहिलेंत म्हणजे मी बालपणींच्या मैत्रीचा आदर्श म्हणून श्रीकृष्णाकडे कां बोट दाखवीत आहे तें तुम्हांस नीट कळून येईल, यापेक्षां अधिक काय सांगूं? असो. मुलांनो, ‘ मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ’ ह्या म्हणीप्रमाणें, जी लहानपणची गोष्ट तीच तरुणपणची कथा असून, बाळपणीं मैत्रीचा महिमा गाजविणारा भगवान् मोठेपणींहा त्याच मैत्रीचा मेवा आपल्या जिवाभावाच्या मित्रांना लुटीत

राहिला असेल, हें काय सांगायला हवें ? त्या द्वारकेच्या राण्यानें सुदामदेवाशीं आपली मैत्री कशी जागविली तें वर सांगितलेंच आहे. त्या नंतरचा श्रीकृष्णाच्या मित्रप्रेमाचा विशेष देखावा **नरनारायणाच्या** जोडींत म्हणजे **कृष्णार्जुनाच्या** दिव्य मैत्रींत दिसून येतो ! अर्जुनासाठीं श्रीकृष्णांनीं काय बरें केलें नाहीं ? काय करायचें त्यांनीं बाकी ठेविलें होतें ? सर्व जगच्चालक, लक्ष्मीवल्लभ भगवान् आपला मोठेपणा विसरून अर्जुनाचा मोतद्दार झाला, हा मित्रप्रेमाचा खरोखर कळस होय ! भक्त-भगवंताची जोडी ही मित्रांची जोडी धरल्यास त्या प्रभूच्या मैत्रीचें कौतुक केवळ रामायण व महाभारतांतच नसून सर्व जगांतील सर्व भक्तांचीं चरित्रें कंठरवानें आपणांस तेंच सांगत आहेत. तीं सर्व सांगूं गेल्यास कित्येक ग्रंथही पुरे पडाणार नाहींत ! असो. तर मुलांनो, सांगण्याचा भाग असा कीं, मैत्री असावी तर अशी असावी ! ' **शेक्सपीअर** नामक प्रख्यात आंग्ल नाटककाराच्या ' **हॅम्लेट** ' चें भाषांतर करणारे कै. आगरकर यांनीं आपल्या ' विकारविलसितां'त शालेयाच्या तोंडीं या मैत्रीबद्दल असेच मननीय उद्गार घातले आहेत. ते म्हणतात:— " एकदोनच मित्र कां होईनात, पण त्यांच्या लायकीविषयीं मनाची पूर्ण खात्री झाली ह्मणजे त्यांच्या जिवास जीव देण्यास तयार असावें पण ज्या त्या उपटसुंभ्याला दे मेजवान्या आणि घाल गिळायला, असें करूं नये. " असो. आतां आपण सन्मित्राच्या इतर कांहीं लक्षणांकडे वळूं !

मोरोपंत म्हणतात:—" **तो मित्र होय बापा ! पापाचरांत जो बुडों नेदी** ॥." पापापासून परावृत्त करून पुण्याकडे प्रवृत्ति वळविणारा तोच खरा मित्र होय! पापाच्या डोहांत बुडणाऱ्या 'बुडत्याचा पाय' अधिकच 'खोलांत' कसा जाईल हें पाहणारा व त्याच्या ' वसरगुंडीची सफर ' पुरी करण्यास मदत करणारा नरपशु त्याचा कधींतरी मित्र म्हणतां येईल काय ? पापाच्या पर्वतांची रास रचण्यास मदत करून त्याखालीं एखाद्या मनु-

ष्याची कीर्ति, अब्रु, पैसा, देह, नीति व कुलशील यांचा चक्काचूर उड-वून त्याला आग लावून देणारा आग्यावेताळ त्या मनुष्याचा मित्र म्हणतां येईल काय ? मुलांनो, अशा खळाची मैत्री ह्मणजे ' पिहित-मुख खळगा 'च होय ! आणि तरुणांना तर विशेषच, पण मुलांनो, तुम्हांला सुद्धां अशा मित्र ह्मणविणाऱ्या दुष्टांपासून दूर राहिलें पाहिजे ! कारण, कोवळ्या लुसलुशीत गवतानें आच्छादिलेल्या खड्डयाप्रमाणेंच तो इसम असतो. त्याच्या ' जिभेवर साखर पण हृदयांत हालाहल ' असतें ! उघड दिसणाऱ्या खड्डयाप्रमाणें एक वेळ उघड शत्रु पुरवला, पण मैत्रीच्या गोड देखाव्याखालीं पापाच्या खोल दरींत लोटून पुरेपूर नागविणाऱ्या आणि पापगर्तेत रुतविणाऱ्या ह्या प्रछन्न शत्रूंशीं प्रसंग नको ! पण उघड शत्रूंपेक्षां असा ' केंसानें गळा कापणारे ' मांग-हृदयी कसाईच केव्हांही व कोणच्याही समाजांत अधिक पाहावयास सांपडतात, व उघड शत्रूंपेक्षां तेच मनुष्याचा नाश अधिक करतात ! व यासाठीं त्यांच्यापासून स्वतःला विशेष जपलें पाहिजे! त्या कामीं आपल्या हृदयांत राहणाऱ्या परमेश्वराची मूक वाणी व सदसद्विवेक बुद्धीचे बोल आपण ऐकले पाहिजेत. कारण, **मनुष्याचा खरा मित्र तोच हृदयस्थ परमात्मा आहे.** पण जगाच्या भुलभुलावणीची मौजच अशी आहे कीं, अशा परमात्म्याला सुद्धां बाजूला सारून मनुष्य ह्या खोट्या मैत्रीच्या मृगजळामागें धांवत सुटतो, व शेवटीं हा मानवी मृग लवकरच शुद्धीवर न आल्यास शेवटीं उरीं फुटून मरून जातो ! मुलांनो, उतारावरून पळत जाणें अथवा घसरत जाणें फार सोपें असतें, पण चढण चढणेंच कठिण असतें हें तुह्मांस माहीतच आहे ! पण जें सहज, सोपें व सकृद्दर्शनीं सुखावह, तें पुष्कळदा वाईट असतें, पापमय असते, व जें कष्टप्रद, प्रयत्नांनीं प्राप्त होणारे, व प्रथम दुःखदायक असलें तरी उत्तरोत्तर सुखा-वह वाटत जाणारें असतें, तेंच पुण्यप्रदेशांतील पावनतीर्थ असतें, हें तुम्ही कधींही विसरूं नका ! पर्वतीच्या पायऱ्यांवरून पळत येतांना

मोठी मौज वाटते पण त्या पायरीवरील प्रत्येक पावलापावलाला त्या पर्वतीदेवीपासून व ह्मणूनच त्या पार्वतीपरमेश्वरापासून आपण दूरदूर जात असतों, ह्याची जाणीव कितीकांना असते बरें ? एकदा खालीं आलें कीं तो वरचा शुद्ध, शीतल, सात्विक वायू आपणांस पुन्हा कुठला लाभायला ? तो हवा असेल तर पश्चात्तापाच्या पावलांनीं पुन्हा त्या पर्वतीच्या पायऱ्याच चढूं लागलें पाहिजे ही गोष्ट खरीना ? मग अशी धांवपळ करण्यापेक्षां निश्चयाच्या पावलांनीं 'पुण्याची पर्वती' चढून जाऊन तेथील सात्विक व सुशीतल वायूच्या सुखद सहवासांतच सदैव राहिल्यास तें अधिक बरें नव्हे काय? मुलांनो, तुम्हांला जर तसें करावयाचें असेल, तर त्या कामीं तम्हाला आतां-पासूनच खबरदारी घेतली पाहिजे व आपला सन्मित्र शोधून काढला पाहिजे ! यासाठीं फार सावध असा बरें ? ह्यापेक्षां मी अधिक काय सांगूं ?

मुलांनो, मग खरा मित्र कोणता तें आतां तुम्हाला समजलेंना ? ऐका, अजून त्याचीं कांहीं लक्षणें मी तुम्हाला सांगतों. एका कवीनें 'सन्मित्रलक्षणां'त म्हटलें आहे:—

**" योजी हिताप्रति निवारुनि पापकर्में ।**
**वर्णी बळेंचि गुण, झांकुनिया कुकर्में ॥ "—**

यांपैकीं पहिल्या ओळींतला अर्थ आपण वर पाहिलाच आहे. आतां दुसऱ्या ओळीच्या भावार्थाकडे आपण वळूं या ! काय म्हणतो कवी ! वाचा—

**" वर्णी बळेंचि गुण, झांकुनिया कुकर्में "—**

काय ? 'कुकर्में झांकतो ?' मग तो मित्र कशाचा ? मारे एक एक कुकर्म चव्हाट्यावर आणून ऐशी भेंवरी उडवून दिली पाहिजे कीं देखते रहेना ! काय बिशाद आहे कीं मग तो पुन्हां कुकर्म करील ! आणि म्हणे तीं 'कुकर्में झांकतो' तो खरा मित्र ! हें काय—आहे तरी काय ?

अशा प्रकारचे विचार वरील ओळ वरवर वाचणाऱ्या वाचकाच्या मनांत येण्याचा संभव आहे; पण मुलांनो, जरा लक्षपूर्वक पहा, म्हणजे कवि चुकत नसून आपणच चुकत आहों हें तुमच्या लक्षांत येईल ! कारण, कवीनें त्याच्या वरच्याच ओळींत सांगितलें आहे कीं–

**" योजी हिताप्रति निवारुनि पापकर्में "** ।

व मोरोपंतांनींही म्हटलें आहे कीं–

**" तो मित्र होय बापा ! पापाचारांत जो बुडों नेदी ॥**

अर्थात् ' पापविचाराच्या नुसत्या छाये'चेंही निवारण करून ' पुण्याची पहांट' फुटावी अशीच खऱ्या सन्मित्राची इच्छा व कृति असते. हें उघड आहे ! पण त्याचबरोबर–

**" मनुष्य हा स्खलनशील प्राणी आहे "** ही म्हण अथवा
" It is human to err " ही इंग्रजी म्हण,

किंवा–

**" चुकणें भूषण आम्हा, भूषण करणें क्षमा तुम्हा देवा "**

हें पंतांचें वचन लक्षांत घ्यावयास नको काय ? व त्यांचा शांतपणें विचार करावयास नको काय ? नाहींतर ' झांकुनिया कुकर्में ' एवढयाच शब्दाप्रमाणें ' चुकणें भूषण आम्हा ' ह्याही शब्दांनीं उसळून जाऊन " काय ? चूक करणें भूषण आहे ? कांहीं तरी बरळतां झालें ! अहो, चूक करणें लज्जास्पद आहे, असें आम्हीं आजवर ऐकत आलों ! आणि ही कुठली नवीन रीत काढलीत? बरेंच झालें मग!चुका करणें भूषण झालें व कुकर्में झांकणारे सन्मित्र होऊं लागले, तेव्हां आतां खुशाल राजरोस चुका करायला आणि पापाचा परवाना मिरवायला कांहींच हरकत उरली नाहीं ! " असा अर्थाचा अनर्थ कराल बरें ! व कुठून तुम्हा अरसिकांना मी हें काव्य सांगितलें असा बिचाऱ्या त्या कवीला पश्चात्ताप करीत बसण्याची पाळी यायची !

मुलांनो, पहा बरें, क्षणभर विचार करा, म्हणजे कवीचेंच म्हणणें

खरें आहे कीं नाहीं, तें तुमचें तुम्हांलाच समजून येईल ! मग वरवर अर्थ लावून अर्थाचा अनर्थ करण्यांत काय अर्थ आहे ? " **चुके तर पदोपदीं** " अशीच आपली स्थिति नाहीं काय ? पण, " **पण न भी, नसे घाबरा** " या उत्तरार्धानें कवी बेमुर्वत लफंगा आहे--पक्का बेरड आहे असें तुम्हीं म्हणणार काय ? अरेरे, ही अज्ञानाची व अरसिकतेची हद्द झाली, आणि असेंच करणार असाल, तर यापुढें तुम्हाला कांहीं कवींचीं सद्वचनें सांगण्याचीच मुळीं सोय राहिली नाहीं, असें म्हणून मला लेखणी खालींच ठेवावी लागेल; नाहीं का ? काय म्हणतां ? " नका, नका, लेखणी खालीं ठेवूं नका ! आम्ही चुकलों ! पुन्हां आम्ही असें करणार नाहीं ! आम्हाला एकवार क्षमा करा !" ठीक आहे; पण मुलांनो, पहा, इथेंच तुम्ही स्वतः 'चुकलांत' व मला 'क्षमा करायला' सांगितलीत. आतां ह्या ठिकाणीं मी जर तुम्हांला क्षमा केली नाहीं व पुढील ज्ञान सांगितलें नाहीं तर तुम्ही त्या ज्ञानाला मुकणार नाहीं काय ? व माझा तरी मोठेपणा त्यांत काय राहिला ? वाटेल त्या अपराधाची खऱ्या पश्चात्तापी अपराध्याला क्षमा करतां येणें, हाच खरा मोठेपणा ! कारण जगांत असा अपराधच नाहीं कीं, त्याबद्दल पश्चात्तापानें पावन झालेल्या पाप्याला क्षमा करतां येणार नाहीं ! वाटेल त्या अघोर चांडाळाला सुद्धां परमेश्वर त्याच्या पापाची क्षमा करतो म्हणूनच तो सर्वांत मोठा व सर्वाधार ह्मणून गणला जातो ! मग अशा न्यायी पण दयाळु देवाचें आपण अनुकरण करून मोठेपण मिळवायचें, का चुकूनवांकून होणाऱ्या चुकांची चवड चौकीवर मांडून पापांच्या परवडीची भेंवेरी भर चौकांत उडवायची ? अशा कृतीनें पुष्कळदां अनिष्ट म्हणजे व्हावा त्याच्या उलट परिणाम मात्र होतो, व असा प्राणी काय-मचा आपल्या हातचा गमावतो. त्यापेक्षां खाजगी उपदेशाच्या गोड शब्दानींच पुष्कळ वेळां अपूर्व काम होत असतें. कायद्याच्या कोरड्यांनीं मनुष्यजातीची सुधारणा होती, तर आज सर्व न्यायकोर्टें रिकामीं

दिसायाला पाहिजे होती ! पण मनुष्य जातीची खरी सुधारणा कायद्यानें होत नसून नीतिमत्तेच्या गोड उपदेशानें होत असते ! तेथें कायद्याच्या कोरड्यांचें काम कोरडें ( ठणठणीत ) च ठरतें ! असो. तर सांगण्याचा भाग असा कीं मानवीमनाच्या सुधारणेची अशी कथा असल्यामुळेंच कवीनें म्हटलें आहे कीं—

**" योजी हिताप्रति निवारुनि पापकर्मे ।**
**वर्णी बळेंचि गुण, झांकुनियां कुकर्मे ॥**

मुलांनो, मीं वर सांगितलेला सर्व अर्थ आतां तुमच्या लक्षांत आला ना ? कारण असें पहा, कीं मनुष्याच्या हातून, तो मनुष्य आहे तोंवर, चूक ही व्हावयाचीच ! किंबहुना, जो एकदांही चुकत नाहीं तो मनुष्यच नव्हे, असेंही म्हणतां येईल. अर्थात् चुकून होणाऱ्या चुकीवर पांघरूण घालून, आपल्या ठायीं असणाऱ्या गुणांची वाहवाच आपला मित्र चारचौघांत करीत असतो, हें किती साहजीक आहे बरें ?

मुलांनो, याप्रमाणें सन्मित्राचीं अनेक लक्षणें आहेत. पण त्यांतलीं मी वर सांगितलेली मुख्य व महत्वाचीं आहेत हें लक्षांत ठेवून अशा तऱ्हेचा ' सन्मित्र ' आपणांस लाभतो कीं काय तें पहा ! न लाभल्यास तुमच्या हृदयस्थ परमेश्वरावर अवलंबून रहा—उघड जगांतल्या भाषेंत सांगायचें तर असा सन्मित्र लाभेपर्यंत खुशाल एकटे रहा; पण असन्मित्राच्या पाशांत मात्र सांपडूं नका ! कारण त्याचा अनर्थ मीं वर वर्णन केलाच आहे ! तेव्हां अशा वरवर दिसणाऱ्या गोड भुलभुलावणीच्या पायीं आपला सर्वनाश करून घेण्यापेक्षां त्यापासून चार पावलें दूर राहिलेलें काय वाईट ? कारण जगांत ज्याप्रमाणें जाणूनबुजून दुसऱ्याचा नाश करून स्वतःचा स्वार्थ साधणारे दुष्ट असतात, त्याचप्रमाणें स्वतःचा स्वार्थ तिळमात्र साधायचा नसूनही केवळ " माझ्यासारखी कधीं होशील ? " असल्या आसुरी इच्छेनेंच दुसऱ्याला पापमार्गावर ओढ-

णाऱ्या व वाईट छंदांत पाडणाऱ्या वृत्तीचे—म्हणजेच भर्तृहरीनें म्हट-ल्याप्रमाणें—

**" जे का व्यर्थ परार्थहानि करिती ते कोण की दुर्मती ? ॥—**

अशा चौथ्या कोटीतले प्राणीही पुष्कळच वास करीत असून हे दोन प्रकारचे दुष्ट मैत्रीच्या गोड आमिषांखालीं गरीब जीवाची हकनाक नागवण करीत असतात! अर्थात् त्यांच्या ठिकाणीं जरूरीपुरतें पांडित्य व विद्वत्ताही असते! पण

**" दुर्जनः परिहर्तव्यो विद्ययालंकृतोऽपि सन्।**
**मणिना भूषित सर्पः किमसौ न भयंकरः ? ॥ "**

म्हणजे मस्तकावरील मण्यानीं शोभलेल्या सर्पाप्रमाणें विद्येनें विभूषित असा जरी दुष्ट असला तरी तो भयंकर नव्हे काय ? उलट मी तर म्हणतों कीं तो जास्तच भयंकर आहे. कारण मण्याच्या तेजा-प्रमाणें विद्येची प्रभा व भुलभुलावणी त्याजवळ असते! अर्थात् एखाद्या रानवट दुष्टापेक्षां सज्जनपणाचें व गरीब गायीचें कातडें पांघरणारे हे वाघ-हे प्रच्छन्न दुष्टच अधिक वाईट होत ह्यांत शंका नाहीं! आणि म्हणूनच वरील संस्कृत वचनाधारें त्यांचा त्यागच केला पाहिजे! असो.

मुलांनो, अशा दुष्टांचीं चरित्रें वर्णन करून सांगणारा, साधूंच्या स्वभावाचें चित्र रेखाटणारा, जगाच्या बाजारांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या चिजा तुम्हांस दाखवून कोणची वस्तू चांगली, कोणची वाईट, कोणची घ्यावी, कोणची टाकावी, ह्याबद्दल तुम्हांस अत्यंत गोड रितीनें तुमच्यापुढें उदाहरणें मांडून उपदेश करणारा, किंबहुना, त्या उदाहर-णांच्या परिणामकारकतेनेंच तीं तत्वें तुमच्या नकळत तुमच्या गळीं उतरविणारा, व इतका अमोल महत्वाचा असूनहि वाटेल तेव्हां तुम्हांस आपल्या संगतीचा लाभ देण्यास न कंटाळणारा, असा **एक अलौकिक मित्र** असून त्या मनुष्यजातीच्या मित्राचें नांव सांगून त्याचा व तुमचा परिचय करून देण्याचें मी आतां शेवटीं ठरविलें आहे!

मुलांनो, तो मित्र संगतीला कधीं कंटाळत नाहीं, तुम्ही एक वेळ कंटाळाल पण तो कधीं कंटाळत नाहीं, कंटाळणें हा शब्दच त्याला ठाऊक नसतो; ज्याप्रमाणें दमणें हा शब्द 'सायकल'ला माहीत नाहीं, तुम्ही दमाल पण सायकल दमणें शक्य नाहीं; तुम्ही त्या 'विलायती घोडी–" वर आरोहण करण्याचें ज्या क्षणीं मनांत आणाल, त्या क्षणाला ती तुम्हाला आपल्या पाठीवर घेण्यास व भरधांव पळण्यास तयार असते, त्याचप्रमाणें ह्या 'अलौकिक मित्राची'कथा आहे! कथेकऱ्यांनीं सुंदर कथा केली, पुराणिकांनीं उत्कृष्ट पुराण सांगितलें, बालगंधर्वांनीं गोड गायन केलें, व खंद्या बारगिरानें भीमथडी घोड्यावर दणकावून दौड मारली, तरी पण हीं सर्व मंडळी व हे सर्व प्राणी केव्हांना केव्हां तरी दमणारच, व त्यांना विश्रांतीची अवश्यकता भासणारच! हाडामांसाच्या पुतळ्याचा उत्साह कितीही दुर्दम्य असला, तरी दमणें व कंटाळणें हें त्यांस अगदीं साहजीक आहे; पण मुलांनो, मी सांगत आहे त्या अलौकिक मित्राची गोष्ट म्हणजे किल्ली दिलेल्या फोनोग्राफप्रमाणें, हजारों मैल उडणाऱ्या विमानाप्रमाणें, शेकडों मैल धावणाऱ्या अग्निरथाप्रमाणें आहे! त्याला दमणें किंवा कंटाळणें हें ठाऊकच नाहीं! अविश्रांत चालूं असलेल्या काळाच्या घड्याळाप्रमाणें, किंवा फिरणाऱ्या पृथ्वीप्रमाणें त्या मित्राला विश्रांतीची जरूरच भासत नाहीं!! काय, इतका अलौकिक व चमत्कारिक हा मित्र आहे? कोण बरें हा मित्र? काय, त्याचें नांव तरी काय? मुलांनो, त्याचें नांव ऐकण्यास तुम्ही फार उतावीळ झालां असाल नाहीं? तुमच्यापैकीं विशेष चाणाक्ष अशा मुलांनीं हा मित्र कोण तें ओळखलेंही असेल कदाचित्; पण तुमच्यापैकीं ज्या मुलांना तें समजणें शक्य नाहीं, त्यांच्याकरितां मी ह्या कोड्याचें उत्तर सांगत आहे. ऐका, हा '**मित्र**' दुसरा तिसरा कोणी नसून '**पुस्तक**' होय! पहा बरें! पुस्तक वाचण्यास हातीं घेतलें असतां तें कधींतरी तुम्हांस कंटाळतें काय? वाचून वाचून दमल्यावर अगर कंटाळा

आल्यावर तुम्हीच त्याला बाजूस ठेवतां ! पण पुन्हां मनांत येईल तेव्हां ते तुमच्या सेवेला–तुम्हाला ज्ञान देण्याला तयारच आहे ! हा शेवटचा मुद्दा विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे ! आपण म्हणूं त्यावेळीं व आपणांस पाहिजे तितकावेळ, व पाहिजे त्या सज्जनाची मैत्री अथवा गुणवंताची संगत करतां येणें, ह्या अडीअडचणींनीं खचलेल्या व मर्यादांनीं भरलेल्या जगांत शक्य आहे काय ? पण गानश्रवणास फोनो, व्यायामास अथवा चैनीनें फिरण्यास जशी ‘ विलायती घोडी ’ सदैव सज्ज असते; तुम्ही हुकूम करण्याचीच काय ती खोटी अथवा अवकाश ! पण तो हुकूम झाला, फोनोच्या तबकडीवर प्लेट चढवली, किल्ली दिली, व पिनचा काटेरी लगाम खेचला, कीं जसा तो फोनोचा ‘ सिंगर ’ वाटेल त्यावेळीं गाऊं लागतो, व कितीदाही ‘ वन्समोर ’ केलें तरी कंटाळत नाहीं; अथवा ‘ विलायती घोडी’च्या रिकिबीत–पॅडलवर–पाय ठेवला व तिच्या हँडलचा लगाम हाती धरला, कीं सांगू त्या दिशेला, वाटेल तितका वेळ, व आपण म्हणूं तेव्हां जशी ती सायकल धावुं लागते; व शेवटीं आपणच दमून त्या फोनोला व सायकलला ‘ विश्रांति ’ देतो–( म्हणजे, खरे म्हणजे आपण घेतों )–त्याचप्रमाणें ह्या अलौकिक ग्रंथ–सन्मित्राची गोष्ट आहे ! भूतकाळीं होऊन गेलेल्या थोर थोर सज्जनांची संगत, हे ग्रंथ नसते तर कुठून झाली असती ? हा केवढा अलभ्य लाभ आहे बरें ? त्याचप्रमाणें चालु काळांतल्या सुद्धां जगांतील महनीय व्यक्ति, मोठमोठे कवी, तत्वज्ञानी, लेखक व पंडित यांची अष्टौप्रहर संगत आपणांस त्यांच्या ग्रंथावांचून–अथवा ग्रंथरूपानें त्यांना आपणाजवळ ठेवल्यावांचून अन्य कशानें लाभणार आहे ? एकंदरींत ह्या ग्रंथाचा महिमा असा आहे ! तो सांगावा तितका थोडाच आहे ! जगांत आजवर झालेल्या व ग्रंथरूपानें अथवा ‘ कीर्तिरूपानें उरलेल्या ’ अथवा हयात असलेल्या व्यक्तींचा परिचय आपणांस दोनच मार्गांनीं होणें शक्य आहे ! व ते दोन मार्ग म्हणजे

श्रवण किंवा वाचन हेच होत! पैकीं, लिहिण्याची अथवा छापण्याची कला निघेपर्यंत केवळ श्रवणाच्या द्वारेंच कार्यभाग उरकावा लागत असे! कारण, ज्ञानप्राप्तीचा त्यावेळीं दुसरा मार्गच नव्हता! व अशी स्थिती बरेच दिवस होती. अजूनही जे अशिक्षित म्हणजे लिहावाचायला शिकलेले नाहींत, त्यांना तोच मार्ग आहे! कारण, अगदीं सुंदर हस्ताक्षरानें लिहिलेल्या अगर मोहक टाइपांत छापलेल्या मोठमोठ्या छापील पोथ्या व पुस्तकें त्यांच्यापुढें आणून ठेवलीं, तरी त्यांचा त्याना काय उपयोग आहे? सुंदर फ्रेम केलेला बिलोरी कांचेचा आरसा 'उटून' म्हणजे अगदीं स्वच्छ घासूनपुसून चकचकीत करून एखाद्या जन्मांधापुढें ठेवल्यास, त्याचा त्याला काय उपयोग? अशा अभागी जीवांच्यासाठीं श्रवणाचा दुसरा मार्ग खुला आहेच! व तशाहि स्थितींत ज्ञानप्राप्तीची शिकस्त करून ती शिगेस नेऊन भिडविणारा जीव, आपल्या वाक्पांडित्यानें मोठमोठ्या पंडितांच्याही तोंडांत मारण्याच्या लायकीचा कसा होतो, ह्याचें अगदीं ताजे व मूर्तिमंत उदाहरण म्हणजे नुकतेंच बंगाल्यांत होऊन गेलेलें '**रामकृष्ण परमहंस**' ह्यांचें होय! पण इतकी आस्था व तळमळ सामान्य जीवांच्याठायीं असणें शक्यच नाहीं, व म्हणूनच ते अशिक्षित आहेत तोंवर अभागीच म्हटलें पाहिजेत! बरें, त्यांतूनही त्यांनीं ज्ञानप्राप्तीचा यत्न करावयाचे मनांत आणल्यास, दुसरी अडचण 'श्रवणा'चें कामीं येणाऱ्या अनेक अडथळ्यांची! त्यांत सर्वांत मोठा अडथळा ह्मणजे एकवेळ जीवाची आटाआटी करून जगांतील जिवंत थोरांची संगत क्षणैक मिळविली असें धरलें तरी, भूतकाळांत विलीन झालेल्या थोर महात्म्यांचा, कवींचा, व तत्त्ववेत्त्यांचा प्रत्यक्षवत् परिचय पुस्तकांवाचून अन्य कशानें होणार? त्यांच्या कीर्तिश्रवणानें व चरित्र ऐकून हें कार्य कांहींसें भागेल; पण त्यांच्या उपदेशाचा ठसा प्रत्यक्ष त्यांचे ग्रंथ वारंवार वाचून जितका मनावर उमटेल तितका दुसऱ्या कशानेंच उमटणार नाहीं! असो, तर एकंदरींत सांगण्याचा भाग असा

कीं अनेक अडचणींनीं मर्यादित झालेला व कांहीं कांहीं बाबतींत तर खऱ्या ज्ञानप्राप्तीस मुकणारा असाच हा 'श्रवणा'चा दुय्यम दर्जाचा मार्ग आहे! व ज्यांना दुसरा मार्गच नाहीं,त्यांनीं त्याचाच अवलंब करावा! पण त्यांत खऱ्याखोट्याचा निर्णय लागण्याची मोठी अडचण असून, स्वार्थ-साधू लोक ' अमक्या ग्रंथांत अमुक आहे, ' ' व अमक्यानें असें असें सांगितलें आहे ' अशा वाटेल तशा थापा देत असल्यामुळें, खऱ्या तत्वांची पायमल्ली व हजारों जीवांचें नाहक नुकसान होऊन त्यांच्या जीवावर त्या बोकेसंन्याशांना मात्र यथेच्छ चरायला सांपडतें ! पण अशा तऱ्हेचे अनर्थ प्रत्यक्ष पुस्तक वाचण्यांत सहसा होत नाहींत ! डोळे आणि कान यांतील ' चार बोटांचे अंतर ' येथें दूर होते ! किंबहुना, लिहा-वाचायला शिकलेल्या व विद्यामंदिरांत पाऊल घातलेल्या मानवाच्या बुद्धीला विद्यार्जनाची तिखट धार लागत असल्यामुळें, तो खोट्याचा तुकडा ताबडतोब पाडण्यास तयार होतो ! ' **मार्टिनल्यूथर** ' नामक जर्मन पंडितानें असाच तुकडा पाडून पूर्वींच्या रोमनकॅथोलिक बक्कांची चमन बंद पाडली, व बायबलांतील खरीं तत्वें प्रगट करून सर्व युरोपखंड हलवून सोडलें ! असो. खऱ्या वाचनाच्या ज्ञानाचा प्रभाव हा असा आहे ! मनुष्याची उन्नति होण्यास त्याला अत्यंत अवश्य असणारी जी सन्मैत्री, ती येथें त्यास भरपूर व वाटेल तेव्हां लाभणार आहे ! मग मुलांनो, सांगा बरें ' सद्ग्रंथ ' हा केवढा थोर मित्र आहे ? रावणा-सारख्या दुष्टांचा शेवट कसा झाला, द्यूताच्या पायीं नळ, धर्मराज, यांची कशी स्थिती झाली, दारूच्या पायीं शुक्राचार्य, संभाजी, यांची कशी प्राणांतिक अवस्था झाली, इत्यादि उपदेशाच्या गोष्टी तुम्हांला कोण सांगतें ? स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, व स्वसमाज, यांचा अभिमान धरून पृथ्वीराज चव्हाण, राणा प्रतापसिंह, शिवाजी, बाजी, व त्यांची प्रभावळ, ज्ञानेश्वरादि साधुसंत, रामदास तुकारामादि लोकोद्धारक लोक-सेवक, व विष्णुशास्त्र्यांपासून सुरू झालेली टिळक–आगरकर–रानडे–

गोखले, इत्यादि चालू शतकांतील पूज्य व महनीय महात्म्यांची नाममालिका व त्यांचीं चरित्रें तुम्हाला सांगून, तुमच्यामध्यें स्वदेशभक्तीचें, स्वधर्मलालसेचें, व स्वसमाजसेवेचें बीज कोण बरें रुजवितें ? त्याचप्रमाणें जयचंद, सूर्याजी पिसाळ, इत्यादि स्वार्थी फितुरांच्या भुतांनीं देशाला, धर्माला, व समाजाला कशी आग लावली त्याचीं हृदयभेदक दृश्यें तुमच्यापुढें मांडून, त्यांचेविषयीं तिरस्काराची भावना तुमच्या हृदयांत कोण बरें दृढ करतें ? सत्संगाचें फळ चांगलें, व कुसंगाचे वाईट, इत्यादि नीतितत्वें तुमच्या मनावर कोण बरें ठसवितें ? व इतकीं सर्व कामें निरलसपणें बजावण्यास न दमतां, न श्रमता, सदा सर्वकाळ कोण बरें तयार असतें ? मुलांनो, विचारा आपल्या मनाला म्हणजे ' सद्‌ग्रंथ ' असें एकच उत्तर त्याचें तुम्हांला मिळेल ! फार काय सांगूं मुलांनो, पण एकवेळ तुमच्या जिवाचा दिलजान दोस्त व हृदयाचा कलिजा असा तुमचा अगदीं ' जिवश्च कंठश्च ' मित्रसुद्धां मनुष्यस्वभावानुसार एकवेळ तुम्हांस कंटाळेल, पण हा 'मित्र ' मात्र असा आहे कीं, प्रत्यक्ष हाडामांसाच्या मित्राहून ह्याची महती ज्यास्त असूनही हा तुम्हांस कधींही सोडून जाणार नाहीं ! तुम्हीं सुखांत असा, दुःखांत असा, गरिबींत असा, श्रीमंतींत असा, राजवाड्यांत रहा अगर झोंपडींतील झोंप्यावर झोंके घेत पडा—हा तुमचा जिवाभावाचा कलिजा तुम्हांला कधींही विसरणार नाहीं ! तुमच्या विपत्तीच्या वेळीं ( विपत्काळीं ) तुम्हांला धीराचे चार शब्द सांगून तुमची गेलेली उमेद परत आणणारा, दुःखाचे वेळीं जगाच्या रहाटीचीं चित्रें तुमच्या डोळ्यापुढें मांडून तुमचें गोड सांत्वन करणारा, ह्या पुस्तकासारखा मित्र तुम्हांस दुसरा मिळणार नाहीं ! अशा थोर ग्रंथाचें, म्हणजेच त्या रूपानें बोलणाऱ्या महनीय महात्म्यांचें बोल ऐकून कोणाचें बरें चित्त गहिंवरणार नाहीं ? व कोणाच्या बरें डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु उभे राहणार नाहींत ? अशाच कृतज्ञ भावाचे बोल, व वर सांगितलेल्या महात्म्यांचे उपकार व त्याविषयीं आदर ज्यांत

भरला आहे अशी ' साउदे ' नामक एका विख्यात आंग्ल कवीची प्रसिद्ध कविता " The Scholar " ह्या नांवाची आहे, ती तुमच्यांतील ज्या मुलांना समजण्याचें सामर्थ्य असेल त्यांच्यासाठीं जशीच्या तशी. खालीं देत आहे. ' साउदे ' म्हणतो:--

My days among the Dead are past;
Around me I behold,
Where'r these casual eyes are cast,
The mighty minds of old:
My never-failing friends are they,
With whom I converse day by day,
With them I take delight in weal
And seek relief in owe;
And while I understand and feel
How-much to them I owe,
My cheeks have often been bedew'd
With tears of thoughtful gratitude.
My thoughts are with the Dead; with them
I live in long-past years,
Their virtues love, their faults condemn,
Partake their hopes and fears,
And from their lessons seek and find
Instruction with an humble mind.
My hopes are with the Dead; anon
My place with them will be,
And I with them shall travel on
Through all futurity;
Yet leaving here a name, I trust,
That will not perish in the dust.

मुलांनो, फार काय सांगूं ? पण ह्या सद्ग्रंथरूपसन्मित्रांची गोडी तुम्हांला एकदां लागली कीं, " मी मेल्यावर मला माझ्या पुस्तकालयाच्या ( लायब्ररीच्या ) खालींच पुरा ! " अशा तऱ्हेच्या एका पंडिताच्या मागणीप्रमाणें "**लाचावलें मन लागलीसे गोडी। हें जीवें भावें न सोडी ऐसें झालें ॥**" अशीच तुमची स्थिती होईल ! यासाठीं वाचा व विद्वान व्हा, विद्वानांची संगत धरून विद्वान व्हा, हेंच माझें तुम्हांला सांगणें आहे. कारण संगतीचा परिणाम फार आहे व म्हणूनच तिचें महत्त्वही फार मोठें आहे हें विसरून चालणार नाहीं ! कारण जशी ज्याची संगत तसा त्याचा स्वभाव व तसा तो मनुष्य हें तर ठरलेलेंच आहे, अगदीं उघड आहे ! किंबहुना, मनुष्याची पारख त्याच्या मित्रावरून–संगती-वरून करण्याची थोरांची रीत आहे. " Tell me his friends & I shall tell you what kind of man he is " अशा तऱ्हेचें जें एका प्रसिद्ध लेखकाचें वचन आहे, त्याचा तरी अर्थ हाच आहे ! '**संगती संगदोषेण** ' ह्या किंवा ' **वाण नाहीं पण गुण लागला** ' ह्या वचनांतही हाच अर्थ येतो. अर्थात् आयुष्याचें चित्र रेखाटण्यांत आपले आईबाप व आपले गुरु जसें कारण आहेत, तसाच आपल्या मित्रांचा वांटाही त्यांत फार मोठा आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण " **जैशी ज्या संगती तैशी त्यास गती** " हें तर ठरलेलेंच आहे ! मनुष्याचा स्वभाव झाला तरी तो पुष्कळसा पाण्यासारखाच असतो ! ज्या संगतीच्या रंगांत त्याला तुम्ही घालाल त्या रंगानें तो रंगत असतो ! अर्थात् ही गोष्ट लक्षांत घेऊन मुलांनो, लहानपणापासून तुम्हांला चांगल्या संगतीचेंच वळण लागावयास नको काय ? यासंबधीं मी तुम्हांला **एक गोष्ट** सांगतों ऐका ! एका गृहस्थाजवळ दोन राघु होते, त्यांतल्या एकाचा पिंजरा त्यानें एका पंडिताच्या येथें नेऊन ठेवला व दुसरा एका भांडकुदळ व शिव्यागाळी करणाराच्या येथें नेऊन टांगला ! कांहीं दिवसांनीं त्यांनीं दोन्ही घरीं जाऊन पाहिलें तों काय चमत्कार ! पंडिताच्या येथील पोपट मार

पांडित्याच्या गोष्टी सांगत आहे व त्या भांडकुदळ इसमाच्या घरांतील राघु सारख्या शिव्या हसडतो आहे, असा चमत्कार त्याच्या दृष्टीस पडला व हातोहातींचा हा दाखला पाहून बापडा थक्कच झाला व संगतीच्या परिणामाचें चित्र त्याच्या चित्तावर चांगलेंच ठसलें ! मुलांनो, तुम्हीही मानवी पोपटच आहांत व पोपटासारखीच तुमची सारखी पोपटपंची सुरू असते ! यासाठीं तुमच्या देहाचा पिंजरा जर चांगल्या आईबापांच्या, चांगल्या गुरूच्या, व शेवटीं चांगल्या मित्रांच्या संगतींत झुलत असेल तर तुमच्याही मुखांतून चांगलेच बोल उमटतील ! नाहीं तर त्याची आशाच नको **नामदेव** नामक प्रसिद्ध साधू तारुण्यांत असतांना चोरांच्या संगतींत दरोडेखोर बनला होता, ही गोष्ट तुम्हांला खरी सुद्धां वाटणार नाहीं. पण त्यांनींच ती खुद्द आपणांस आपल्या आत्मचरित्रपर अभंगांतून सांगितली आहे ! त्यावरूनही संगतीचा परिणाम स्वभावावर किती होतो हीच गोष्ट उघड होते. मुलांनो, तुमच्या मित्रांतही कोणी खोटे बोलणारे, कोणी भांडकुदळ, कोणी शिव्यागाळी करणारे, कोणी गलिच्छ राहणारे, अशीं नाना तऱ्हेचीं मुलें असतील ! पण या सर्वांची संगत जर तुम्ही वेळींच सोडली नाहीं, तर तुम्हींही त्यांच्याप्रमाणेंच लवकरच बनल्यावांचून राहणार नाहीं हें लक्षांत ठेवा. कारण तुमचा स्वभाव अत्यंत अनुकरणप्रिय आहे व म्हणूनच तुम्ही ज्यांचें अनुकरण करणार तीं मुलेंही चांगल्या स्वभावाचीं फुलेंच असलीं पाहिजेत !

अशा तऱ्हेची चांगली संगत तुम्हांला लागली तर तुमच्या ठिकाणचे दोष सुद्धां नाहींसे होऊन चांगल्या गुणांनीं तुम्हीं शोभूं लागाल ! व तीच जर तुम्हांला वाईट संगत असली तर तुमच्या चांगल्या गुणांची माती होण्यास वेळ लागणार नाहीं ! एका कवीनें हीच गोष्ट दाखल्यासह फार सुंदररीतीनें पटवून दिली आहे. तो म्हणतोः--

**" भल्याच्या संगानें अवगुण असे तो गुण दिसे ।**

**खलाच्या संगानें सुगुण तरी तो लोपत असे ॥**
**जसें खारें पाणी पिउनि घन तें गोड करिती ।**
**फणी दुग्धातेंही पिउनि गरळा तेंचि वमिती ॥ १ ॥ "**

एकंदरींत संगतीप्रमाणें मनुष्याला उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा अवस्था प्राप्त होतात ही गोष्ट दुसऱ्याही एका कवीनें अशींच बहारदार उदाहरणें घेऊन विशद केली आहे व तीही वाचनीय आहे. तो म्हणतो:--

**" तोयाचें परि नांवही न उरतें संतप्त लोहांतरीं ।**
**तें भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचें परी ॥**
**तें स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोत्यें घडे नेटकें ।**
**जाणा उत्तम मध्यमाधमदशा संसर्गयोगें टिकें ॥ १ ॥ "**

मुलांनो, वरील दोन्हींही श्लोकांचा अर्थ सोपा असल्यामुळें मी तो तुम्हांला आतां सांगत बसत नाहीं! शेवटीं तुम्हांला माझें सांगणें हेंच आहे कीं, अशा तऱ्हेचा 'भला सन्मित्र' म्हणजे एक 'सद्ग्रंथच' होय व अशा सन्मित्रांची-अशा सद्ग्रंथांची संगत तुम्ही कधींही सोडूं नका, म्हणजे तुम्ही जगांत धन्य धन्य व्हाल ! कारण सद्ग्रंथांची संगत म्हणजे ती प्रत्यक्ष साधूंची संगतच होय! व साधूंची संगत काय बरें करीत नाहीं? दुष्टाचा सुष्ट, दुर्जनाचा सज्जन, दुःशिलाचा सुशील बनविण्याचें सामर्थ्य ह्या सत्संगतींतच आहे! तुमच्या दुष्ट हातांच्या स्पर्शानें ते बाटत नाहींत अगर भ्रष्ट होत नाहींत, तर ते तुम्हांसच पावन करतात ! लोखंडाचा स्पर्श परिसाला झाला तर त्याचें सोनेंच होतें ! परीस कांहीं लोखंड बनत नाहीं ! तसेंच येथें आहे. हीच गोष्ट दिंडीवृत्ताच्या गोड गळ्यावर एक कवी आपणांस खालीलप्रमाणें सांगत आहे, ती तितक्याच मधुरतेनें वाचनीय आहे ! यासाठीं ऐका ! तो म्हणतो--

**" खळा येतें साधुत्व साधुसंगें ।**
**दुष्टसंगें साधुत्व तिळ न भंगे ॥**

**पुष्पसंगें मातीस वास लागे ।**
**मृत्तिकेचा गुण तिळ न त्यांत वागे ॥ १ ॥ "**

अहाहा ! सज्जनांच्या संगतीच्या महात्म्याचें किती हें मधुर संगीत ! तें ऐकून ज्याची मान आनंदानें डोलणार नाहीं तो ' पशु किंवा मुक्त ' च म्हटला पाहिजे ! असो. तर मुलांनो, अशा सज्जनांच्या व सन्मित्रांच्या साक्षात् संगतीचा लाभ तुह्मांला झाला, तर तो तुह्मी अवश्य घ्याच; कारण कृत्रिमसाधनांनीं प्रत्यक्षाची कितीही भरपाई करण्याचा यत्न केला तरी कत्रिम तें कृत्रिमच ! त्याला जिवंत चैतन्याची सरः थोडीच येणार आहे ! त्या जिवंत चैतन्याच्या स्फूर्तीची ऊब त्यांत असणें शक्यच नाहीं ! ताज्या स्वयंपाकांतील ऊन ऊन अन्न खाण्यांतील गोडी तें निवल्यावर कोठून येणार ? त्याचप्रमाणें सज्जनांच्या जिवंत वाणीचे बोल साक्षात् त्यांच्या तोंडून ऐकण्यास सांपडलें, तर ती किती भाग्याची गोष्ट होईल बरें ? फोनोग्राफमधून बालगंधर्वांचीं गाणीं कितीही ऐकलीं तरी ती ' दुधाची तहान ताकावर ' ह्या न्यायानेंच होत ! कारण तसें नसतें तर, आज घरोघर त्यांच्या गाण्याच्या प्लेटी फोनोच्या तबकडीवर फिरत असतां खुद्द त्यांच्या कंठांतलें गोड गायन ऐकण्यास गानलुब्ध श्रोत्यांच्या इतक्या झुंडीच्याझुंडी ' किर्लोस्कर ' थिएटराकडे कां लोटल्या? लोटल्याच नसत्या ! अर्थात् प्रत्यक्षाची सर कृत्रिमानें भरून निघत नाहीं, हीच गोष्ट येथें सिद्ध होतें. पण या ठिकाणीं असा विचार करायचा अथवा करावाच लागतो, कीं हें प्रत्यक्ष किती दिवस टिकणारें आहे ? श्री. ' नारायणराव राजहंस ' आज आपल्या मधुर आलापानें जनताजनार्दनाला झुलवित–खुलवित–व डोलवीत आहेत. पण त्यांचीसुद्धां ऐन तारुण्याची उमेद आतां पहिल्या इतकी राहिली नाहीं हें आपण प्रत्यक्ष पाहतोंच, आणि उद्यां जर दुर्दैवानें रंगदेवतेला ' राजहंस माझा निजला ' हें शोकगीत गाण्याचा प्रसंग आला ( ईश्वर करो आणि बालगंधर्वांना उदंड आयुष्य असो ! )–तर त्यांचें तें मधुर गीत

त्यांच्या बरोबरच लुप्त होणार ना ? ती गोड गळ्याची उबदार रागदारी काळाच्या अनंत उदरांत विलीन होणार ना ? 'भाऊडया' 'केशव' असेच गेले ना ? 'गणपतराव जोशी' आज कुठें आहेत ? मुलांनो, ह्या मृत्युलोकची स्थितीच अशी आहे ! काळाच्या कठिण कडाक्यांत व 'यमाच्या अजब तडाक्यांत' बुद्धिच्या 'बळवंतां'चें व गुणाच्या गुणवंतांचें देह कडाकड मोडून पडत आहेत ! "**गेले बहुत वैभवाचें। गेले बहुत पुरुषार्थांचे। गेले अगाध महिमेचे। मृत्युपंथें॥**" असाच देखावा आपणांस सारखा दृष्टीस पडतो ! मुलांनो, रामकृष्णादि देवावतार, व्यासवाल्मीकादि ऋषि, धर्मभीमादि पांडव, सीता, सावित्री, पांचाली आदि पतिव्रता, रजपूत वीरांचें तें वैभव, शिवाजीबाजींच्या त्या पराक्रमी मूर्ति, ज्ञानेश्वरादि साधुसंतांचे ते विलोभनीय दर्शन, आज कुठें आहे ? ते पुन्हा केव्हां तरी मिळणें शक्य आहे काय ? आजवर जगांत झालेले चंद्रसूर्यांचे उदयास्त, विविध वनश्रीचे विलास, नाना सुखदुःखांचे देखावे, उत्तुंग राजवाडयांतील व गरीबांच्या झोंपडीतील मनाला समरस करणाऱ्या घटना, आज कुठें आहेत ? पण ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्षवत् तुमच्या मनश्चक्षूपुढें उभें करून त्या त्या भावनांशीं तुह्मांला तद्रूप करण्याचें व त्यांच्या तरंगावर तुम्हांस सुखदपणें पोहविण्याचें सामर्थ्य असणारा व त्यारूपानें तुमच्या मनाला उदात्त शिकवण देणारा अजब जादुगार ह्मणजे 'ग्रंथ' होय ! भूतकाळांतील दृश्यें डोळ्यांपुढें नाचवून त्यांतील जीवांना पुन्हां जिवंत करून, त्यांच्या हालचालींच्या रूपानें उपदेश करणारा, आपला चिरंतनचा सखा ह्मणजे एक ग्रंथ-सन्मित्रच होय !

" When I remember all
The friends so linked to-gether
I have seen around me fall
Like leaves in wintry weather "

ह्या कविवचनाप्रमाणें मृत्यूच्या थंडीच्या कडाक्यांत जीर्ण व शीर्ण-

पर्णाप्रमाणें आपले मानवीदेहधारी मित्रसुद्धां ज्यावेळीं आपणाभोंवतीं पटापट गळून पडतांना आपण पाहतों, त्यावेळींसुद्धां आपणांस शेवटचा धीराचा शब्द सांगणारा आपला सन्मित्र म्हणजे हा ग्रंथच होय! त्याचे ठिकाणीं जिवंत चैतन्याची ऊब, व ताज्या तयार झालेल्या ऊन ऊन अन्नाची रुचि नसेल. पण त्याला काय उपाय? त्या गोष्टीनें खंत खाऊन, व काळावर रुसून बसून कसें चालेल? खुद्द आपणालाही तो एक दिवस असाच उचलून नेणार आहे, तेथें मग इतरांचा प्रश्न काय राहिला? तेव्हां मुलांनो, आहे ह्या विधिघटनेच्या खडतरतेला तोंड देऊनच आपणांस चालले पाहिजे! व अशा स्थितीतलें आपलें कर्तव्य काय बरें ठरतें? "**मरावें परी कीर्तिरूपें उरावें**" ह्या समर्थांच्या वचनाप्रमाणें आजवर जे मृत्यूच्या मुखांत पडतां पडतां त्यालाही कणखर लाथ मारून '**कीर्ति रूपानें पावन**' झालें व यावच्चंद्रदिवाकरौ आपल्या नांवाचा झेंडा तिन्ही लोकांत फडकत राहील असें थोर चरित्र ज्यांनीं नेलें, त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आपणही कीर्तिमान होऊन जाणें, हेंच आपलें जगांत एकच एक कर्तव्य ठरत नाहीं काय? पण हें कशानें साध्य होतें? तर त्यांच्या–थोर विभूतींच्या–चरित्रश्रवणानें अगर वाचनानें! कारण, त्या श्रवणाचा अगर वाचनाचा महिमाच तसा आहे:—

> "Lives of great men all remind us
> We can make our lives sublime"

हाच उपदेश त्यांचीं पुण्यपावन चरित्रें आपणांस करीत असतात! पण तीं चरित्रें चिरंतन सांगणारा आपला सखा म्हणजे 'काळाचे भातुकें' असणारा हाडामांसाचा मानव नसून, त्याच्या शतपट व सहस्त्रपट आयुष्य असणारे इतिहासग्रंथ, शिलालेख, जयस्तंभ, समाधी, व ते ते प्रदेश होत! त्यांतल्या त्यांत सहजसुलभ असा सन्मित्र म्हणजे एक "सद्ग्रंथच" होय हें मुलांनो आतां तुमच्या मनावर चांगलें ठसलें ना? यासाठीं त्या सद्ग्रंथाला सदैव कवटाळा, त्याला कधींही कंटाळूं नका, व त्याच्याशींच

नेहमीं हितगुज करीत जा, म्हणजे तुमचीं सर्व दुःखें हरतील व तुम्हीं कायमचें सुखी व्हाल !

—--×—-—

# गांव शहर व देश.

## गांव

मुलांनो, मी तुम्हांला प्रथम तुमच्या आई जवळ घेऊन गेलों, नंतर तेथून जरा दूर म्हणजे माडीवर तुमच्या वडिलांच्याकडे तुम्हांस नेलें; त्यानंतर तुमच्या आसपास खेळणाऱ्या तुमच्या बहिणभावंडांशीं तुम्ही कसें वागावें, तें तुम्हांस सांगितलें; नंतर तुमच्या घराच्या चार भिंतींच्या आवारांत असणाऱ्या अथवा प्रसंगोपात्त येणाऱ्या इतर आप्तेष्ट व नोकर-चाकरासंबंधीं व पाहुण्यारावळ्याबद्दल तुमच्याशीं चार शब्द बोललों; पुढें तुम्हांस तुमच्या गुरुच्या पुढयांत नेऊन ठेविलें; त्यानंतर त्याहीपेक्षां क्षेत्रमर्यादा वाढवून तुमच्या लंगोटीयारांशीं तुमची गांठ घालून दिली; आणि आतां त्याहूनही तुमच्या ज्ञानाची, स्वभावाची, भावनांची, व आपलेपणाच्या अभिमानाची, मर्यादा अधिकच विस्तृत करण्यासाठीं तुम्हांस मी प्रथम तुमच्या गांवच्या चतुःसीमेंत फेरफटका करण्यास नेणार असून, नंतर तुम्हांस तुमच्या सर्व देशांत घेऊन जाणार आहे ! याप्रमाणें आपल्या ज्ञानाचें, भावनांचें, व अभिमानाचें क्षेत्र विस्तृत होता होता देशाच्या सरहद्दीपर्यंत जाऊन भिडलें पाहिजे, व तेथेंच तें स्थिर होऊन त्या अभिमानानें, त्या ज्ञानानें, व त्या भावनांनीं आपलें प्रत्येक पाऊल पडलें पाहिजे, तरच आपण जन्माला आल्याचें सार्थक ! चला तर, आपण प्रथम तुमच्या गांवांतून फेरफटका करूं या !

अगदीं प्रथम आपण तुमच्या गांवच्या हद्दीवर जाऊन उभें राहूं व त्याच्या चतुःसीमा अवलोकन करूं. अर्थात् मुलांनो, तुमचे गांव निर-निराळें असणार व आहेत ह्याची मला जाणीव आहे. पण कोणचाही गांव घेतल्यास सामान्यतः आपल्या ह्या निसर्गदेवीनें कृपाप्रसादाचें वरदान

दिलेल्या देशांत त्या गांवच्या चतुःसीमेवर कांहींना कांहींतरी रम्य देखावा दृष्टीस पडलांच पाहिजे व तो तसा पडतोही ! तेव्हां त्याची सामान्य रूपरेखा आपण आखूं या ! तो पहा एक ओढा तुमच्या गांवाजवळून झुळझुळ वाहत आहे, हे इकडे आंबराईचें बन आपल्या सुवासिक फळांनीं फुलून राहिलें आहे; ती तिकडे एक लहानशीच टेकडी असून त्यावर एक महादेवाचें रम्य देऊळ आहे; व ही पहा एका बाजूनें एक सडक दुसऱ्या गांवास जात आहे ! चारी दिशांना आकाशाचा निळा वर्ण शोभून राहिला आहे; त्या आकाशाच्या उदरांतून अत्यंत शुद्ध शीतल अशा वायूच्या लहरी वाहत आहेत; निरनिराळ्या पक्ष्यांचे थवे आकाशातून स्वेच्छ उडत आहेत, व त्यांचा किलबिल शब्द मोठा श्रुतिमनोहर संगीताप्रमाणें भासत आहे; ते पहा गायीम्हशींचे कळप घेऊन गुराख्यांचीं पोरें त्याना रानांत चारीत आहेत, व आपणही स्वेच्छ क्रीडा करीत आहेत; ही पहा ह्या सडकेनें प्रवाशांची बैलगाडी चालली आहे; ती पहा तिकडे हिरव्या, पिवळ्या धान्यांनीं शोभलेलीं शेतें दिसत आहेत-व त्यांत जिवाभावानीं काम करणारे ते पाहिलेत का थोर अंतःकरणाचे शेतकरी व त्यांची बायकामुलें ? मुलांनो, तुम्हीं म्हणाल कीं; हें सर्व खेडेगांवच्या सरहद्दीचें वर्णन झालें ! पण एखाद्या शहराच्या चतुःसीमेचा चित्रपट आमच्या डोळ्यांपुढें रेखाटाल किं नाहीं ? कारण आमच्यांतील कांहीं मुलें शहरवासीही आहेत ! तर मुलांनो, माझ्याही मनांतून खेडें व शहर असेंच वेगवेगळें वर्णन करावयाचें आहे ! तेव्हां तुमची ही सूचना मला पूर्णपणें मान्य आहे ! ऐका तर आतां शहराच्या सरहद्दीचें वर्णन ! ही पहा एका बाजूनें 'भप्भप् ' करीत आगगाडी जात आहे; ती पहा दुसऱ्या बाजूला पर्वतांची रांगच रांग दिसत आहे; ही इकडे एक नदी संथपणें वाहत आहे; तो पहा गुरांचा कळप गुराखी परत घरीं नेत आहेत; हे पहा इकडे शुद्ध हवेचे शोकीन् लोक कोणी पायीं तर कोणी गाड्याघोड्यांतून फिरावयास जात आहेत; क्वचित्

कांहीं सायकलीही दृष्टीस पडत असून एखादी मोटारही भरकन् पों पों करीत तुमच्या पुढून धूळ उधळीत जात आहे; जणूं काय, आंत बसलेला मालक आपल्या पैशाची व देशाची कशी धुळधाण उडवीत आहे हेंच ती दाखवीत आहे ! असो ! मुलांनो, यांतील कोणच्याही भागाचें-खेड्याचे अगर शहरचे-कोणच्याही ठिकाणचें तुम्ही रहिवासी असा; त्या त्या जन्मभूमीचा अभिमान धरून, तेथील दोष नाहींसे करण्यासाठीं त्यांचें नीट निरीक्षण करा व "With all thy faults I love thee still" ह्या वचनाप्रमाणें आपापल्या गांवच्या अभिमानानें त्याच्या उन्नतिसाठीं झटण्याचा आंतापासून निश्चय करा. तुमच्या गांवांतील चांगल्या गोष्टींचें वर्णन मी प्रसंगोपात्त करीनच; पण प्रथम मला तुमच्या गांवीं कोणकोणत्या गोष्टींच्या उणीवा आहेत व कोणकोणचे दोष-देश, धर्म, नीति, द्रव्य, विघातक दोष-शिरले आहेत ते आधीं दाखविलें पाहिजे ! त्याविषयीं तीव्र तिरस्कार व तिटकारा तर तुमच्या मनाला वाटलाच पाहिजे पण ते दोष नाहींसे कसे होतील व त्या उणीवा भरून कशा निघतील याविषयींची तळमळ तुमच्या चित्ताला सारखी लागून राहून व्यक्तिदृष्ट्या आपण स्वतः तरी त्यापासून दूर व अलिप्त राहूं अशी तुम्हीं आंतापासूनच शपथ घेतली पाहिजे व ती वरील तळमळीच्या जोरावर शेवटास नेली पाहिजे पार-पाडली पाहिजे ! किंबहुना, त्या तळमळीचा जोरच मुख्य आहे ! तो असला म्हणजे बाकीच्या गोष्टी सहज होतात, तर चला आपण पुन्हा खेडेगांवाकडे भरकन् उडून जाऊन त्याच्या चतुःसीमेवरील वैभव-तें सूर्याचें अस्ताला जाणारें बिंब, तो झुळझुळणारा नदीचा प्रवाह, त्या गुराख्यांच्या गोड गायनाचे व पाव्याचे सूर, ते घरट्याकडे धावणारे चित्रविचित्र पक्षी इ०-क्षणैक अवलोकन करून आपण ह्या खेडेगांवात पाऊल घालूं या !

हें पहा शेतकरी लोक आनंदानें कामधाम करून आपापल्या घरीं चालले आहेत. खरोखर एका आंग्लकवीनें म्हटल्याप्रमाणें, ज्यांच्या

प्रामाणिक काबाडकष्टाचा व नैसर्गिक सुखाच्या जीवनाचा मोठमोठ्या अमीरउमरावांनीही हेवा करावा असेंच शेतकऱ्यांचे सुखद जीवन असतें ! पण त्या स्वर्गीय जीवनावर बोळा फिरविणाऱ्या कितीतरी गोष्टी चालू काळांत आपणांस दिसत आहेत व त्यांच्या पाशांत आपले शेतकरी कधीं आपण होऊन, तर कधीं निरुपाय म्हणून, कधीं सुखानें तर कधीं वैतागानें, अडकत आहेत ! किती ही भीषण स्थिती ! ते पहा, उदाहरणार्थ, तो पाहिलात कां दारूचा गुत्ता ! शेतकऱ्यांच्या सोन्यासारख्या संसाराची धुळधाण उडविणारी ही राक्षसी बाटलाबाई ह्या खेडेगांवातून सुद्धां घर करून राहिली आहे ! व दारू पिणें हें महापाप आहे हें माहीत असूनही विश्रांतीच्या खोट्या समजुतीनें आपणांस आर्य म्हणवून घेणारा हा हिंदू शेतकऱ्यांचा समाज त्या मादरादेवीच्या भुलभुलावणीला हातोहात बळी पडत आहे ! अरेरे ! कोण ही शोचनीय स्थिती ! ते पहा तिकडे न्यायाचें कोर्ट ! व तीं पहा त्या कोर्टांत अहमहमिकेनें भांडणारी शेतकऱ्यांची जिवंत मढी ! " शहाण्यानें कोर्टाची पायरी चढूं नये " हें तत्त्व त्यांचे बापजादे त्यांना सांगत आलें असूनही कज्जाच्या कैफानें बेहोष झालेला शेतकरी आज आपलें घरदार विकून व कर्जबाम करून सुद्धां वकिलाची व न्यायकोर्टाची धन करीत आहे ! व आर्यांचे वंशज म्हणून छाती ठोकून सांगणारा व पंढरीची वारी कधींही न चुकवतां गळ्यांत तुळशीची माळ घालणारा हा शेतकरी दीडदमडीच्या जमिनीच्या तुकड्यासाठीं बेधडक खोट्या शपथा घेत आहे ! अरेरे ! एकंदरींत, द्रव्याची, अब्रूची, व नीतिची हानि करणारें, त्यांचा चक्काचूर उडविणारे असेंच हे दारूप्रमाणें घातक व्यसनां आजच्या शेतकरी समाजाला व खेडेगांवच्या इतर लोकांना जडलें आहे म्हणावयाचें ! खरोखर केवढे हें दुर्भाग्य ! त्यानंतर हें पहा अजून एक चित्र ! हा पठाणी सोटा ह्या शेतकऱ्याच्या दाराशीं कां बरें दिसत आहे ? आणि त्या पलीकडच्या शेतकऱ्याच्या घरांत कोण संभावित

चोर दिवसाढवळ्या शिरला आहे बरें ! व बाहेर जप्तीचा पोलीसही पण उभा आहे ! अरेरे, हतभाग्यांनीं कर्जबाम चांगलेंच केलेलें दिसत आहे ! त्यांतून त्यांचें अज्ञान व अशिक्षीतपणा ! कर्जाचा व व्याजाचा हिशेब करण्याची पठाणी व सावकारी और तऱ्हा माहित असूनही त्यांच्या पाशांत अडकणाऱ्या ह्या मूर्खांना काय म्हणावें बरें ? ' ऋण काढून सण करूं नये' ही वाडवडिलांची म्हण माहित असूनही केवळ मेघराजाच्या भावी कृपेवर व सुगीच्या दिवसावर हवाला ठेवून क्षुल्लक कारणास्तव कर्ज काढणारा इसम, हातचे सोडून पळत्याच्या पाठीस लागणाऱ्या महामूर्खाच्या कोटींतलाच म्हटला पाहिजे ! पण ह्या ' सावकारी पाशाची' मोहनीच तशी जबरदस्त आहे ! व त्या सावकारांच्या गोडबोल्या व मिठास फुंकरीनें त्यांच्याकडे खेचला जात नाहीं असा एखादाच भाग्यवान् शेतकरी आपल्या दृष्टीस पडतो ! एकंदरींत मोहक व मादक कैफ आणणारें हें खेडेगांवचे तिसरें व्यसन असून त्याचाही अम्मल करणारे हतभागी जीव आपणांस येथें पहावयास सांपडतात ! कोण हा दैवाचा दुर्विलास ! आतां पुढें चला ! तो पहा पाणवठा, व पाणी नेण्यासाठीं जमलेली ती पहा गर्दी व ऐका ते भांडण ! मुलांनो, हें भांडण किरकोळ नाहीं बरें ! त्यांत स्पृश्यास्पृश्यांचा प्रश्न व रेतीच्या ढिगाप्रमाणें विस्कळीत व नादान झालेल्या हिंदुसमाजाचें चित्र आपणांस पहावयास सांपडणार आहे ! तो पहा शिखानष्ट मुसलमान त्या पाणवठयावरून खुशाल आणि बेधडक पाणी भरून त्या हिंदूंच्या पुढून राजरोसपणें नेत आहे; पण तेच त्यानंतर हिंदूंतला ' अस्पृश्य ' पाणी नेण्यास पुढें झाल्याबरोबर त्यावर शिव्याशापांची पुष्पांजली वाहिली जात आहे ! अरेरे ! हातोहातींचा हा न्याय–अंधळ्या समाजाचा हा अन्याय–पाहून कोणाला सात्विक संतापाची चीड येणार नाहीं ? व त्या भिरभिरींत एखादा इसम बाटून मुसलमान झाल्यास त्यांत त्याचाच केवळ दोष म्हणता येईल काय ? एकंदरींत हा स्पृश्यास्पृश्याचा प्रश्न फारच जाचकपणानें आपल्या आज-

च्या समाजाला भोंवतो आहे, व त्यांतून त्याची लवकरच सुटका न झाल्यास त्याची धडगत नाहीं अशी आज स्थिती येऊन पोंचली आहे ! तरी पण खेडगांवचा शेतकरी व इतर समाज अद्याप त्या कामीं प्रसुप्तच आहे ! केवढी ही अज्ञानाची गाढ झोंप ! त्यानंतर एक विद्या-मंदिर ह्मणजे चार यत्तेपर्यंतची एक शाळाही येथें आहे. तसेंच, एक कोऑपरेटिव्ह सोसायटी म्हणजे पतपेढीची एक शाखाही ह्या ठिकाणीं स्थापन झालेली आहे ! पण विद्येची अभिरुचि व नीतिमत्तेची पत जवळ राहिली असेल तर ह्या दोन संस्था नीट चालणार ना ? त्या बिचाऱ्या कशाबशा रुटुखुटू चालत आहेत इतकेंच ! त्यानंतर मारुतीच्या अगर विठोबाच्या अगर महादेवाच्या देवळांत जमून भजन करीत असलेली ही पहा गांवची मंडळी ! हा देखावा पाहून मात्र कांहींसा जीव येथें रमतो! पण लवकरच, वर सांगितलेली अनर्थ परंपरा डोक्यापुढें उभी राहिली म्हणजे ह्या कोरड्या भजनी मंडळीच्या आरडयाओरडयाची कींवच करावीशी वाटतें ! गांवाला एक तालमीचा आखाडाही आहे. व ही गोष्टही ठीक आहे ! पण त्याला व्यवस्थितपणाचें वळण जसें हवें तसें दिसत नाहीं, ही येथें फार मोठी उणीव आहे ! एकंदरींत, भजनीमंडळ व तालमीचा आखाडा ह्या दोन गोष्टी त्यांतल्या त्यांत समाधानकारक असून, ह्या दोनच धाग्यांच्या आधारें खेडेगांवच्या उन्नतीचें महावस्त्र आपणांस विणतां येईल; व तसें तें विणून मी देशाच्या अंगावर चढवीन, अशी महत्त्वाकांक्षेची उमेद तुम्हीं आपल्या चित्तांत आतांपासून बाळगा, व त्याकामीं “ महाराष्ट्र-कुटुंब–माले ” चीं “ मजूर ” “ न्याय ” “ कसे दिवस जातील ” इत्यादि पुस्तकें, नारायण हरी आपटे यांची “ लोकमित्र ” नामक गोष्ट व इतर उपयुक्त वाङ्मय तुम्हीं अवश्य वाचून आपल्या शरीराची व मनाची तयारी त्याकामीं आतांपासून ठेवा हेंच माझें तुम्हांस पुनः पुन्हां सांगणें आहे ! सरते शेवटीं खेडेगांवांतून बाहेर पडतां पडतां गांवाच्या हद्दीवरील एक अनर्थ दाखवून मी तुम्हांला शहरास नेणार आहे ! मुलांनो,

तें पाहिलेत कां? गांवाच्या हद्दीवर ' ट्रीस्केअर ' च्या पट्टीसारखी पट्टी ज्याच्या शिखरावर उभारली आहे, असें तें ख्रिश्चन लोकांचें चर्च? तें या ठिकाणीं कशासाठीं बरें उभारलें आहे? तुमच्या समाजाकडून उपेक्षा केल्या जाणाऱ्या बायाबापड्यांना, अनाथ अपंगांना, व महारापोरांना बाटवून ख्रिश्चन करण्यासाठीं ही क्रॉसनें शोभणारीं इमारत ह्या ठिकाणीं उभी आहे! भूतदयेनीं भरलेले कित्येक पाद्री खरोखरच त्या गरीब जीवांची कींव करून त्यांना खायला-प्यायला देतात, त्यांची सेवासुश्रुषा करतात, व त्यांच्या धर्मसमजुतीप्रमाणें त्यांना बाप्तिस्मा देऊन नरकापासून त्यांची सुटका करून त्यांना शिक्षण देतात व व्यवस्थित व स्वच्छ राहणीची त्यांना गोडी व आवड लावतात! मुलांनो, आपल्या समाजाची ही उपेक्षा किती निंद्य आहे बरें? देवळांतले कोरडे टाळ-कुटणारे ते भजनी लोक या ठिकाणीं यत्किंचित् तरी आडवे पडतात काय? परमेश्वराच्या आणि साधुसंतांच्या भूतदयेचे गुण गाणारे हे गवई खऱ्या भूतदयेच्या प्रसंगीं कोठें दडून बसतात बरे? पण त्यांचा वेदांतच कांहीं और आहे! पण तो तितकाच चीड आणणारा आहे, हें लक्षांत ठेवा! यासाठीं हिंदुधर्मातील समाजाची ही गळती आपणांस थांबवलीच पाहिजे, व मोठे झाल्यावर आम्ही त्याकामीं अनाथालयें वगैरे उघडून आमची शिकस्त करूं, अशा तऱ्हेच्या दृढनिश्चयाचें तेज आतां-पासूनच तुमच्या मुखावर खेळूं द्या, एवढेंच माझें तुम्हांला त्याकामीं अखेरचें सांगणें आहे! आतां रात्र झालीच आहे, तर चला आतां, एक रात्र ह्या खेडेगांवच्या शुद्ध वायूच्या हवेंत सुखानें निद्रा करून, सकाळला अगदीं उजाडता आपण शहरांत जाऊं या! म्हणजे तेथील हाल-चाल व हालहवाल आपणांस नीट पहावयास सांपडेल! सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकच दिवस आपण तेथें राहिलों तरी ' शितावरून भाताची परीक्षा ' ह्या न्यायानें नगरच्या जीवनाचा कार्यक्रम आपणांस

तेव्हांच कळेल, व नगरांत कोणकोणच्या दोषांनीं नगरवासी जनांबरोबर बिऱ्हाड केलें आहे, हेंही आपणांस दिसून येईल ! असो.

---

## शहरची हवा.

चला, मुलांनो, उठा! सकाळ झाली; प्रातःकाळचा प्रकाश फांकला! उठा, व शौचमुखमार्जन करून, 'गोपालजींची' किंवा 'रघुनाथ-कुवरजींची' भूपाळी मुखानें गुणगुणत शहरची वाट चालू लागा ! पण ह्या खेडेगांवाला सोडतांना व त्याला प्रणाम करून निघतांना, तेथील शुद्ध सात्विक हवेचें, व रम्य नैसर्गिक देखाव्याचें स्मरण होऊन, जितकें हृदय भरून येतें, तितकेंच खेडेगांवच्या एका बाजूस ब्रँडीच्या बाट-लीचा वास, तर दुसऱ्या टोकांस ब्रिटिशांच्या बायबलचा निवास पाहून 'ब्रिटिश, बायबल, व ब्रँडी' ह्या तिकडी साखळीची अभेद्य जुळणी व त्यांतील बायबल व ब्रँडीच्या बळकट पाशांनीं ब्रिटिशांनीं आपणांस कसें जखडलें आहे व त्या दोन टोकावरील दोन धाग्यावर विणलेल्या जाळ्यांत इतरही अनर्थांची भर पडून, त्यांत सांपडलेला खेडेगांवचा हतभागी समाज आज कसा तडफडत आहे ह्या विचारानेंही पण ऊर भरून आल्यावांचून राहत नाहीं, हेंही तितकेंच खरें आहे, नाहीं ? पण मुलांनो, शहरची वाट चालतां चालतां, मी तुम्हांला एक तत्व सांगतों तें नीट लक्षांत ठेवा व त्या दृष्टीनेंच पाहिलेल्या खेड्याचा व पहावयाच्या शहराचा, पाहून झाल्यावर नीट स्वतःच्याच मनाशी विचार करा, म्हणजे या कामीं इतरांच्यापेक्षां आपण स्वतःच आपल्या अनर्थाला जबा-बदार आहोंत, हें तुमच्या ध्यानांत येईल व खऱ्या उपदेशाचा व खऱ्या उपायांचा मारा मोठे झाल्यावर कोठें करावयाचा हें तुमच्या लक्षांत, येऊन देशाच्या धर्माच्या व समाजाच्या कायमच्या कल्याणासाठीं त्याच्या बाह्य शुद्धीपेक्षां अंतःशुद्धीकडे व बाह्य सुधारणेपेक्षां अंतर्गत सुधारणे-कडे तुमचें लक्ष जाईल, व शरीरावर उठणारी हजारों गळवें पाहून

त्यावर वरवर मलमपट्टया लावणाऱ्या वेड्या वैद्याचा वांकडा ( म्हणजेच चुकीचा ) मार्ग न स्वीकारतां शरीराच्या अंतर्भागाचीच योग्य ती साफ-सफाई झाली पाहिजे म्हणून, सरळ पोटांत घेण्याचें औषधांचीच तुम्ही त्याकामीं योजना कराल !

तें तत्त्व ह्मणजे एका संस्कृत कवीच्या प्रसिद्ध श्लोकांत ह्मटल्या-प्रमाणें–" सुखस्य दुःखस्य न कोपि दाता । परो ददातीति कुबुद्धि-रेषा ॥ " किंवा हीच गोष्ट अधिक फोडून सांगितलेल्या खुद्द भगवंताच्या वचनाप्रमाणें ह्मणायचें तर " आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ' हेंच होय ! ह्या श्लोकाचा अर्थ असा कीं सुख किंवा दुःख हें आपलें आपण मिळवित असतों. खऱ्या अर्थानें त्याचा दाता दुसरा कोणी नसून, स्वतःच्या संसाराचा स्वर्ग किंवा नरक बनावणें हें केवळ आपल्या हातचें आहे! आपण ठरवूं तसें त्याचें चित्र उठणार आहे ! व जी गोष्ट एका व्यक्तीची तीच समाजाची व तीच राष्ट्राची होय, ! तेव्हां आपणच आपले शत्रू आणि आपणच आपलें मित्र होत, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं ! मुलांनो, हा मी कांहींतरी कोरडा वेदांत तुम्हांस सांगत आहे असें नसून, अक्षरशः हेंच सत्य आहे असेंच तुम्हांस कोणीही विचारी मनुष्य सांगेल, मुलांनो. जगांत असें दुःखच नाहीं कीं, जें आपल्या स्वतांच्या करणीवांचून आपल्या अंगावर येऊन आदळेल ! एखादा दुःखदप्रसंग येऊन ठेपला कीं, बेशक समजावें कीं, हें आपल्या स्वतःच्या कृत्याचेंच फळ आहे "प्राक्तना ऐशी फळं जाणा" असें समर्थ म्हणतात त्या नितांत सत्य पण उच्च, व म्हणूनच तुह्मांस समजण्यास कठीण, अशा गोष्टी मी तुह्मांस सांगत बसत नाहीं; पण अगदीं देखतडोळा, उघड उघड घडणाऱ्या गोष्टींची मौजच मी तुह्मांस दाखविणार आहे पहा बरें, आज ३० कोटींच्या ह्या हिंदुस्थान देशांतील लोक नादान व कुचकामाचे ठरण्याचें कारण–अगदीं आद्य कारण ह्मणजे, ते लोक निःशस्त्र केले गेलें हेंच होय ! पण ह्या निःशस्त्री करणाबद्दल दुसऱ्यावर

बोटें मोडण्यांत अर्थ काय ? आधीं एवढें तुह्मी ३० कोटी लोक असतांना निःशस्त्र झालातच कसें ? तुमच्या हातांतील शस्त्र काढून घेण्यास येणाऱ्य लोकांबरोबर झुंज खेळून तुह्मी वीरोचित स्वर्गवास किंवा जगल्यास मानाचा महीनिवास कां केला नाहींत ? पण तुमच्यांतच फंदफितुऱ्या, दगलबाजी, व तेजस्वितेचा अभाव झाल्यावर, क्षणैक स्वातंत्र्याचा इच्छेची फस् फस् जागच्या जागींच जिरावी, व तुमच्याशीं तुलना करतां अवघ्या मूठभरच ठरणाऱ्या लोकांनीं, तुह्माला भराभर निःशस्त्र करावें हें तुमच्या नामर्दपणाला साजेसेच झालें. मग "येथें बोल नाहीं इतरासी" असेंच झालें नाहींका ? ह्मणजेच, आपणच आपलें अनहित केलें असेंच नाहीं कां होत ? मुलांनो, तुह्मी शीलवंत, धैर्यवंत, तेजस्वी, ताकदवान असा, आणि पहा काय ताकद आहे दुसरा कोणी तुह्माला हात लावील किंवा मग्रुरीची भाषा बोलेल ! निःशस्त्रीकरण काय हिंदूंचेंच तेवढें झालें आहे ? मुसलमानांचेंही तितकेंच तें झालें नाहीं काय ? पण तशाही स्थितींत त्यांची जात कडवी राहावी, व आह्मी नुसतें बोटें मोडीत बसावें हाच कां आमचा पुरुषार्थ ? यांत दुसरें तिसरें तर कांहीं नसून स्वतःच्या दोषाचें खापर दुसऱ्या कशावर तरी किंवा कोणावर तरी फोडण्याचा नेभळटपणा मात्र उत्तम दिसून येतो ! असो. तर सांगण्याचा भाग असा कीं, सुखदुःखाचे मूळ उत्पादक व दाते आपले आपण आहोंत ! आपणच आपली चिता रचीत असतो, अगर पुष्पशय्या सजवीत असतो ! अंतःकरणाच्या वृत्तीची, शरीराच्या ताकदीची व बुद्धीच्या बळाचीच काय ती वाण असते ! तिच्या फरकाप्रमाणें एकाच परिस्थितींतून एक जीव साफ सुटून जातो, तर दुसरा त्यांत कुचमत राहतो. इतकेंच नव्हे, तर त्यास बळी पडून पुष्कळदां धुळीस मिळतो त्याचें तरी कारण हेंच ! प्रसिद्ध आंग्ल नाटककार शेक्स्पीअर ह्यानें आपल्या 'मॅक्बेथ' नामक नाटकांत हाच देखावा दाखविला असून, हेंच तत्त्व वाचकांच्या व प्रेक्षकांच्या मनावर ठसविलें आहे ! चैन,

विलास, व्यसनें, स्वाभिमान–स्वदेशाभिमान–स्वधर्माभिमान–शून्यता, ह्यांचे पेले आपण आपल्याच हातानें झोकीत असतो ! व दोष मात्र आपण दुसऱ्यास देत सुटतो ! ही काय रीत झाली ? 'नाचता येईना अन् अंगण वाकडे; स्वैपाक करतां येईना अन् ओलीं लाकडें' अशांतलाच हा प्रकार झाला म्हणायचा ! पण असें म्हणून कसें चालेल ? त्यांत तुमच्याच नादानपणाचें चित्र अधिक उठावदार दिसेल, इतकेंच !

चला, तर मुलांनो, आतां मनाच्या विमानांत बसून वरील गोष्टींचे म्हणजेच निरनिराळ्या अनर्थांचे प्याले झोकणारी–अगदीं आपण होऊन तोंडाशीं लावणारी–मंडळी आतां तुम्हांस शहरांत दाखवितों, चला ! हें पहा आलें शहर ! आतां त्याच विमानांतून चक्कर घेत आपण सदर शहराचा 'विहंगम' दृष्टीनें देखावा पाहूं या ! म्हणजे तीं तीं स्थलें एकदम नजरेंत भरून अधिक परिणामकारकरीतीनें लक्षांत राहतील ! ही पहा गल्लोगल्लीं पसरलेलीं हॉटेलें, हेअरकटिंग सलून्स, वेश्यागृहें, पानगृहें व त्यांतच कायमचीं ठाणीं देऊन राहिलेलीं सिनेमागृहें आणि संगीत नाटकगृहें ! हॉटेल्स ऊर्फ विश्रांतिगृहांतून प्रमुख चमकणारी चीज म्हणजे चहा ! चहाच्या सिंगल वाचून हॉटेल म्हणजे 'डेन्मार्कच्या राजपुत्रा–( हॅम्लेट )–शिवाय हॅम्लेट नाटक' होय ! इतका त्यांचा अभेद्य संबंध आहे ! याशिवाय तिथली ती भजी, भाजी, चिवडा इत्यादि शिळ्यापाक्या व गलिच्छ खाद्यांचा थाट तर कांहीं औरच असतो ! वास्तविक 'विश्रांतिगृहा' ची अवश्यकता कोणाला ? थकलाभागलेला व दमलेला जीव आहे, व ज्याला घरचा गोड आणि सुग्रास घांस खावयास मिळणें शक्य नाहीं, अशा अभागी जिवासाठीं वास्तविक हीं विश्रांतिगृहें आहेत. खरी विश्रांति त्यानांच हवी असते. पण सध्यां विश्रांतिगृहाचें स्वरूप काय दृष्टीस पडतें ? विश्रांतिगृहें हीं चैनीचीं गृहें झालीं असून, शेंकडा ७५ च्या वर जीव तेथें केवळ चैनीखातर खाद्यपेयावर ताव मारण्यासाठीं येतात, व आपल्या द्रव्याचें व शरी-

राचें नाहक नुकसान करून घेत असतात, असाच देखावा आपणांस दृष्टीस पडत नाहीं काय? त्यांतच चहाची चमन चालून, चवचाल जिव्हेचे चाळे परदेशाची धन करण्याकडे होत असलेलें पाहून, कोणाही विचारी जीवाच्या अंतःकरणाला पीळ पडल्यावांचून राहणार नाहीं! हेअर कटिंग सलून्सचा उपयोगही असाच चांगल्या रीतीनें करून घेतां येणार नाहीं असें नाहीं! पण तीं ठिकाणेंसुद्धां केवळ चैनीचीं साधनें झालीं असून रात्रीचेसुद्धां हे कारखाने चाललेले पाहून कोणा धार्मिक वृत्तीच्या मनुष्याला उद्वेग वाटल्यावांचून राहील? सिनेमागृहाकडे वळल्यास आपणास तेथें काय दिसतें? उदात्त भावनांनीं भरलेलें पौराणिक व ऐतिहासिक दृश्याचें स्वदेशी चित्रपटापेक्षां, विलायती रोमान्सचीं चित्रेंच त्या ठिकाणीं नाचतांना, व आपल्याबरोबर समजालाही थिल्लरपणें नाचवितांना अधिक दृष्टीस पडतात ना? त्यांतच हजारों फुटांच्या लांबीचें विलायती चित्रपट काढून, व त्याचे शेंकडोशें हप्ते पाडून, प्रत्येक हप्त्यागणिक उल्लू तरुणांच्या खिशांतील पैशांची व्यवस्थित लूट करण्याचेंही नवीन साधन निघालें आहे; व त्याप्रमाणें आज कित्येक वर्षें ही लूट चालू आहे! जी सिनेमाची गोष्ट तीच नाटकाची! याठिकाणींही शोक आणि चैन यांचाच उल्हास फार! व तरुणापासून वृद्धापर्यंत वरील गोष्टीप्रमाणेंच ह्याचेंही व्यसन समाजाला जडलें असून ह्या व्यसनांच्या बळकट पाशांत सांपडून आज समाज अधोगतीला लागला आहे व तीं व्यसनें चालविणारांची मात्र चांगलीच चमन चालून त्यांची पोळी पिकली आहे! पण चैनबाजीची भूलच अशी कांहीं और आहे कीं, अधोगती हीच उन्नति भासावी! किती हें करुणास्पद व कींव करण्यासारखें शोचनीय दृश्य!!
चला मुलांनो, आतां आपण स्टेशनरी, व कापडबाजाराकडे आपली दृष्टी वळवूं या! ह्या दुकानांतून निव्वळ स्वदेशी माल विकणारीं दुकानें किती बरें दिसून येतात? एखादुसरेंच दृष्टीस पडतें ना? आणि तेंच, निव्वळ विलायती मालाचीं दुकानें पहा पाहूं? कितीतरी—जवळ

जवळ सर्वच—तशीं आहेत, असेंच आपणांस दिसून येत नाहीं काय ? जी गोष्ट स्टेशनरी व कापड यांची, तीच कांचसामान, व साखर, काडयाच्या पेटया, इत्यादिकांची आहे ! बरें, हा विलायती माल कोण विकते आणि कोण घेते ? आपलेच लोक ना ? मुलांनो, घराला आगी लागण्याच्या गोष्टी तुम्ही ऐकल्या असतील, व कांहीं आगी लागलेल्या तुह्मी स्वतः पाहिल्याही असतील. पण त्या ठिकाणीं आपणांस काय दृष्टीस पडतें ? आपल्या घराला आग आपली आपण व तींही उघडया डोळ्यांनीं लावल्याचा चमत्कार तुम्ही कधीं पाहिला आहे काय ? पण तो चमत्कार तुम्हांस ह्या ठिकाणीं दृष्टीस पडणार आहे ! आपल्या देश-भक्तीचे डोळे नीट उघडून पहा, ह्मणजे मी काय म्हणतों तें तुह्माला कळून येईल ! प्रत्यक्ष घराला लागलेली आग विझविण्यासाठीं आपण चारी बाजूंनें पाण्याच्या घागरी घेऊन धांवतों; पण देशाला लागलेल्या ह्या परदेशी मालाच्या आगीचा भडका व डोंबाळा अधिकच वाढावा म्हणून आपण आपल्या द्रव्याचें ‘ तेल ’ त्या ‘आगींत’ ओतण्यास सारखे धांवत असतों ! अरेरे ! कोण हा आत्मघातकी देखावा व केवढा हा अधःपात ! ! पण ह्यांतच उन्नति वाटावी, अशीच ही मृत्यूची शीतलाई आहे ! अभागी आर्यावर्त ! तुझें पुढें होणार तरी काय ? मुलांनो, या-शिवाय दारूचीं दुकानेंही पेठापेठांला पसरलेलीं आपणांस दिसतात, व त्यांतील ‘एकच प्याला’च्या पायीं—तो पिऊन—आपल्या घरादाराचें, शरीर-संपत्तीचें, कुलशीलाचें, वाटोळें करणारा हतभागी समाज इथेंही आप-णांस हजारांनीं मोजावयास सांपडतों ! एकंदरींत, खेडगांवाप्रमाणें बाटलाबाईचा प्रताप इथेंही चांगलाच गाजत आहे असें आपणांस दिसून येतें ! आतां ब्रिटिश अमलांतील ब्रिटिश, बायबल व ब्रँडी ह्या तिकडी सांखळीतला शेवटचा, पण पहिल्या इतकाच बळकट दुवा ह्मणजे बायबलाचा ! व गांवाच्या सरहद्दीवर तोही टेकलेला आपणांस दृष्टीस पडत असून, येशूच्या कळपांत सांपडलेलीं कितीतरी बिचारीं

गरीब अर्भकांचीं कोंकरें बें बें करीत चाललेलीं व आपल्या मूकरुदनाचा टाहो फोडीत असलेलीं आपणास दिसत आहेत ! त्या टाहोच्या करुणवाणीनें कळवळून जाणारीं कितीकांचीं हृदयें बरें आपणांस पहावयास सांपडतील ? त्या दीन अर्भकांच्या सुटकेसाठीं धांवून जाऊन, हिंदुधर्मांतून चुकलेल्या त्या पाडसांना पोटाशीं धरून, त्यांना शुद्धिसमारंभानें शुद्ध करून घेऊन, समाजाला शुद्धीवर आणणारे थोर जीव इथें आपणांस किती बरें पहावयास सांपडतात ? अशा तऱ्हेची गळती आपल्या समाजाला लागूं नये, व लागली आहे ती बुजून जावी ह्यासाठीं अस्पृश्यतेचें भोंक बुजविण्यासाठीं अहमहमिकेनें पुढें होणारे, व देशाचे दुर्दैव टाळणारे किती बरे नरपुंगव आपल्या दृष्टि-पथांत येतात ? इराण्याच्या दुकानांत चोरून चहा पिणाऱ्या सोवळ्या भिक्षुकांपासून नखशिखांत विलायती थाटांत मिरविणाऱ्या हिंदु 'साहेबां'-पर्यंत सर्वजण सारखीच या गोष्टीची उपेक्षा करीत आहेत, व एखादाच जीव त्यासाठीं तळमळत आहे, असेंच आपणांस दिसून येतें ना ? अरेरे ! किती ही शोचनीय अवस्था ! याशिवाय, प्रकट नसले तरी गुप्तपणें, ऋणाच्या डोहांत बुडालेले, पण बाहेरून मात्र ' मिशीला तूप लावून हिंडणारे ' अभागी जीव येथें किती तरी आपणांस पहावयास सांपडतात ! त्यांच्या ह्या आंबटशोकी व म्हणूनच आत्मघातकी चैन-बाजीची कींव करावी तितकी थोडीच ! एकंदरींत, खेडगांवाप्रमाणेंच व त्यांहूनही जास्त गोष्टींत, शहराचा सुशिक्षित पण हतभागी समाज नसत्या फॅशनच्या गोड नांवाखालीं व भुलीखालीं आज सारखा खालीं खालीं जात आहे हेंच खरें ! आतां शहरवासीजनांचें, नागरिक ह्या नात्यानें, तेथील म्युनिसिपालिटीच्या कार्याला शक्य तितकी मदत करणें, व आपला गांव आरशासारखा चोख व स्वच्छ ठेवणें, हें कर्तव्यच ठरत नाहीं काय ? पण ह्या कर्तव्याला कितीजण जागतात बरें ? भर रस्त्यावर ( रस्त्याच्या कडेला नव्हे ) वाटेल तिथें थुंकणारे,

३५६९

नाक शिंकरणारे, व अन्य रीतीनें घाण करणारे व फेकणारे शेंकडों जीव पहा, तसेंच म्युनिसिपालिटीच्या जागोजाग बांधलेल्या मुतारींत लघवी न करतां, अगदीं तिच्याच शेजारीं, बोळाबोळांतून व रस्त्यारस्त्यावरून मुताचे ओघळ वाहवणारे विलक्षण वृत्तीचे लोक पहा, ह्मणजे किती इमानेइतबारें हे आपल्या नागरिकत्वाचीं चोख कर्तव्यें बजावीत आहेत, व त्यांत सुशिक्षित—व अशिक्षित सगळेच कसे सारखेच सामील आहेत, तें तुह्मांस दिसून येईल. यास अपवाद ठरणारे—नागरिकत्वाचीं खरीं कर्तव्यें जाणणारे असे जीव फारच थोडे—विरळा सांपडतील ! म्युनिसिपालिटी ह्मणजे वास्तवीक गांवच्या लोकांचा एकत्र व संगनमतानें झालेला शहाणपणाचा कारभार. पण तेथेंही स्वार्थ, मत्सर, नालायकीची चुरस ह्यांची अहमहमिका लागून, आपणच आपले कसे शत्रू बनतो व स्वतःच स्वतःच्या नाशाला कसे कारण होतो, याचें चित्र रा. माधव नारायण जोशीकृत " म्युनिसिपालिटी अथवा स्थानिक-स्वराज्य " ह्या नाटकांत मोठे परिणामकारक काढलें आहे ! ' पण लक्षांत कोण घेतो ? ' असो. मुलांनो, ह्या अशाही गावांत अथवा शहरांत हिंदु-सभा, कोऑपरेटिव्ह सोसायटी, अनाथविद्यार्थीगृह, शिक्षणालयें, इत्यादि कांहीं कांहीं चांगल्या गोष्टी आहेत, त्याचप्रमाणें येथील देवालयांतून व हरिमंदिरांतून कथा, कीर्तन, पुराण, व नामसंकीर्तन बहुधा अहर्निश चालू असतें, हीही मोठया आनंदाची गोष्ट आहे ! पण असें असतां, वर वर्णिलेल्या व्यसनांची व अनर्थांची भुतें आमच्या इतक्या मानगुटी कां बसावींत हें समजणें कठीण आहे ! पण याचें आमच्या मतें एकच एक कारण म्हणजे आमचा दृष्टिकोनच साफ बदलून गेला आहे ! तो जेव्हां पूर्वस्थलावर येईल, तेव्हांच कांहीं झाला तर उपयोग होणार आहे ! त्या कामीं, त्या दृष्टींत अंजन घालून ती साफ करण्याची आपण आपल्या पुढच्या आयुष्यांत शिकस्तीची खटपट करूं, एवढाच मला तूर्त तुमचा दृढनिश्चय हवा आहे ! तेवढा तुम्हीं मला दिलात म्हणजे माझें कार्य झालें !

व तसा निश्चय तुम्हीं आतां अवश्य कराल, अशी माझी खात्री असल्यामुळें यापुढें त्याविषयीं अधिक कांहीं न सांगतां, तुम्हांस या शहरांत एक रात्र विश्रांति देऊन, उदईक सकाळीं मनाच्या विमानांत बसवून सबंध देशभर फिरावयास नेणार आहे ! घ्या तर आतां विश्रांति !

---

## माझा मायदेश !

मुलांनो, चला उठा ; सकाळ झाली ; सूर्याचीं सोज्ज्वल पण कोवळीं किरणें सर्वत्र पसरलीं , व आपल्या हजारों हातांनीं तो तुम्हांस हालवून जणों जागृत करीत आहे, व आपल्या बरोबर भारतवर्षाचें अवलोकन करण्यासाठीं जणूं काय तो तुम्हांस पाचारणच करीत आहे, असा भास होत आहे ! तर उठा आतां, व शौचमुखमार्जन सारून व गरम गरम दुधाचे प्याले झोकून, ज्या पुण्यशील महात्म्यानें आपणांस एक रात्र वसतीस जागा दिली त्याचें आभार मानून, जगन्नियंत्याचें नामस्मरण करीत आतां बाहेर पडूं या ! बाहेर आपले रामाच्या पुष्पकविमानासारखें मानसविमान तयार आहेच. त्यांत पाय ठेवल्या बरोबर ते गरुडगतीनें अथवा वायूच्या वेगानें आकाशांत संचार करूं लागेल, व तुम्हांला मौजच मौज वाटेल ! चला तर, चढा त्या विमानांत ! भिऊं नका ! त्या विमानाचा दांडा धरून मी तुम्हांस मार्ग दाखवायला येतच आहें; व आपल्या मर्जीप्रमाणें आपण त्याला मंद किंवा जलद चालवूं म्हणजे झालें ! चला तर ! पहा ! पाय ठेवायचीच खोटी, किं विमान आकाशांत चढूं लागलें.! मुलांनो, ह्या शहराचें शेवटचें दर्शन घेतांना खेडेगांवाप्रमाणेंच, पण त्याहून कितीतरी पटीनें अधिक असणारें, अनर्थाचें येथील अजून एक ठिकाण तुम्हांस दाखवावयाचें राहिलें आहे तेवढें दाखवितों, व मग आपण पुढें जाऊं या. तें पहा न्यायाचें कोर्ट ! या ठिकाणीं खऱ्याखुऱ्या न्यायासाठीं येणारे जीव फारच थोडे ! कज्जेदलालीची दारू पिऊन बेहोषपणें भांडणारे असत्यवादी जीवच तुम्हांस येथें बहुतेक सांपडतील ! या नश्वर मृत्युलोकांतील क्षुद्र स्वार्थाकरितां अत्यंत नीच अस-

त्याचा अवलंब करणारे हे कपी पाहिले, व त्यांतच त्यांच्या मदतीला धावून जाऊन त्यांच्या खोट्या पक्षाचे तावातावानें समर्थन करणारा उदरंभरू वकीलवर्ग पाहिला म्हणजे–" आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला। झाला तशांत तरि वृश्चिक दंश त्याला। झाली तयास तदनंतर भूतबाधा। चेष्टा वदूं मग किती कपिच्या अगाधा! ॥ १ ॥ "–ह्या प्रसिद्ध श्लोकाची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं! तसेंच, अजून एक अनर्थ पुण्या-मुंबईसारख्या प्रसिद्ध शहरीं अगदीं राजरोस धुडगूस घालीत असतो. त्याचाही उल्लेख करून आपण आपलें विमान पुढें हांकारूं! तो अनर्थ खरोखरच अनर्थकारक आहे! किंबहुना, मदिरा, वेश्या व न्यायकोर्ट याप्रमाणेंच हा रेसिसचा चौथा अनर्थही, अर्थानें म्हणजे द्रव्यानें खेळला जाऊन खरोखरच अनर्थकारक म्हणजे भणंगाभिकारी बनविणारा आहे! अनर्थ ह्या नांवाचा अर्थ अगदीं अक्षरशः इथें सार्थ होतो आहे! नळ--धर्मराजादिकांचे उदाहरण डोळ्यांपुढें असूनही घोड्यांची जुगार खेळणाऱ्या ह्या हतभागी जीवांकडे पाहिले, म्हणजे खरोखर त्यांची कींव करावी तितकी थोडीच असें वाटूं लागतें! बरें, ह्या व्यसनाच्या सपाट्यांत केवळ श्रीमंतच पैसे उडवितात असें नसून, ज्यांना उद्या खाण्याची भ्रांत, व ज्यांचें हातावर पोट आहे, असे लोकही ह्यांत बेगुमानपणें सामील होत असतांना पाहून तर अंगावर शहारेच येतात! हें पहा, हेंच तें रेसिसचें ग्राऊंड! मुंबईजवळचे ' महालक्ष्मी ' स्टेशनजवळ असणाऱ्या ह्या जागेवर ' लक्ष्मी'ची प्राप्ती न होता तिची थोरली बहीण जी अक्काबाई ऊर्फ दारिद्र्य व कर्ज तें मात्र बहुतेकांच्या गळ्यांत पडलेले येथें दृष्टीस पडतें! असो. पण दारू, वेश्या, न्यायकोर्टें, याप्रमाणेंच ह्याही अनर्थाचे पायीं आपले आपणच पैसे उडवतो व घालवतो, "येथें बोल नाहीं इतरासी " हीच गोष्ट खरी नव्हे काय? व यावरुन मी खेडेगांवाहून शहरची वाट चालता चालता सांगितलेले तत्व–" **आपुला आपण वैरी। झाला मानव ह्या संसारी ।।**" हें तत्त्वच खरें असल्याचें

मुलांनो, तुम्हांला आतां कळून आलें ना? यासाठीं, तुमच्या भावी आयुष्यांत तुम्हीं जी कामगिरी कराल ती दुसऱ्यावर बोटें मोडण्याची फारशी न करतां या 'आत्मघाता' पासून आपला समाज कसा मुक्त होईल, त्या समाजाच्या शरीराची अंतःशुद्धी कशी होईल, व तो पुन्हा पहिल्यासारखा तेजस्वी व बलवान् कसा बनेल, ह्याचाच विचार तुम्हीं प्रामुख्यानें करा, म्हणजे त्यानेंच तुमच्या देशाचें चिरकालीन हित होईल हें लक्ष्यांत ठेवा! असो.

चला आतां! आपण आपलें विमान उंच आकाशांत एखाद्या घारीसारखें चढवूं या। व घारीच्याच तीक्ष्णदृष्टीनें आपण समग्र देशाचें— आपल्या ह्या भरतखंडाचें अवलोकन करूं या! अहाहा! पहा, पहा, मुलांनो, केवढा तरी हा विस्तीर्ण पण तितकाच रम्य प्रदेश! तो पहा, हिमालय पर्वत! कालिदास कवीनें म्हटल्याप्रमाणें "उत्तर दिशेला असणारा हा देवतांचा भव्य आत्मा--हा नगाधिराज पूर्वपश्चिम समुद्रांत अवगाहन करून पृथ्वीचा जणों मानदंडच असा प्रशस्तपणें पसरला आहे." सूर्यप्रकाशांत लखलख करणाऱ्या तेथील बर्फाची व हिमशिखरांची शोभा काय वर्णावी? बर्फाचें आगरच तें! जिकडे पहाल तिकडे बर्फच बर्फ! पण हें कृत्रिम बर्फ नसून निसर्गमातेनीं आपल्या हिंदभूमीच्या सुपुत्रासाठीं तयार केलेला हा पुण्यपावन पाण्याचा पर्वत आहे! सूर्याच्या सहस्र करांनीं जेथील पाण्यांत आपले बुद्धिवर्धक तेज मिसळलें आहे असे अलोट पाण्याचे प्रवाह धो, धो, करीत येथूनच खालीं पूर्वपश्चिम दिशांना वहात आहेत! पुण्यसलिला भागीरथी, गौरीशंकराच्या चरणांजवळून निघालेली आहे व काशीविश्वेश्वराचें सुरम्य मंदिर हिच्याच कांठीं आहे! त्या भागीरथीचे आपणांवर किती बरें हे उपकार, व महादेवाची तरी केवढी थोरवी! हिमालयावर उभे राहून, आकाशींच्या गंगेचा वेग आपल्या मस्तकावर धारण करणाऱ्या शंकराचें (व जवळच हात जोडून उभ्या राहिलेल्या भगीरथाचें व त्याच्या भार्येचें) चित्र आपल्या डोळ्यापुढें आणा, म्हणजे

ह्या महादेवाच्या मोठेपणाचा ठसा तुमच्या हृदयावर चांगला उमटेल! खरोखर उत्तरेचा प्रदेश म्हणजे पौराणिक कालची आठवण देणारा एक रम्य चित्रपटच आहे! ही पहा यमुनानदी, हें पहा गोकुळवृंदावन, ही द्वारका, ही मथुरा, ही अयोध्या! किती, किती, म्हणून तुम्हांला सांगूं? त्यांतील प्रत्येक ठिकाण, प्रत्येक नदी, प्रत्येक पर्वत, प्रत्येक देवालय, हृदयांत उच्च भावनांचा सागर उसळविणारें व आदरानें ऊर भरून आणणारें आहे! महाराष्ट्राच्या कीर्तीच्या ऐतिहासिक देखाव्याची चमकही इथें आपणांस मधून मधून पहावयास सांपडते! अटकेवर झेंडा रोंवून आपले कीर्तिचा झेंडा त्रिभुवनांत फडकविणाऱ्या राघो भरारीला अटक करण्यास आलेली पण शेवटीं त्याचाच झेंडा आपल्या मस्तकीं मिरविणारी ही पहा अटक! कौरवपांडवांची व गिलचेमराठयांची तुफान रणनदी जेथें वाहिली तें हें पहा कुरूक्षेत्र, अथवा सोनपतपानपतचें पटांगण! पंजाबचा प्रांत गुरु गोविंदसिंग व राणा रणजितसिंह ह्यांची अद्याप आठवण देण्यास खडा आहे! इकडे रजपुतांचें निवासस्थान राजपुताना आपल्या धैर्यवीर्यशाली बाप्पा रावळ, राणा प्रतापसिंहादि शूर पूर्वजांची कीर्ति गात अद्याप उभा आहे! आतां महाराष्ट्राकडे दृष्टी फेंका! विंध्याचल व सातपुडा पर्वताची रांग ह्यांनीं ह्या महाराष्ट्राला व दक्षिण हिंदुस्थानाला उत्तर हिंदुस्थानापासून विलग केलें आहे. गणिताच्या भाषेंत बोलायचें तर अंशस्थानीं उत्तर हिंदुस्थान तर छेदस्थानीं दख्खनचा दिवा आहे व मधली ठळक रेघ ह्या विंध्य व सातपुडयाची आहे! ह्या दक्षिणेंतील महाराष्ट्रांत पाहिल्यास तेथेंही धार्मिक व ऐतिहासिक अशीं किती तरी स्थळें दृष्टीस पडणार आहेत! नाथांचें पैठण, ज्ञानदेवाची आळंदी, तुकारामाचें देहू, नामदेवाची पंढरी, अशी किती तरी पुण्यपावन क्षेत्रें व नाशीक, पंचवटी सारखे पुराणप्रसिद्ध प्रदेश, येथें असून भिमा, भामा, गोदा, कृष्णा, कावेरी, तुंगभद्रा, इत्यादि नद्या आपल्या पुण्य सलिलानें पाप्यांचा पापताप दूर करीत आहेत!

तापी व नर्मदा तर विंध्य सातपुडयांतूनच निघाल्या आहेत ! आतां सह्याद्रि पर्वताच्या रांगेकडे दृष्टी फेका, कोकणकडे पहा, व देशावरील पुणें, सातारा, कोल्हापूर, मिरज, सांगली, इत्यादि शहराकडे आपले डोळे वळवा ! पुण्यप्रतापी शिवाजी महाराजांचे रायगड, तोरणा, सिंहगड, प्रतापगड, पुरंदर व राजमाची इत्यादि किल्ले, मराठयांच्या अपूर्व वैभवाची साक्ष देण्यास काळाशीं टक्कर देत अजूनही उभे आहेत ! पुण्याचा शनवारवाडा पेशव्यांच्या राजवैभवाचे व शौर्यशालित्वाचे देशाभिमानी बोल अजूनही बोलत असलेला मुलांनो तुम्हांला ऐकूं येईल ! निरनिराळ्या मराठे सरदारांचीं संस्थानें पिवळ्या रंगानें रंगलेलीं आपल्याला हिंदुस्थानच्या नकाशावर दिसतात. याचें कारण स्वतंत्रतादेवीचा विवाह वीरवरांशीं झालेला होता व तिला ' पिवळी ' करून परमेश्वरानें ती त्या वीरांना दिली होती त्याचें हें दर्शक चिन्ह आहे ! आणि बाकीचा तांबडा रंग कशाचा वरें द्योतक आहे ? रक्तपिपासूनीं आपली रुधिरतृष्णा आजवर किती शांत केली त्याचा दर्शक तो रक्त रंग आहे ! पण चला ! आपण पुन्हा उंच भरारी मारूं या ! हा पहा एका बाजूस आरबी समुद्र व एका बाजूस बंगालचा उपसागर; खालीं हिंदिमहासागर उत्तरेच्या हिमनगाप्रमाणेंच प्रशस्तपणें पसरला आहे ! ही पहा रावणाची लंका ऊर्फ सिलोन बेट ! तो पहा तिकडे मद्रास व मलबार ! आणि हा इकडे खालीं कन्नड व म्हैसूरप्रांत ! ह्या अफाट व विस्तीर्ण हिंदभूमींत जागोजाग संपत्तीचे प्रवाह गुप्त वा प्रगटरूपानें वहात आहेत ! येथील खनिज संपत्ती म्हणजे हिऱ्यामाणकांच्या खाणी, उद्भिजसंपत्ति म्हणजे लक्षावधी मैलपर्यंत हिरव्यापिवळ्या धान्यानीं व विविध बागाइतांनीं शोभलेली जमीन, कीं जणो हा एक हिंदभूमीचा हिरवा शालूच तिच्या देहावर शोभत आहे,—तसेंच जागोजाग असणारे येथील पूर्वापार चालत आलेले विविध कळाकुसरीचे कारखाने, त्याचप्रमाणें विजापूरचा गोलघुमट, व आग्रयाचा ताजमहाल, ह्यासारख्या

त्रिभुवनाला थक्क करून सोडणाऱ्या इमारती, पाहिल्या, व मोठमोठे बुद्धिवान् लोक व ३० कोटी जनतेच्या कंठनादानें निनादित होणारी ही हिंदभूमी पाहिली म्हणजे "आर्यमाते! धन्य धन्य! तुझ्या पोटीं येण्याचें भाग्य ज्याला लाभेल तो खरोखर धन्य होय!" असे उद्गार आपल्या तोंडून निघून "माते, तुला माझे शतशः प्रणाम असोत! वंदेमातरम्!" असें म्हणून कोणाचेंही मस्तक आदरानें नम्र झाल्या-वांचून राहणार नाहीं-राहत नाहीं! पण—

पण मुलांनो, एकीकडे ह्याप्रमाणें ह्या सृष्टिमातेच्या लाडक्या कन्य-केचें रम्य रूपडें पाहून कृतज्ञतेनें ऊर भरून येतो तोंच, व त्याच क्षणीं त्या नंदनवनाचा नरक आम्ही आपल्या हातांनीं कसा बनविला आहे हें पाहून छाती फाटून जाते व दुःखाचे अश्रू डोळ्यांत उभे राहतात! आज हिंदुस्थानची तीस कोट जनता असून तिनें शस्त्रसंन्यास करून १०० वर्षें नरकतुल्य पारतंत्र्यांत पिचत राहावें, व त्यांतून बाहेर पडण्या-साठीं म्हणण्यासारखा यत्न कोणीच करूं नये, उलट आपापसांत द्वेष, मत्सर, मारामाऱ्या, यांचाच सुळसुळाट व्हावा व "व तुला नाहीं, मला नाहीं, घाल कुत्र्याला" अशी स्थिती करून घ्यावी, त्याचप्रमाणें आपल्या गाढ अज्ञानानें अथवा देशाभिमानशून्यतेनें सगळ्यांचाच दृष्टिकोन बदलून जाऊन, "आयुष्य हें चैन नसून कर्तव्य आहे" या वचनाचा विसर पडून, सर्वांनींच खोट्या व आत्मघातकी चैनबाजींत मग्न व्हावें व देशाला आग लावीत सुटावें, हें देशाचें केवढें दुर्भाग्य! समाजाच्या हिताचे, धर्माच्या कळवळ्याचे, व राष्ट्राच्या जिव्हाळ्याचे कितीतरी प्रश्न पुढें पडलें असतांना त्याची जाणीव कुणासच नसावी ही किती शोचनीय गोष्ट आहे! 'पिंडब्रह्मांड' न्यायानें जे खेडेगांवांत व शहरांत दृश्य दिसलें, तेंच, मुलानो, अगदीं तेंच चित्र आपणांस ह्या सर्व देशांत दिसणार आहे! त्या सर्व अनर्थांचें वर्णन मी पुन्हा येथें करीत नाहीं; पण त्यांची पक्कड सर्व देशाच्या मानेवर पक्की बसली आहे, नव्हे

देशानें आपण होऊन बसवून घेतली आहे व तींतून आतां त्याची सुटका होणें फारच कठीण झालें आहे. कारण भुतांची भुतावळ उठविणें जितकें सोपें असतें तितकेच त्यांना परत थडग्यांत गाडणें कठीण असतें. घर पाडायला जितका वेळ लागतो त्याच्या शतपट वेळ तें बांधायला लागतो. वरील व्यसनांनीं व संकटांनीं अथवा अनर्थांनीं अनर्थांच्या घुशींनीं हिंदुस्थानचे हे घर फार उध्वस्त केलें आहे. त्यात बाटविण्याच्या अनर्थांत व अत्याचारांत मुसलमानांचा नंबर पहिला लागत असून " मलबारांतील मोपल्यांचें बंड, " स्वामीश्रद्धानंदांचा खून व इतर शेकडो ठिकणचे त्यांचे जुलुम व अत्याचार वरील विधानाची उत्कट साक्ष देत आहेत ! यासाठीं खालीं उतरण्यापूर्वीं कोणकोणच्या गोष्टीसाठीं आपणांस भावी आयुष्यांत झटावें लागणार आहे ह्याची तुम्हांला शेवटची जाणीव देऊन, मग मी हें मानसविमान खालीं उतरविणार आहे ! शिक्षण ऊर्फ साक्षरता, अस्पृश्यतानिवारण, हिंदुधर्मसंघटन व शुद्धिकार्य, स्वदेशीव्रतपालन, अनाथरक्षण व विविधव्यसनांच्या पासून आपल्या बांधवांची मुक्तता, इत्यादि पुष्कळच कार्यें आपणांस आपल्या भावी आयुष्यांत करावी लागणार आहेत, व त्यासाठीं आतांपासूनच आपणांस तयारीस लागलें पाहिजे, हें मुलांनो, तुमच्या लक्षांत आतां पुरेपूर आलेंना ? ती तयारी कोणची आणि कशी करायची तें मी आतां तुम्हांस पुढील प्रकरणांत सांगण्याचें आश्वासन देऊन आतां हें विमान खालीं उतरवितों व तुम्हांस पाहिलेल्या विस्तृत प्रदेशावर विचार करीत पडण्यास क्षणभर विश्रांती देतों !

---

## भावी आयुष्याची तयारी.

उठा ! विचारतंद्रींत मग्न झालेल्या मुलांनो, उठा ! व मी काय सांगतों तिकडे आतां लक्ष्य द्या ! स्वदेशाच्या रूपाच्या दोन्ही बाजू तुम्हांस पहावयास सापडल्यामुळें देशाच्या रम्य बाह्यांगाकडे पाहून हंसावें

कां कुजलेल्या अंतरंगाकडे पाहून रडावें, हेंच तुम्हांस समजत नाहींसें झालें असेल नाहीं ? पण मुलांनो, त्याचें उत्तर हेंच आहे कीं, इथें आनंद मानण्यापेक्षां खेदच मानला पाहिजे ! कारण बाह्यांगापेक्षां अंतरंगच जगांत श्रेष्ठ आहे, व ते जिथें उत्तम असेल तो इसम, तें घर, तें कुल, तो गांव, व तोच देश खरा चांगला म्हणावयाचा ! राजवाड्यांत राहणाऱ्या हलक्या मनोवृत्तीच्या राजापेक्षां झोपडींत राहणारा साधुवृत्तीचा थोर पुरुष शतपटीनें बरा नव्हे काय ? कारण जगांत चिरंतन टिकणारें बाह्यांग नसून अंतरंग आहे ! बाह्यांगाची भव्यता कितीही शोभिवंत आणि रमणीय असली तरी कालाच्या अजब तडाक्यांत व त्याच्याशीं झुंज खेळतां खेळतां तीं लवकरच जमीनदोस्त होऊन नामशेष होतात—कालाच्या अनंत उदरांत गडप होऊन जातात व त्यांचेसंबंधीं " कालाय तस्मै नमः " म्हणजे " अशा सर्व भक्षक काळाला नमस्कार असो " असें म्हणून हातच जोडावें लागतात ! पण ह्या काळावरही विजय मिळवून मात करणारी गोष्ट म्हणजे मनुष्याचें अंतरंग व त्यांनीं केलेल्या अजरामर कीर्तिच्या कृती होत. एका हिंदुस्थानी कवीनें म्हटलें आहे:—

**सूरतसे कीरत बडी बिनपंख उडजाय ।**
**सूरत तो जाती रही कीरत कभी न जाय ॥ "**

त्यांतील दुसरी ओळ येथें प्रस्तुत असून तीच विशेष महत्त्वाची आहे ! त्यामध्येंही कवी आपणांस हेंच सांगतो कीं, रूपलावण्यापेक्षां कीर्ति ही अधिक टिकणारी आहे ! किंबहुना, रूपलावण्याला जरा व मृत्यू आहे पण कीर्तिही अजरामर आहे ! काळाची कराल करवाल ( म्हणजे तरवार ) सुद्धां तिच्यापुढें लटकी पडते ! वेदकालीन ऋषींची, रामचंद्र, हरिश्चंद्र, इत्यादि महाभागांची, कृष्णार्जुनादिकांची, सीतासावित्रीसारख्या पतिव्रतांची कीर्ति आज हजारो वर्षें ह्या भरतखंडांतच नव्हे, तर त्रैलोक्यांत दुमदुमून राहिली आहे, व यावच्चंद्र दिवाकरौ

ती तशीच राहणार, याचें कारण हेंच कीं, कीर्तिचंद्राचा ग्रास काळ-राहूला सुद्धां करतां येत नाहीं ! यावरून " **कीर्ति करोनि नाहीं मेले । ते उगाच आले आणि गेले ॥** " अशा अर्थाचें जें समर्थवचन आहे तेंच सत्य आहे हें मुलांनो, आतां तुमच्या नीट लक्षांत आलें असेलच !

अर्थात् कीर्ति करायची ती सत्कीर्ति; दुष्कीर्ति नव्हे हें उघड आहे ! नाहींतर तळीरामाच्या दारूबाज मित्रांनीं " बोले तैसा चाले त्याची वंदावीं पाउलें ॥ तळीराम बारा वर्षे अडखळत बोलला व अडखळतच चालला ! अहाहा ! तळीराम एक महात्मा होता ! " ह्याप्रमाणें जशी त्याची वहावा केली तशीच प्रत्येक दारूबाजाचीच नव्हे तर कुजक्या व्यसनांनीं कुजलेल्या ह्या देशांतील व्यसनांच्या घाणींत वळवळणाऱ्या प्रत्येक मानवी कृमिकीटकाची अशीच पाठ थोपटली पाहिजे, व हीच जर सत्कीर्ति असेल तर तिचें शिखर आपण केव्हांच गांठलें आहे ! पण ही अंबारींत बसविणारी सत्कीर्ति नसून ' उलटी अंबारी ' हातांत देणारी दुष्कीर्ति आहे एवढीच काय ती खेदाची गोष्ट आहे ! असो.

तर मग मुलांनो, ह्या अंतरंगाचा म्हणजे मन, मेंदू व आत्मा ह्यांचा महिमा ज्यास्त असल्यामुळें, व ह्या तिन्ही गोष्टी सांप्रत कुजलेल्या असल्यामुळें त्या शुद्ध कशा होतील व त्यांत उच्च विचाराचें व स्वदेशभक्तीचें, स्वधर्मप्रीतीचें, स्वसमाजसेवेचें वारें कसें खेळूं लागेल, व त्या शुद्ध हवेच्या झोतानें दशदिशा निर्मळ कशा होतील, ह्याच्याच विचारास आपण प्रथम लागलें पाहिजे ! अंतरंगाची अशी उन्नती आपण साधली कीं, त्याबरोबरच बहिरंगाची उन्नति होत जाते, त्यासाठीं वेगळे परिश्रम करावे लागतच नाहींत ! पण ह्याच्या उलट मात्र स्थिती नाहीं हें विसरून चालणार नाहीं ! पुष्कळांना या गोष्टीचा विसर पडलेला असतो ! पण तो अर्थात् चुकीचा आहे ! बाह्य उन्नति दिसली म्हणजे अंतरंगाची उन्नति झाली असेलच असें निखालस केव्हांही म्हणतां येणार नाहीं ! रामचंद्र व रावण, पांडव व कौरव, शिवाजी व संभाजी, ह्या जोडया

घ्या ! दोघांनींही राज्यवैभव भोगलें. म्हणून पहिल्याचा थोरपणा दुसऱ्यांत होता काय ? मुलांनो, ही गोष्ट समजायला मी एक अगदीं साधें उदाहरण घेऊन सांगतों. समजा तुमच्या पुढें एक काठी पडली आहे व तिच्यावर एक फडकें आच्छादन घातलेलें आहे ! आतां आंतली काठी जर वर उचलली–उंच केली तर तिच्याबरोबर बाहेरचें फडकेंही उचलले जाईलच; पण तें फडकें जर आपण वर उचललें तर काठी त्याबरोबर येईलच असा मार्ग नाहीं. नुसत्या चिमटींत धरून फडकेंच तेवढें वर उचलून धरणें शक्य आहे ! पण ती चिमटी सुटली कीं, तें फडकें जसें पटकन् खालीं–पडतें त्याचा अधःपात होतो–तीच गोष्ट बाह्यांगाच्या कृत्रिम उन्नतीची आहे ! रोमन लोकांच्या पश्चात् ब्रिटिशलोकांची कशी केविलवाणी स्थिति झाली तें इंग्लंडचा इतिहास आपणांस सांगतच आहे ! अर्थात् कृत्रिम सौख्य हें सौख्यच नव्हे तर ती भावी दुःखाची तयारी आहे असें निखालस समजावें. म्हणून " स्वराज्य हें द्यायचें नसून घ्यायचें असतें " असें जें कित्येक समंजस इंग्रजही म्हणतात तें यासाठींच ! असो.

तेव्हां एकंदरींत, आपणांस आपल्या देशाच्या उन्नतीसाठीं वरीलप्रमाणें झटावें लागणार आहे ! पण आधीं आत्मोन्नती करून घेतल्यावांचून दुसऱ्याची उन्नती आपणांस कशी करतां येईल ? स्वसंरक्षणाची सुद्धां ज्या काडीपैलवानाचे अंगांत ताकद नाहीं, तो एखाद्या अबलेच्या संरक्षणासाठीं कितपत धांव घेणार तें दिसतेंच आहे ! यासाठीं आधीं आपली स्वतःची उन्नती आपण साधली पाहिजे, आपण स्वतः कार्य करून दाखविलें पाहिजे, तरच आपल्या शब्दाला किंमत येणार आहे ! "**करुनिया दावी । त्याचे पाय माझे जिवीं ॥**" किंवा " **बोले तैसा चाले । त्याचा वंदावी पाउलें ॥**" हीं तुकारामाची वचनें प्रसिद्धच आहेत. रामदासही म्हणतातः—

" **बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करोनि बोलणें ।**

**तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥१॥**

व यासाठींच "**सदा बोलण्यासारिखें चाल बापा !**" अशा तऱ्हेचा गोड व प्रेमळ उपदेश ते आपल्या मनाला "**मनाच्या श्लोकांत**" करीत आहेत असो.

तर याप्रमाणें प्रथम—अगदीं प्रथम आत्मोन्नति करायचें हें ठरलें! व त्यासाठीं एकाच वेळीं तुमचें मनगट, मन, व मेंदू अथवा शरीर, मन, व बुद्धि यांचा विकास साधला पाहिजे, म्हणजेच सर्वांगीण शिक्षण तुम्हांस मिळालें पाहिजे, तुम्ही मिळविलें पाहिजे. आतां ह्या गोष्टी एकाच काळीं साधावयाच्या असल्या तरी, त्या एकदमच सर्व लिहिता येत नाहींत. यासाठीं त्या प्रत्येकीवर ओळीनें थोडथोडें लिहितों. कारण जास्त लिहूं लागल्यास ग्रंथविस्तार फार होईल, व तुम्हांलाही तें समजण्यास कठीण जाईल. शिवाय उरलेंसुरलें सांगयला तुमच्या तारुण्यांत माझा "तरुणांचा तांडेल" सदैव तयार आहेच. असो. तर ऐका आतां !:—

प्रथम शरीराची गोष्ट घेऊं. मुलांनो, 'धर्माचें मूळ साधन म्हणजे आपलें शरीर होय' असें एका संस्कृत कवीचें म्हणणें आहे व "परमेश्वराची प्राप्ती सुद्धा बलवान् म्हणजे काटक व कंटक अशा शरिराच्या इसमासच होतें" असें उपनिषद नामक आपल्या प्राचीन ग्रंथांतून सांगितलें आहे तें किती खरें आहे बरें ? पहा, कीं साध्या व्यवहारांत, ह्या जगातल्या आयुष्याचे 'धकाधकीच्या मामल्यां'त "बळी तो कान पिळी आणि दुबळा तो अश्रु गाळी" असाच देखावा आपणांस पुष्कळदां अगदी चालू शांततेच्या राज्यांत सुद्धां दिसत नाहीं काय ? मुसलमानांचे अत्याचार आणि हिंदूंचा पळपुटेपणा आपणांस काय सांगतो बरें ? देवालयें उध्वस्त होत आहेत, देवाच्या मिरवणुकीवर हल्ले चढविले जात आहेत, व स्त्रियांची अब्रु अगदीं दिवसाढवळ्या राजरोसपणें घेतली जात आहे, इतका चीड आणणारा देखावा असूनही शेपुट घालून

पळणारी जागोजागची हिंदुजनता पाहिली, म्हणजे " हें आर्यसंतान कां क्लीबाची वाण ? " असा प्रश्न चक्क डोळ्यापुढें उभा राहतो. ह्यावरून ह्यांची शरीरेंच केवळ दुबळी नसून त्यांत वास करणारीं मनें सुद्धा कुजलेलीं आहेत, असेंच म्हणणें भाग पडतें; आणि त्याचें कारण अगदीं उघड आहे. ज्याप्रमाणें खऱ्या शारीरिक शिक्षणाचा बहुतेक सर्वत्र खडखडाटच आहे त्याचप्रमाणें खऱ्या मानसिक शिक्षणाचाही त्याहूनही अधिक खडखडाटच ह्या देशांतील हिंदु जनतेंत दिसून येतो. आणि ह्या दोन्ही गोष्टींचा—शरीरमनाचा—संबंध तर अत्यंत निकटचा पडल्यामुळें समाजाचा गाडा असा जागोजाग कोसळून पडत आहे! मुलांनो, शरीर-मनाचा संबंध फार निकट आहे ! एकाचा परिणाम दुसऱ्यावर तात्काळ होतो ! " शरीर जर धष्ट, पुष्ट, व बलवान् असेल तर मनही दणदणीत असते " ( A sound mind in a sound body ) अशा तऱ्हेचें जें वचन आहे, तें तरी हाच अभेद्य संबंध दाखवीत आहे ! यासाठीं जागो-जाग बजरंगबलीच्या आखाडयांतून मुलांनो, तुम्हीं आपलीं शरीरें प्रथम नीट कमवा ! कारण शरीर जर उत्तम व निरोगी असेल तर सर्व सुख अंगीं लागतें—उपभोगिता येतें. नुसती द्रव्याची रास शरीराला सुख देऊं शकत नाहीं ! द्रव्यानें पैदा केलेलीं सुखाचीं साधनें भोगण्यास जर शरीर जाग्यावर नसेल—तें जर सदा रोगी व दुबळें असेल तर त्या सुखाचा काय उपयोग ? यावरून " शरीरसंपत्ती हीच खरी संपत्ति होय " ( Health is wealth ) असें जें म्हणतात, तें किती खरें आहे बरें ? मुलांनो, ह्याच संपत्तीच्या जोरावर शेतातला शेतकरी, रानातला गुराखी, दऱ्याखोऱ्यांतून मेंढरें चारणारा मेंढपाळ, ओल्याकोरडया मीठ भाकरीवर सुखी असून आपल्या नितांत सुखाची दर्शकच कीं काय अशी श्रुतिमनोहर गानलकेर अथवा पाव्याचे सूर आकाशाच्या नोलो-दरांत सोडून देत असतो, तर पंचपक्वान्नांचे सेवन करूनही राजवाडया-सारख्या भव्य प्रासादांत लोळणारा अभागी जीव, केवळ ह्याच शरीर-

संपदेच्या अभावीं, दुःख आणि कष्ट भोगीत असतो ! त्या शेतकऱ्याची, गुराख्याची, व मेंढपाळाची काळी कांबळी व काळी काठी काळाशींही झगडण्यास समर्थ असते, तर राजवाडयांतील जनानी सरदाराच्या दुलयांतून सुद्धा काळाची हुडहुडी त्यास भरत असते, व त्याची भिंतीवरची तरवार त्याच भिंतीवर काढलेल्या चित्रातल्या तरवारीप्रमाणें भिंतीवरच राहते !! अरेरे, किती हें शोचनीय दृश्य ! मुलांनो, हीं दोन्ही चित्रें तुम्ही पाहिलीत ना ! मग सांगा पाहूं तुम्हांला त्यांतलें कोणचें पसंत पडतें तें ? अर्थात् तुम्हांस निसर्गाच्या मांडिवर खेळणाऱ्या त्या शेतकऱ्याचें, गुराख्याचें, व मेंढपाळाचें चित्रच निःसंशय आवडलेलें असणार हें उघड आहे ! पण नुसतें आवडून काय उपयोग ? त्यांच्याप्रमाणें ज्या वेळीं तुम्हीं मनमुराद शुद्ध हवेचा उपभोग घ्याल, निर्मल आणि शीतल जलपान कराल, अन्नही साधेंच पण ताजें आणि रुचकर खाल, व मुबलक व्यायाम कराल, तेंव्हांच तुमचें शरीर उत्तम बनेल, व तुम्हांस तुमच्या चालू व भावी आयुष्यांत सर्व सुखें चांगल्या तऱ्हेनें भोगतां येतील ! मग लागा पाहूं त्याप्रमाणें तयारीला !

त्यानंतरची गोष्ट तुमच्या मनाची घेऊं ! मुलांनो, मन आणि मेंदू अथवा बुद्धि ह्यांची योग्यता शरीराच्या शतपटीनें जास्त आहे, हें तुह्मी कधींही विसरूं नका. त्याच्यावाचूनचें शरीर ह्मणजे नुसता मातीचा गोळा अथवा मढें म्हटलें तरी चालेल, अशी स्थिती आहे. अर्थात् या 'मातीच्या गोळयाची' हालचाल करविणारें, त्याला करपुतळीतल्या खेळाप्रमाणें नाचविणारें, हसविणारें, अथवा उन्मार्गगामी करणारें सूत्रधार म्हणजे आपलें मन व मेंदू अथवा बुद्धीच होय ! त्यांतल्या त्यांत शास्त्रीय भाषेंत व अनुभवाच्या बोलांत बोलायाचें तर "मनापेक्षां बुद्धी पलीकडली" ह्मणजे वरच्या दर्जाची व थोर आहे असा भगवंतांचा अभिप्राय आहे. पण एकाच मनाचे जसे चांगले व वाईट असे दोन प्रकार–दोन अंगें संभवतात, त्याचप्रमाणें एकाच बुद्धीचे सुबुद्धि

आणि कुबुद्धि असेंही दोन प्रकार संभवू शकतात, हें विसरून चालणार नाहीं, एकाच समुद्रांत जसें शंख आणि मोतीं वास करतात, तसें एकाच मनांत सद्विचार आणि असद्विचार, सद्भावना आणि असद्भावना वास करीत असतात ! किंबहुना, मनाला 'पयोनिधी'ची ह्मणजे सागराची उपमा प्रसिद्ध आहे त्याचें तरी कारण हेंच ! बुद्धिच्या बाबतींत पाहिलें तरी असाच प्रकार दृष्टीस पडतो. एकाच तरवारीनें ज्या प्रमाणें अनाथ अबलांचे व गरीब जीवांचे रक्षण करतां येतें व त्यांचाच कंठनालही हकनाक चिरता येतो, एकाच अग्नीनें ज्याप्रमाणें स्वतांची चूल पेटवितां येतें व दुसऱ्याचीं घरेंही जाळतां येतात तीच गोष्ट ह्या बुद्धीची आहे ! ती एक दुधारी तरवार अथवा प्रसुप्त अग्नि आहे ! शिक्षणानें त्या तरवारीला उत्तम प्रकारची धार लावतां येतें, तिच्यावरचा गंज झाडून काढून व उडवून देऊन अलोट तेजाचें तळपतें पाणी तिच्यावर खेळवितां येतें; पण अशा तऱ्हेनें तयार झालेल्या त्या तरवारीची फेक गोमातेच्या ब्राह्मणांच्या, व अनाथ अबलांच्या रक्षणासांठीं जशी होते, तशीच "नारायणराव पेशव्या" सारख्या कोवळ्या पोराच्या पोटांत शिरून आपणास धारण करणाऱ्या माणसाचें मन माणुसकीला कसें मुकलेलें आहे, ह्याचेंही चित्र तीच तरवार दाखवतें ! अग्नीवरची सांचलेली राख उडवून देऊन त्याच्या ज्वाळा प्रज्वलित करण्याचें कार्य शिक्षण करील; पण याप्रमाणें फुललेल्या अग्नीची फेक दुसऱ्याच्या घरादारांवर करून त्याची राखरांगोळी करायचीच, कां त्याच अग्नीनें घरची चूल पेटवून स्वतःची क्षुधा शांत करायची हें ज्याचें त्यानें ठरवायचें असतें. एकंदरीत काय कीं बुद्धी हा पदार्थ स्वतः एका दृष्टीनें निर्जीव असून त्याला तरवार अगर अग्नीप्रमाणें जसा वापरावा—वागवावा तसा तो आपल्या उपयोगी पडणार आहे. त्याला स्वतःला त्याचें सुखदुःख नाहीं तो त्याकामीं आंधळा आहे. आणि ह्मणूनच त्याबुद्धीच्याहा पलीकडे आत्मा ह्मणून एक जो कांहीं परमेश्वराचा अंश आहे, त्याची थोरवी सर्वांत

जास्त आहे ! त्यासंबधीं मी तुह्माला लवकरच चार शब्द सांगणार आहे. पण त्या आधीं मला हेंच सांगायचें आहे कीं, तो ' आत्मा' जर आपण क्षणभर बाजूस ठेवला, अथवा मुळींच धरला नाहीं तर मात्र मग हें मन आणि बुद्धि हींच प्रभावशाली यंत्रें ठरतात, व हजारो नव्हे, लाखो लोकांचे व्यहार आज ह्या मनोबुद्धीच्या जोरावरच चाललेलें असल्यामुळें त्याचाच फायदा घेऊन त्या मनाला ( व बुद्धीलाच ) आजवरचे साधुसंत, लेखक व कवि अत्यंत गोड असा उपदेश करीत आले आहेत, त्याचें तरी कारण हेंच, " पण आपल्याला आपलें मन आवरता येते; आपली बुद्धी ताब्यावर ठेवता येते ही भाषाही लोकांना कळत असल्यामुळें उपदेशाचें काम येथें बरोबर भागतें, व सामान्य व्यवहारांतल्या नीतींतही त्यांतल्या त्यांत उपदेश करणाऱ्या थोर मनाच्या पुरुषाच्या तोंडून अशीच भाषा बाहेर पडते. साधुसंत, कवि, व लेखक, त्याच भाषेची तार अधिक चढवून आपल्या उच्च आलापांनीं सर्व जगाला झुलवीत--खुलवीत--व भुलवीत असतात व हळुहळू उच्च मार्गास लावीत असतात इतकेंच ! मुलांनो, तशाच तऱ्हेचा थोडाबहुत प्रयत्न माझ्या अल्पमतीप्रमाणें व अल्प अधिकाराप्रमाणें मीं तुमच्यासाठीं आतां करणार आहे ! तरी ' सावधान ' !

मुलांनो, प्रथमतः ही गोष्ट आपल्या मनावर अगदीं पक्की ठसूं द्या कीं, आपली प्रत्येक हालचाल, प्रत्येक कृती, प्रत्येक शब्द, किंबहुना, आपल्या पंच कर्मेंद्रियांच्या प्रपंचाचा प्रत्येक विचार, त्याची वृत्ति, प्रथम मनांत उठते व मगच ती वरील मार्गानें बाहेर पडते ! ज्याप्रमाणें जमिनींत पेरलेलें बीजच वृक्षाच्या रूपानें बहरत असतें. तीच गोष्ट इथें आहे, कोणचें बीज जमिनींत पेरायचें हें जसें त्या माळ्याच्या आधीन आहे, त्याप्रमाणें आपल्या मनोभूमींत कोणचीं बिजें रुजवून घ्यायचीं, व आपल्या आयुष्याच्या उद्यानांत ' विषवृक्षाचे मळे ' लावायचे सुधातरूंची आमराई डोलवायची, हें ठरविणारे आपले आपणच आहोंत ! यासाठीं

आपल्या आयुष्याचे बागवान मुख्यतः आपले आपण आहोंत हें न विसरतां, मुलांनो, ती बागाईत अशी बहारदार करा, कीं त्यांतील हापूस पायरींच आंबे, तशींच मधुरतम द्राक्षें व गोड गोड थंडगार अंजीर खाऊन हजारों तळमळणाऱ्या जीवांच्या यातना दूर व्हाव्यात, व त्यांना खरी-खुरी सुखशांति लाभावी ! पण हें सर्व होण्यास प्रथम तुम्हांला आपली मनोभूमी उत्तम बनवून, म्हणजे त्यांतील कांटेकुटे व केरकचरा काढून टाकून, मग त्यांत वरील फळफळावळींचे ताटवे व बीजें लावून, त्यांची चांगल्या तऱ्हेनें जोपासना केली पाहिजे, तरच वरील प्रकारची बहार दृष्टीस पडणार आहे ! मुलांनो, सदर बीजें व ताटवें लावणें अथवा लावुन घेणें, एवढेंच तुमचें तूर्त कार्य आहे. तुमच्या हल्लींच्या बाल-वयांत ही गोष्ट करणें मोठीशी कठीण नाहीं. फक्त आळस झाडून आपल्या मातापितरांचा व आपल्या गुरूंचा उपदेश व बहुमूल्य ग्रंथोत्तमांचा सल्ला तुम्ही ऐकला व मानला पाहीजे, व आयुष्य म्हणजे निव्वळ खेळणें, बागडणें, व हुदडणें नव्हे, हें तुम्हीं लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण, आपल्या वागणुकीच्या वारूला आतापासूनच हळूं हळूं पायबंद घालायला सुरवात केली नाहीं तर, तो चौखुर उधळून कुठे भडकेल व वरच्या स्वाराला खालीं पाडून त्याची कशी धुळधाण उडवील हें कोणी सांगावें ? मुलांनो, " अमुक अमुक मुलगा वाईट मार्गाला लागला, चोऱ्या करूं लागला, " वगैरे गोष्टी तुमच्या चालू बाळपणांत-सुद्धां तुमच्या कानीं आल्या असतील. पण त्याचा कधीं तुम्हीं विचार केला आहे काय ? कीं असें कां व्हावें व आपण त्यापासून बोध घेऊन कसें वागायला हवें ? मला ठाऊक आहे कीं, तुमच्यापैकीं बहुतेक मुलें अशा तऱ्हेची एखादी गोष्ट कानीं आली कीं, लगेच नाकें मुरडतात व तो अमक्या अमक्याच्या संगतीला लागला म्हणून असें झालें " असें म्हणतात ! मुलांनो, ही टीका अगदीं योग्य, यथार्थ, व बरोबर आहे. व तो मुलगा तसा कां निघाला याचीही जास्त मीमांसा मी करीत बसत

नाहीं. पण, एकवेळ बाहेरचा शत्रू व बाहेरची कुसंगत पुरवली, कारण ती मनांत आणल्यास वाटेल तेव्हां ताडकन् तोडता येते. पण आपल्या अंतःकरणांतले शत्रू व आंतली कुसंगत मात्र फार भयंकर आणि फार वाईट आहे. कारण मनांत आणूनही ती तुटता तुटत नाहीं—त्यासाठीं फार श्रमसायास करावे लागतात. आणि वरील नाकें मुरडणाऱ्या बहुतेक मुलांच्या अंतःकरणांत राग, लोभ, मद, मत्सर, आळस, अज्ञान, द्वेष, अप्पलपोटेपणा, बेफिकीरी, व चैनबाजी यांची बीजें गुप्तरूपानें वसत असतात, व त्यांचाच प्रचंड वृक्ष बनून समाजाला भारभूत अशी अवलाद पुढें निर्माण होत असते हें विसरून कसें चालेल ? अर्थात् मी हें सामान्य व्यावहारिक जीवनासाठीं लिहीत नाहीं आहे. सामान्यप्रतीचें आयुष्य नेण्याचा उपदेश करण्यास फारशीं पुस्तकें लागत नसतात. आयुष्याला कांहीं तरी उदात्तता यावी, विशेष रंगारूपानें तें खुलावें—नटावें यासाठींच बहुतेक ग्रंथांची निष्पत्ति झाली आहे. व अशाच उदात्त आयुष्याची व कार्यकर्त्या रंगारूपाची भावी पिढी निर्माण व्हावी म्हणूनच ह्याही ग्रंथाचें लिखाण सुरू आहे. तेव्हां मुलांनो, या दृष्टीनें मला सांगा कीं, वरील प्रकारच्या आपल्या अंतरंगींच्या शत्रूंची जाणीव तुमच्यापैकीं कितीकांना आहे बरें ? व त्यांच्या हातून सोडविण्यासाठीं नामदेवाप्रमाणें तुमच्यापैकीं कितीजण बरें प्रभूला कळवळ्याची हांक मारतात ? ती नामदेवाची हांक मी मुद्दाम खालीं देतों ती वाचा म्हणजे मुलांनो, मी काय म्हणतों त्याची तुम्हांला कल्पना येईल. नामदेव कळवळून म्हणतातः—

“ **मन माझें चोरटें लागलें कुसंगीं । बांधिलें षड्वर्गीं धरोनि त्यातें॥**
**केउता गेलासी माझ्या कृपावंता । येगा पंढरिनाथा मायबापा ॥**
**वासनेची बेडी घालोनि माझे पायीं । विषयवज्रघायीं ताडितोसी ॥**
**कामक्रोध दंभ लाविताती कळा । ये माझ्या गोपाळा सोडवणें ॥**
**नामा म्हणे विठो धावे लवलाही । बुडतों चिंताडोहीं काढी मज ॥** ”

असो.—

तर मुलांनो, सांगण्याचा भाग इतकाच कीं, एकवेळ बाह्य शत्रूंचा पाश तोडवेल पण अंतरंगांत घुसलेले हे चोर बाहेर हुसकून लावणें फार कठीण आहे, व यासाठीं आपणांस 'हुशियार' राहण्यासाठीं एक अधुनिक कवी खालीलप्रमाणें इशारा देत आहे, तो किती यथार्थ आहे बरें ? ऐका तो काय म्हणतो तें:—

**" सुनो सुनोजि मेरे यार । हतियार लेवो जलदी ॥**
**हा औट हाताचा किल्ला । बहु खिडक्या द्वारें याला । रे ।**
**बघ त्यांतुनि शिरले चोर । नच तुला तयांची वर्दी ॥१॥ "इ०**

असो—

तर याप्रमाणें पहातां ही गोष्ट अगदीं उघड उघड सिद्ध झाली कीं, आपल्या शरीराची हालचाल करायला लावणारें आपलें मन असून त्याच्या चांगल्यावाईट प्रेरणेंप्रमाणें शरीराची बरीवाईट हालचाल होत असते. ज्ञानेश्वरांनीं ही गोष्ट आपल्या मधुर दृष्टांतांनीं फार सुंदर रीतीनें पटवुन दिली आहे. त्यांच्या त्या कामीं असणाऱ्या ओंव्याही सोप्या असल्यामुळें मुलांनो, त्या तुमच्यासाठीं मी खालीं देत आहे. त्या वाचा म्हणजे ही गोष्ट तुमच्या मनावर बरोबर ठसेल. दयाशील साधूच्या वागणुकीचें सविस्तर वर्णन केल्यावर ज्ञानोबा म्हणतातः—

**" आतां मन तयाचे । सांगो म्हणो जरी साचे । तरी सांगितले कोणाचे । विलास हे ? ॥ काइ शाखा नव्हे तरु ? । जळेंविण असे सागरू ? । तेज आणि तेजाकारू । आन काई ? । अवयव आणि शरीर । हे वेगळाले काय कीर ? । कीं रसु आणि नीर । सिनानी आथी ? ॥ जें बीज भुईं खोंविलें । तेंचि वरी रुख जाहलें । तैसें इंद्रियद्वारीं फांकलें । अंतरचि कीं ॥ हें बहु असो, पंडितु । धरोनि बाळकाचा हातु । वोळी लिही सुव्यक्तु । आपणचि ॥ तैसें दयालुत्व आपुलें । मनें हातां पायां आणिलें । मग तेथ उपजविलें । अहिंसेंत ॥ आवडे ते वृत्ती किरीटी । आधीं मनौनींचि उठी । मग ते वाचे दिठी**

नाहीं. पण, एकवेळ बाहेरचा शत्रू व बाहेरची कुसंगत पुरवली, कारण ती मनांत आणल्यास वाटेल तेव्हां ताडकन् तोडता येते. पण आपल्या अंतःकरणांतले शत्रू व आंतली कुसंगत मात्र फार भयंकर आणि फार वाईट आहे. कारण मनांत आणूनही ती तुटता तुटत नाहीं—त्यासाठीं फार श्रमसायास करावे लागतात. आणि वरील नाकें मुरडणाऱ्या बहुतेक मुलांच्या अंतःकरणांत राग, लोभ, मद, मत्सर, आळस, अज्ञान, द्वेष, अप्पलपोटे-पणा, बेफिकीरी, व चैनबाजी यांची बीजें गुप्तरूपानें वसत असतात, व त्यांचाच प्रचंड वृक्ष बनून समाजाला भारभूत अशी अवलाद पुढें निर्माण होत असते हें विसरून कसें चालेल ? अर्थात् मी हें सामान्य व्यावहारिक जीवनासाठीं लिहीत नाहीं आहे. सामान्यप्रतीचें आयुष्य नेण्याचा उपदेश करण्यास फारशीं पुस्तकें लागत नसतात. आयुष्याला कांहीं तरी उदात्तता यावी, विशेष रंगारूपानें तें खुलावें—नटावें यासाठींच बहुतेक ग्रंथांची निष्पत्ति झाली आहे. व अशाच उदात्त आयुष्याची व कार्य-कर्त्या रंगारूपाची भावी पिढी निर्माण व्हावी म्हणूनच ह्याही ग्रंथाचें लिखाण सुरू आहे. तेव्हां मुलांनो, या दृष्टीनें मला सांगा कीं, वरील प्रकारच्या आपल्या अंतरंगींच्या शत्रूंची जाणीव तुमच्यापैकीं कितीकांना आहे बरें ? व त्यांच्या हांतून सोडविण्यासाठीं नामदेवाप्रमाणें तुमच्यापैकीं कितीजण बरें प्रभूला कळवळ्याची हांक मारतात ? ती नामदेवाची हांक मी मुद्दाम खालीं देतों ती वाचा म्हणजे मुलांनो, मी काय म्हणतों त्याची तुम्हांला कल्पना येईल. नामदेव कळवळून म्हणतातः—

**" मन माझें चोरटें लागलें कुसंगीं । बांधिलें षड्वर्गीं धरोनि त्यातें ॥**
**केउता गेलासी माझ्या कृपावंता । येगा पंढरिनाथा मायबापा ॥**
**वासनेची बेडी घालोनि माझे पायीं । विषयवज्रघायीं ताडितोसी ॥**
**कामक्रोध दंभ लाविताती कळा । ये माझ्या गोपाळा सोडवणें ॥**
**नामा म्हणे विठो धावे लवलाही । बुडतों चिंताडोहीं काढी मज ॥ "**

तर मुलांनो, सांगण्याचा भाग इतकाच कीं, एकवेळ बाह्य शत्रूचा पाश तोडवेल पण अंतरंगांत घुसलेले हे चोर बाहेर हुसकून लावणें फार कठीण आहे, व यासाठीं आपणांस 'हुशियार' राहण्यासाठीं एक अधुनिक कवी खालीलप्रमाणें इशारा देत आहे, तो किती यथार्थ आहे बरें? ऐका तो काय म्हणतो तें:—

**" सुनो सुनोजि मेरे यार । हतियार लेवो जलदी ॥**
**हा औट हाताचा किल्ला । बहु खिडक्या द्वारें याला । रे ।**
**बघ त्यांतुनि शिरले चोर । नच तुला तयांची वर्दी ॥१॥ "इ०**

असो—

तर याप्रमाणें पहातां ही गोष्ट अगदीं उघड उघड सिद्ध झाली कीं, आपल्या शरीराची हालचाल करायला लावणारें आपलें मन असून त्याच्या चांगल्यावाईट प्रेरणेंप्रमाणें शरीराची बरीवाईट हालचाल होत असते. ज्ञानेश्वरांनीं ही गोष्ट आपल्या मधुर दृष्टांतांनीं फार सुंदर रीतीनें पटवुन दिली आहे. त्यांच्या त्या कामीं असणाऱ्या ओंव्याही सोप्या असल्यामुळें मुलांनो, त्या तुमच्यासाठीं मी खालीं देत आहे. त्या वाचा म्हणजे ही गोष्ट तुमच्या मनावर बरोबर ठसेल. दयाशील साधूच्या वागणुकीचें सविस्तर वर्णन केल्यावर ज्ञानोबा म्हणतातः—

**" आतां मन तयाचे । सांगो म्हणो जरी साचे । तरी सांगितले कोणाचे । विलास हे ? ॥ काई शाखा नव्हे तरु ? । जळेंविण असे सागरू ? । तेज आणि तेजाकारू । आन काई ? । अवयव आणि शरीर । हे वेगळाले काय कीर ? । कीं रसु आणि नीर । सिनानी आथी ? ॥ जें बीज भुईं खोंविलें । तेंचि वरी रुख जाहलें । तैसें इंद्रियद्वारीं फांकलें । अंतरचि कीं ॥ हें बहु असो, पंडितु । धरोनि बाळकाचा हातु । वोळी लिही सुव्यक्तु । आपणचि ॥ तैसें दयालुत्व आपुलें । मनें हातां पायां आणिलें । मग तेथ उपजविलें । अहिंसेंत॥ आवडे ते वृत्ती किरीटी । आधीं मनौनीचि उठी । मग ते वाचे दिठी**

**करासि ये ॥ म्हणोनि हे जे सर्व । सांगितले बाह्य भाव । तें मनचि गा सावयव । ऐसें जाणें ॥ "**

मुलांनो, वरील ज्ञानेश्वरांचा उतारा किती बोधप्रद आहे बरें ? त्यावरून नुसतें 'दयालुत्व'च नव्हेतर उद्योगीपणा, सत्यवक्तेपणा, धैर्य, शौर्य, साहस, इत्यादि कोणचीही चांगली, अथवा दुष्टपणा, भ्याडपणा, खोटेपणा, इत्यादि कोणाचीही वाईट ' वृत्ति ' ही प्रथम मनांतच उत्पन्न होते, व तिचेच सुष्टदुष्ट ' विलास ' म्हणजे चांगलेवाईट परिणाम, जगांत दृष्टीस पडून आपणांस जगानें ' वंदावें का निंदावें ' हें जग ठरवीत असतें. अर्थात् जगानें आपणांस ' वंदावें '—' **जगीं मरून उरवावें । कीर्तिरूपें ॥**—' अशी इच्छा असेल--' **जे सत्कीर्तिचे पुरुष । तेचि परमेश्वराचे अंश ॥**' याप्रमाणें ' नराचे नारायण ' व्हावयाचें असेल तर—तर—तर काय ? मुलांनो अशी इच्छा असेल तर आतां पासूनच सद्गुणांच्या भट्टींत आपल्या मनाला घालून त्याचें ' सुमन ' ( म्हणजे सोनें; पक्षीं चांगलें मन ) कसें बनेल हें पाहून त्याची वैजयंति माळ ' जनीं जनार्दन ' अशा प्रभूच्या गळ्यांत घातली पाहिजे. आपल्या मनाचे ' सुमन ' ( म्हणजे पुष्प ; पक्षीं चांगलें मन ) करून त्या सुमनाचा मनोहर गुच्छ ईशपादपंकजीं वाहिला पाहिजे तरच हें कार्य होणार आहे ! व त्यावरून हीही गोष्ट मग उघडच होते कीं, आपल्या उपदेशाचा सर्व मारा आपण आपल्या मनावरच करावयाला हवा ! कारण ' मनच मनुष्याचा उद्धार करतें ' हें विसरून चालणार नाहीं. मनानें मनांत आणल्यास,—मनावर घेतल्यास—तें आपणास थेट परमेश्वराच्या पायांपर्यंत नेऊन सोडतें, ही गोष्ट दृष्टिआड करण्यांत काय फायदा किंवा काय हशील ? यासाठीं अशा प्रकारच्या आपल्या ह्या थोर मनाला—आणि खरोखरच तें एका अर्थानें थोर नव्हें काय ?—चुचकारून चुचकारून व गोड बोलून, चांगल्या मार्गावर लावलें पाहिजे. घोड्याला जसें चुचकारून, व थापटून त्यावर मांड टाकावी लागते व

तो एकदां कबजांत आल्यावर मग जसें त्याला मौजेनें आणि लीलेनें रिंगणावर फिरवता येते, त्याप्रमाणेंच ह्या मनोरूपी वारूची, म्हणजे वाऱ्याप्रमाणें धांवणाऱ्या घोडयाची गोष्ट आहे! एकंदरींत, 'वाऱ्याची मोट बांधण्याचें'च हें काम आहे! पण अशींच कठिणकामें केल्याशिवाय व लोखंडाचे चणे खाल्ल्याशिवाय कां कुठे कीर्तिच्या 'ब्रह्मपदीं नाचायला' मिळत असते? मग मुलांनो, डरून कसें चालेल? यासाठीं 'मनोबोधा'चा मारा ह्या मनावर करून म्हणजे 'मनाच्या श्लोकांचें' वाचन व मनन सतत ठेवून व 'श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरून' कार्याला लागा, यांपेक्षां अधिक काय सांगूं?

सत्कीर्तिच्या सिंहासनावर बसण्यासाठीं निघालेल्या बालवीरांनो, आतां तुम्हांला मी दररोजच्या वागणुकीचा उदात्त व सुंदर कार्यक्रम सांगणार आहे व मन लावून तुम्हीं तो आचरणांत आणण्याचा निश्चय केलात, तर त्यांत कठीण कांहींच नाहीं. उलट तो सात्विक सौख्यानें फुललेलाच आहे असेंच तुम्हांस दिसून येईल! मात्र, वर सांगितलेल्या अज्ञान आलस्यादि दुर्गुणांचें 'सौख्य' त्यांत नाहीं व तें मिळणेंही शक्य नाहीं. "**कीर्ति पाहतां सुख नाहीं। सुख पाहतां कीर्ति नाहीं।**" असा समर्थांचा याच अर्थानें सिद्धान्त आहे. आणि तुम्हीं जर खरें विद्यार्थी असाल तर असल्या क्षुद्र व आत्मघातकी सुखावर लाथच माराल! कारण—"**सुखार्थी त्यजते विद्यां विद्यार्थी त्यजते सुखम्। सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम्॥**" असें वचनच आहे. मुलांनो, अज्ञानालस्यादिकांचे 'सौख्य' खरोखरच आत्मघातकी आहे. प्रथम गोड पण अंतीं कडू असें तें सौख्य आहे. वरवर गोड लागणारें पण आंत आत्मनाशाचीं विषबीजें असलेलें असें तें सौख्य आहे. सोमल नावाचें एक विष आहे. तें साखरेसारखेंच पांढरें व लागायला गोड असतें. पण ह्या त्याच्या बाह्य रंगावर व रुचीवर जाऊन जर तुम्हीं तें जिभेवर ठेविलें—गट्ट केलें—त्याचें सेवन

केलें. तर परिणाम काय होईल, तें सांगितलेंच पाहिजे काय? तोच मृत्यु—तेंच सत्कीर्तिचें मरण वरील अज्ञानालस्यादि राजस व तामस सुखाचा सोमल खाऊन ओढवत असतें, हें विसरून चालणार नाहीं, तरी खावें, कांहीं तरी प्यावें, व कांहीं तरी ल्यावें, असेंच 'श्वानसूकरा' प्रमाणें जीवन न्यायचें असेल, तर वरील प्रकारच्या खोट्या सुखाचीं आमिषें तुम्हीं खुशाल गट्ट करा. पण खरे श्रीहरींचे दास म्हणजेच सत्कीर्तिचे पुरुष बनावयाचे असेल तर '**झिजल्यावांचून कीर्ति कैची । मान्यता नव्हे कीं फुकाची ।**' व '**जववरी चंदन झिजेना । तंववरी सुगंध कळेना ।**' व म्हणूनच "**मना चंदनाचे परी त्वां झिजावें ।**" असें जें समर्थ सांगतात तें आपल्या हृदयावर कोरून ठेवा! कारण मुलांनो, अगदीं तुमच्या सारख्या मुलांचेंच उदाहरण तुम्हांला त्या कामीं सांगायचें तर, पांच वर्षांचा ध्रुव बाळ पहा, किंवा सात वर्षांचा चिलया बघा, किंवा ८।१० वर्षांच्या भक्त प्रल्हादाकडे आपली नजर फिरवा; आणि त्यांना कीर्तिच्या अढळपदीं बसण्यास किती कष्ट पडले ते अवलोकन करा, म्हणजे तुमचे कष्ट त्यांपुढें कांहींच नाहींत, असेंच तुम्हांस दिसून येईल! आणि असें असतांही तुम्हीं एवढ्या थोड्याशा क्षुद्रा व त्याही खोट्या सुखाच्या स्वार्थत्यागाला तयार होऊं नये ही तुमच्या विद्यार्थीपणाला किती शरमेची आणि किती लाजिरवाणी गोष्ट आहे बरें? यासाठीं:—

**" आधीं कष्टाचे दुःख सोशिती । ते पुढें सुखाचे फळ भोगिती ।**
**आधीं आळसें सुखावती । त्यासि पुढें दुःख ॥**
**जिहीं उदंड कष्ट केलें । ते भाग्य भोगून ठेले ।**
**येर ते बोलताचि राहिले । करंटे जन ॥ "**

हा समर्थांचा दिव्य उपदेश आपल्या डोळ्यापुढें अहर्निश ठेऊन कष्टाला कंटाळूं नका—भाग्याचे भगवान बनायचे असेल तर उद्योगाला विसरूं नका, व शरीरसुखाला भुलूं नका यापेक्षां अधिक काय सांगूं? याप्रमाणें निश्चय केलात म्हणजे मी पुढें सांगणारे एक एक कलम तुमच्या हिता-

चेच कसे आहे तें तुम्हांस कळून येईल ! ऐका तर आताः—

पहिली—अगदीं पहिली गोष्ट म्हणजे प्रातःकालीं उठण्याची. प्रातःकालची वेळ ही सात्विक वेळ आहे--रामपाहऱ्याची वेळ आहे ! यावेळीं उठून, शौचमुखमार्जन करून, व देवाला व आईबापांना वंदन करून व देवाची एखादी भूपाळी म्हणून अभ्यासाला बसलेल्या मुलाचा अभ्यास तर चांगला होईलच, पण त्याच्या शीलसंवर्धनाला व शारीरिक सुधारणेला पण त्यानें मदतच होणार आहे ! याप्रमाणें पहाटच्या वेळीं तास दीड तास अभ्यास केल्यावर सूर्योदयाच्या सुमारास स्नानसंध्या, नमस्कार व देवपूजा इत्यादि धार्मिक कृत्यें केल्यानें तुमच्या देहावर, मनावर, व बुद्धीवर कितीतरी उज्ज्वल कांति चमकत राहील. त्यांतच त्यानंतर विलायती चहाचा घोट पोटांत न घेतां--न घालतां दुग्धामृताचा प्याला जर तुम्हीं ओठांला लावलांत, तर त्या कांतींत भरच पडणार आहे. त्यानंतर घरचें-भंडई वगैरेचें कांहीं किरकोळ काम असल्यास तें करून तुम्हीं पुन्हां तास दीड तास अभ्यास करा व भोजनसमयीं देवाला नैवेद्य दाखवून मग भोजन करून शाळेंत वेळेवर जा. शाळेंत जातांना आपलें दप्तर नीट व्यवस्थित भरून घेण्यास विसरूं नका. प्रत्येक तासाचें पुस्तक व वही तसेंच पेन्सिल, टांक, चाकू, टिपकागद, दऊत, फूटपट्टी इत्यादि आपणांस लागणारें सर्व सामान घेऊन जावें. शाळेंत गेल्यावर शाळेच्या नियमाप्रमाणें वागावें. मुलांशीं हंसून खेळून राहावें, पण मारामाऱ्या व भांडणतंटे आणि शिवीगाळ करूं नये. शाळेच्या विविध उत्सवांत व संमेलनांत उत्साहानें भाग घ्यावा. तेथील वादविवादकसभेंत धीटपणानें हुशारीनें व मुद्देसूद भाषण करून आपल्या म्हणण्याची छाप दुसऱ्यावर पाडण्याची वक्तृत्वकला शिकावी. तसेंच शाळेच्या मासिकांतून विविध तऱ्हेचे लेख लिहून, लेखनकलेचाही अभ्यास करून, ती साध्य करून घ्यावी. अभ्यासाप्रमाणेंच त्या कामींही आपले गुरुवर्य आपणांस सहाय करण्यास सदैव तत्पर असतात हें विसरूं नये, व चिकाटीनें त्यांच्या मार्गों

लागून आपल्या भावी आयुष्याच्या तयारीचा पाया आतांपासूनच वरील-प्रमाणें व खालीलप्रमाणें भरभक्कम घालून घ्यावा. याप्रमाणें शाळा सुटल्यावर साहजिकच मुलांना आनंद होतो, कारण त्यांना अत्यंत प्रिय जो खेळ व उडया मारणें, त्यासाठीं तीं मोकळीं होतात. असो. त्यानंतर घरीं जाऊन थोडेसें खाऊन—चहा पिऊन नाहीं—मग खेळण्यासाठीं शुद्ध हवेच्या मैदानावर जावें व शक्य तर आपल्या एखाद्या शिक्षकाच्या ( Games Teacher च्या ) नेतृत्वाखालीं ते खेळ खेळून, संध्याकाळीं पुढा घेऊन घरीं आल्यावर, हातपाय व तोंड स्वच्छ धुवून संध्या, राम-रक्षादि स्तोत्रें म्हणावीं. व देवाची आरती करून त्यास नैवेद्य दाखवावा. भोजनोत्तर शतपावली करून रात्रीं जरूर तर अभ्यास किंवा एखादें देवाधर्माच्या गोष्टींचें चांगलें पुस्तक अथवा दासबोध, मनाचे श्लोक, यासारखें पुस्तक वाचून, साडेनऊ दहाच्या सुमारास आईबापांच्या व देवाच्या पायां पडून, आपली दिनचर्येची डायरी लिहून, देवाचें नामस्मरण करीत करीत झोपीं जावें! याशिवाय सामान्य स्वरूपाच्या उपदेशांत मला तुम्हांला खालील गोष्टी विशेष सांगावयाच्या आहेत तेव्हां त्याही ऐका:-

पहिली गोष्ट सत्यभाषणाची! प्राण गेला तरी खोटें बोलणार नाहीं व खरें सोडणार नाहीं, असा निश्चय तुम्हीं केला पाहिजे. पण अशा दृढ निश्चयाचें तेज ज्यांच्या वदनावर खेळत आहे असे 'जॉर्ज वॉशिंग्टन' मुलांनो, तुमच्यांत किती बरें असतील? हें सत्य राखण्यासाठींच **रामाला १४** वर्षांचा वनवास स्वीकारावा लागला! **धर्माचें** नांव सत्यभाषणी म्हणून अजूनही दुमदुमत आहे! मुलांनो, '**सत्या परता नाहीं धर्म**।' ही समर्थवाणी विसरूं नका. पण तुम्हा विद्यार्थीसमूहांत पाहिल्यास शिक्षेच्या भयानें असत्य भाषणाची लटपटपंची करणारी किंवा अपराध कबूल न करतां मौन धरणारीं किती तरी मुलें असतात! आपण होऊन पुढें येऊन आपल्या अपराधाची कबूली देण्यास त्या छोटया बालवीर वॉशिंग्टनप्रमाणें क्वचितच कोणी तयार होतो! किती हें शोचनीय दृश्य! ज्याला

अपराधाबद्दलचें शासन सोसवत नाहीं, तो देशासाठीं पुढें काय हाल सोसणार तें दिसतेंच आहे ! शिवाय अपराधाची कबूली व नम्रपणें क्षमायाचन केल्यावर तुम्हाला शिक्षक शिक्षा करणारच नाहींत—केल्यास क्वचितच करतील, हें लक्षांत ठेवा. कारण त्या कबूलींत व क्षमा याचनेंत तुमच्या सुधारणेच्या वागणुकीचीं बीजें त्यांस दिसून येणार आहेत. पहा बरें, वॉशिंग्टनला त्याच्या बापानें शिक्षा केली काय ? आणि शिक्षक म्हणजे बापासमानच नव्हे काय ? असो. तर यासाठीं हा सत्यवक्तेपणाचा गुण तुम्ही आपल्या अंगीं बाणवून घ्या, हेंच माझें तुम्हांला येथें सांगणें आहे.

त्यानंतरची गोष्ट स्वदेशीव्रतपालनाची ! तुम्हाला लागणाऱ्याच नव्हेत, तर तुमच्या घरीं येणाऱ्या सर्व वस्तु, होता होईतों देशींच असाव्या असा तुम्हीं निश्चय केल्यास, तुम्हाला तें पुष्कळसें करून दाखवतां येईल, निदान स्वतःपुरतें तर खास करतां येईल. तुमच्या शाळेंत तसा स्वदेशी स्टोअर असेल तर चांगलेंच आहे. नसल्यास शक्य तर सुरूं करा, व तें नच जमल्यास बाहेरून माल घेतांना तो स्वदेशीच घेईन असा निश्चय करा, म्हणजे संपलें. या कामीं विलायती चहाच्या पासून तुमची सुटका व्हावी हें मी वर सांगितलेंच आहे. दूध नाहीं मिळालें तर दुसरें कांहीं खा, आणि तेंही नच मिळालें तर जेवणाची वेळ होईपर्यंत तसेंच रहा, पण चहा पिऊं नका हेंच माझें त्या बाबतींत सांगणें आहे. कारण ही एक प्रकारची कायमची कीड आपल्या देशांतील पोराबाळांच्या सुद्धां अंगाला जडली आहे, व तिच्यापासून त्यांची व देशाची मुक्तता व्हावी अशी माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. मुलांनो, एवढी कळ व एवढा त्रास तुम्हाला सोसवत नसेल तर तुम्ही देशाचें दैन्य पुढें कसें फेडणार व त्यासाठीं काय हालअपेष्टा सोसणार तें दिसतेंच आहे ! पण गाद्यागिरद्यांवर लोळून स्वराज्य मिळत नसतें, हें मुलांनो, तुम्ही कधींही विसरूं नका बरें !

यानंतर तुमची अभ्यासाची खोली, तुमचें दप्तरपाटी, व तुमचे कपडेलत्ते यांकडे पाहिल्यास, तीं सर्व बेशिस्त व अस्ताव्यस्त आहेत असाच देखावा नाहीं कां घरोघर दृष्टीस पडत ? म्हणूनच भगवंतांनीं म्हटलें आहे कीं :—

**" मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मांवेत्ति तत्वतः ॥"**

म्हणजे हजारों लोकांतून एकादाच उन्नतीचा यत्न करतो, व अशा यत्न करणारांतून एकादाच उन्नतीचें पैलतीर गांठू शकतो, व त्याचीच जगांत वहावा होते ! बाकीचे कोणी तीरावरच मागें फिरतात, तर कोणी आधेमधें गळाठतात ! तुम्ही म्हणाल कीं, काय ? ह्या साध्या गोष्टीचेंही इतके महत्व आहे ? तर त्याचें उत्तर हेंच कीं, होय; ह्या साध्या गोष्टीचेंही इतकें महत्व आहे. "Little thing of great value" म्हणून जी म्हण आहे ती ह्याचीच दर्शक आहे. अर्थात् ज्याची स्वतःची टापटीप व व्यवस्थितपणा नाहीं, तो दुसऱ्याची काय ठेवणार तें दिसतेंच आहे ! रामदासही म्हणतातः—

**" ज्याचे ऐहिक धड नाहीं । तयाचें परत्र पुससीं काइ ?॥"**

यासाठीं टापटिपीतपणा ठेवा, वागण्यांत, बोलण्यांत, बसण्यांत, उभे राहण्यांत, कपड्यांलत्त्यांत, दप्तरपाटींत, लिहिण्यासवरण्यांत व हरएक बाबतींत नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा व टापटीप दिसून द्या, हेंच माझें तुम्हांला अखेरचें सांगणें आहे.

सरते शेवटीं सर्व गुणांच्या अन्नाला मिठाप्रमाणें रुचि आणणारा गुण जो नम्रपणा व विनम्रवृत्ति त्यासंबंधीं चार शब्द सांगून मी तुमची रजा घेणार आहे. मुलांनो, "**लवणाखेरीज अन्नाला आणि विनयाखेरीज भाषणाला रुचि नाहीं**" अशी जी म्हण आहे ती ह्याचीच दर्शक आहे, व यासाठींच "**स्वयें सर्वदा नम्रवाचें वदावें**" अशा तऱ्हेचा गोड उपदेश समर्थ रामदासस्वामी आपणांस करीत आहेत. "**राम ! सुष्टु**

**शोभसे विनयेन ।** " म्हणून जें संस्कृत वाक्य आहे तें प्रत्येक विनयशील मुलाला सारखेंच लागूं होणारें आहे; म्हणजे विनयाची शोभा प्रत्येक मुलाला सारखीच लाभूं शकते, हें प्रत्येक मुलानें लक्षांत ठेऊन आपले आईबाप, इष्टमित्र, व गुरुजन ह्यांच्याशीं सदैव नम्रपणें वागावें. कारण उद्धट मुलें कोणालाच आवडत नाहींत हें कोणीही विसरूं नये, यापेक्षां अधिक काय सांगूं? मुलांनो, याप्रमाणें, म्हणजे प्रस्तुत पुस्तकांत अथपासून इतिपर्यंत सांगितलेल्या गोष्टींचा ठसा मनावर ठसवून घेऊन त्याप्रमाणें तुम्हीं वागलांत, तर तुमचें कोटकल्याण होऊन तुम्हीं अद्वितिय तेजानें चमकणारे दिव्य हिरे व्हाल, हें तुम्हांला भगवंताच्या पायाचीच शपथ घेऊन सांगून, सरतेशेवटीं तो दयाघन प्रभु तुम्हां सर्वांना त्याप्रमाणें वागण्याची बुद्धी देवो व अशा बुद्धीचे ' बलवंत हिरे ' माझ्या मायदेशांत शेंकडयांनींच नव्हेत, तर हजारांनीं पैदा होवोत हेंच त्या दीनदयाळ देवाजवळ मागणें मागून, हा ग्रंथ 'न मम' म्हणून त्याचेच चरणीं अर्पण करून लेखणीस विराम देतो !

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ शुभं भवतु ॥

REFBK-0003569

मराठी ... ग्रंथालय ठाणे
क्र. ३५६९
... शाखा (...)